प्रा-वा-

१७९८७

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : वा.वा
दा. क्र. १७९८७

BVBK-0401797

बाल. बा. बा.

१७८५
३।५।८५

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.

बाल वाङ्मय विभाग

ना. क्र. १७८५ दिनांक ३।५।८५

विषय बा. बा. क्र. .......

सरदार पृथ्वीसिंह आझाद

यांच्या

# साहसकथा

(जीवन परिचय)

: अनुवादक :

भा. रं. खानविलकर

BVBK-0401797

पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन
१७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

प्रकाशक :
प. भ. कुलकर्णी
एम्. एस्सी. / इंजि. / जर्मनी, एफ्. टेक्. / लंडन
पुणे विद्यार्थी गृह प्रकाशनासाठी
१७८६ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

●

प्रथमावृत्ती : २५ जुलै १९८२
नागपंचमी

●

© प्रकाशकाधीन

●

किंमत : दहा रुपये

●

मुद्रक :
म. कि. घोडके
अभिनव प्रिंटर्सकरिता
१२६२ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०



सरदार पृथ्वीसिंह आज़ाद

## अनुक्रम


१. सरदार पृथ्वीसिंह आझाद ५
२. लंका सोन्याची, पण परक्याची १०
३. माणसांच्या केसांचे ढीग १२
४. रोज बारा मैल डबल सीट १४
५. क्रांतीची पूर्वतयारी–भारताकडे प्रयाण १६
६. कलकत्ता ते पेशावर सर्व पूल उध्वस्त करण्याचा बेत १९
७. माझा जीव घ्या पण मला असे मारू नका २१
८. पोलिसाचा मामा २३
९. हजार बिघे जमिनीचा मालक : पॉकेटमार २५
१०. आता काय पीठ दळू ? २८
११. स्नान झाले, पण फाशी राहिली ३१
१२. अंदमानचा खुदा ३३
१३. फटक्याची शिक्षा ३५
१४. सरदारांचे उपोषण ३७
१५. धावत्या गाडीतून उडी ४२
१६. सुटकेचा दुसरा सफल प्रयत्न ४८
१७. धावत्या गाडीतून उडी मारणारा माणूस ५१
१८. स्वामीरावांचा जन्म ५४
१९. मिया महादेव ५८
२०. अल्लारखांचा जन्म ६०
२१. इन्स्पेक्टसाहेब सलाम ६५
२२. लॅमिंग्टन रोड पोलीस चौकीवर हल्ला ६८

| | |
|---|---|
| २३. अवूच्या पहाडात | ७३ |
| २४. कराची काँग्रेस | ७९ |
| २५. कावूलच्या वाटेवर | ८१ |
| २६. दरवेशांच्या वस्तीत | ८४ |
| २७. रशियास प्रयाण | ९० |
| २८. भारतात येण्याचे विचार | ९२ |
| २९. ताशकंद प्रयाण | ९४ |
| ३०. भावनगर ते मुंबई | १०० |
| ३१. महात्माजींची भेट | १०३ |
| ३२. कैदियों में एक बंदी | १०८ |

७८९७ ३१४।९

# १. सरदार पृथ्वीसिंह आझाद

सरदार पृथ्वीसिंह आझाद यांना मनोधैर्य आणि शारीरिक सामर्थ्य वंश-परंपरेने प्राप्त झाले होते. स्वातंत्र्यपूर्व काळात गोरा सोजीर म्हटले की लोक थरथर कापत; त्याला शंभर गुन्हे माफ असत. लालडू गावात गुंडांना वठणी-वर आणण्याचे काम यांच्या आजोबांकडे—अर्जुनसिंह यांच्याकडे होते. इंग्रजां-विषयीचा द्वेष त्यांच्या रोमरोमात भिनला होता. गावगुंडांबरोबरच उद्दाम सोल्जरांनाही ते पिटून काढीत. चौहान वंशातील या क्रांतिवीराचा जन्म १८९२ साली सप्टेंबर महिन्याच्या पंधरा तारखेला झाला. राजस्थानात जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलाला—तो मुलगा असेल तर—तलवारीच्या पात्याचा स्पर्श झालेल्या पाण्याची घुटी देण्याचा प्रघात होता. कल्पना अशी की मोठे-पणी मुलाला तलवारीच्या बळावर शरणागताचे – दीनदुबळ्याचे – रक्षण करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे. मनोधैर्य आणि शरीर बल जरी भरपूर असले तरी आझादांची आर्थिक परिस्थिती फारच हलाखीची होती. वडिलांना पोटासाठी भटकत ब्रह्मदेशाला जावे लागले. त्यांचे ज्येष्ठ बंधू तिथे पोलीस ऑफिसर होते. गरिबी इतकी की कधीकधी गाजरे कुटून ती पाण्यात घालायची, ते मिश्रण उकळायचे आणि पोटाची खळगी भरण्याचा असफल प्रयत्न करायचा.

अशा कष्टात दिवस चालले असता एकदा एक भयानक प्रकार घडला. लालडू हे गाव सिमल्याच्या वाटेवर आहे. तिथे बऱ्याच वेळा इंग्रज सोल्जर आपला तळ ठोकीत. तिथून जाताना ते चाकू, बटणे अशा कित्येक लहान-मोठ्या वस्तू तिथेच टाकून जात किंवा विसरून जात. त्या दिवशी सरदार पृथ्वीसिंह यांना एक काडतूस सापडले. 'हे विस्तवावर ठेवले तर' असा विचार मनात येण्याचा आवकाश, स्वारी लागलीच धावत धावत चुलीजवळ गेली

आणि ते काडतूस त्यांनी निखाऱ्यावर ठेवले. जवळच आजी बसली होत.. विस्फोट झाला; गोळी आजीच्या पायात घुसली. ते पाहून इतर कोणी यायच्या आत स्वारीनं जी धूम ठोकली ती रात्रीपर्यंत. आता आजोबाकडून आपल्याला चोप मिळणार या भीतीने दिवसभर ते बाहेरच राहिले. पण रात्री ते घरी आले तेव्हा आश्चर्याची गोष्ट, त्यांना कोणीही काही बोललेसुद्धा.. एका शब्दानेही दुखावले नाही; उलट पोर दिवसभर उपाशी राहिलं म्हणून आजा-आजी काळजीच करताना दिसले.

असे अडदांडपणाचे अगणित प्रसंग घडले; पण वृद्ध आजा-आजीची सहन-शक्ती आणि माया त्यांना पुरून उरली. धनुष्यबाणाचा खेळ सर्वच मुले खेळत; पण यांचे खेळणे नेहमी जीव घेणेच असायचे. एकदा यांनी जो बाण मारला तो भावाच्या पोटातच घुसला. पुन्हा दिवसभर घराबाहेर. पण आजा-आजी काय यांच्या जन्माला पुरणार होती ? ती वारल्यावर त्यांना मामाच्या घरी राहावे लागले. गावात शाळा नव्हती; त्याकरिता पाच मैल तंगड्या तोडीत जावं लागे. मामाला दया आली आणि यांचे शिक्षण बंद झाले. त्याचाही एक फायदा झाला. मामा शिकारी होता. स्वास्थ्य, बल आणि साहस यांच्या विकासाला अवसर मिळाला. तिथे अडदांडपणाला भरपूर वाव होता. शेजारच्या गावांतील घोडी चरण्यासाठी यांच्या गावाच्या हद्दीत आली की हे त्यांच्या उघड्या पाठीवर बसत आणि त्यांच्या मानेवरचे केस पकडून त्यांचा घाम काढीत. कधी पील-पलंग (सूर-पारंब्याचा खेळ) खेळत.

डांगरी नदीच्या पलीकडे दोन गावे आहेत. दोन्हीही गावांतील गुरे ... नदीकाठी चरण्यासाठी येत. यांपैकी कोणी ... गावाच्या हद्दीत सापडले की त्याला मार खावा लागे. युद्धच ते ! सरदार पृथ्वीसिंह आपल्या मामाची गुरे चरावयास घे‍ऊन जात. सापडेल त्या घोड्यावरून रपेट करावी, हसावे, खिदळावे, भूक लागली की गायी-म्हशीचे दूध प्यावे—भांडे कशाला, स्तनाला तोंड लावून—मुलं म्हणजे वासरंच ती. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे ती जनावरे पण मातेच्या ममतेनं त्यांना पाजीत.

पुरुष-पुरुष वाढलेले गवत—ती मुलांची लपून बसण्याची जागा. एकदा सरदार बेगुमानपणे आपली जनावरे घेऊन शेजारच्या गावाच्या हद्दीत घुसले. आणि मग काय, बेदम मार खावा लागला. पण त्यापेक्षा अधिक असह्य झाले

मामाचे बोलणे. ते दुसऱ्याच्या हद्दीत गेले म्हणून मामा रागावले असे नाही; मार खाऊन त्याची रडकथा सांगत घरी आले तेव्हा मामा म्हणाले, 'चौहान' वंशाला काळिमा लावलास.' मामाचे हे वाक्य त्यांच्या जिव्हारी झोंबले. तो दाह काही दिवसांनी त्यांनी जेव्हा प्रतिपक्षाला चोपून काढले त्याच दिवशी शमला.

असे आडदांडपणाचे जीवन जगत असतानाच एक दिवस त्या गावात अभूत-पूर्व अशी एक गोष्ट घडली. एकदम शंभर रुपयांची मनीऑर्डर आली. एवढ्या मोठ्या रकमेची मनीऑर्डर त्या गावात यापूर्वी कधीच आली नव्हती. एवढे पैसे कुणी पाहिलेही नव्हते. जत्रा-बित्रा असली तरच एखादा पैसा मुलाच्या दृष्टीस पडायचा. मनीऑर्डर ब्रह्मदेशातून सरदार पृथ्वीसिंह यांच्या वडिलां-कडून आली होती. ते जातिवंत शेतकरी असल्यामुळे कोणाचीही नोकरी न करता स्वतंत्र धंदा करणे त्यांनी पसंत केले होते. ब्रह्मदेशात दूध कमी, त्यामुळे तेथील भारतीय जवानांची फार अडचण होत असे. यांनी तोच धंदा सुरू केला; जवानांची सोय झाली; याना धंदा मिळाला.

काही दिवसांनी चौधरी नारायणसिंह ब्रह्मदेशाहून परत आले. त्यांच्या-बरोबर आणखी पैसे आले. त्या वेळी या मुलांचे कपडे म्हणजे ढुंगणाला एक लंगोटी आणि डोक्यावर एक टोपी. त्यांच्यासाठी अंबाल्याहून कपड्यांची एक पेटीच आली. लालडू गावात शाळा पाचवीपर्यंतच होती. पाचही वर्ग एकाच खोलीत भरत. सरदार पृथ्वीसिंह आणि त्यांचे बंधू यांना जेव्हा शाळेत घातले, तेव्हा ही दोन्ही मुले इतर सर्व मुलांपेक्षा थोराड तर होतीच; पण वयानेही मोठी होती. एके दिवशी पतियाळाहून एक शिक्षणाधिकारी शाळा तपासण्या-साठी आले. सरदार पृथ्वीसिंहावर दृष्टी जाताच ते शिक्षकांना म्हणाले, 'इस लडकेका खयाल रखना.'

आपल्या काकाबरोबर जेव्हा ही दोन्ही मुलं ब्रह्मदेशाला निघाली, तेव्हा वाटेत त्यांच्या कानावर एक भयंकर बातमी आली. त्यांना धक्काच बसला. त्यांनी योजलं होतं काय आणि झालं काय! आता आपल्या वडिलांच्याजवळ आपल्याला राहायला मिळणार या आशेने इतक्या दूर आलेल्या यांना कसली बातमी ऐकायला मिळावी? 'शादीराम मेला' एवढे ऐकले मात्र; त्यांच्यावर आकाश कोसळल्यासारखे झाले. शादीराम त्यांच्या वडिलांचे नाव. आता आपले

कसे होणार ? या काळजीने त्यांना काही सुचेनासे झाले. या गडबडीत काय झाले कुणास ठाऊक, सरदार पृथ्वीसिंह जिन्यावरून खाली गडगडत आले. हातातील गाठोडे अंगाखाली आले म्हणून बरे झाले; नाही तर कपाळमोक्षच व्हायचा; पण मग ती बातमी खोटी ठरली. काकांचा शिपाई या दोन्ही मुलांना घेऊन जेव्हा त्यांच्या वडिलांकडे गेला, तेव्हा त्यांनाही आपली मुले ओळखता आली नाहीत. पोलिसानेही थोडी गंमत करायचे ठरविले. 'ही मुलं कुणाची ?' असं जेव्हा त्यानी विचारलं तेव्हा 'एका हवालदाराची' असं त्यानं सांगितलं आणि शादीरामलाही ते खरे वाटले. त्यानी मुलांना दूध पिण्यास दिले; तेवढ्यात त्यांचे बंधू आले आणि रहस्यस्फोट झाला.

मुलांचे दिवस मजेत जाऊ लागले. भरपूर दूध प्यावं आणि मनसोक्त खेळावं. गायी तरी काय थोड्या होत्या काय ? साठ गायी आणि तीनशे शेळ्या. पण मग प्रश्न निघाला 'शिकायचं की धंदा करायचा ?' जनावरे संभाळण्याचे अंगवळणी पडले होते. घरचा एवढा धंदा आहे; करायचं काय शिकून ? असे शादीरामचे मत होते. पण त्यानी मुलांवर कसलीही सक्ती केली नाही. वाटलं तर धंदा करा; वाटलं तर शिका. सरदार पृथ्वीसिंह यांनी शिकायचं ठरविलं. मिशन स्कूलमध्ये शिक्षणाचे माध्यम होते इंग्रजी आणि बर्मी माध्यमाची शाळा होती दीड मैलावर. शादीराम स्वतः स्वयंपाक करून मुलांना जेवू घालीत.

शालेय शिक्षणात मातृभाषेला स्थान नव्हते आणि पृथ्वीसिंहाना तर तिची तहान लागलेली. कोण शिकवणार ? जवळच गुरुद्वारा होता. तिथे धर्मावर चर्चा चालत असे. पृथ्वीसिंह रोज ती ऐकत. इथेच त्यांची धर्मावर श्रद्धा बसली. नेहमी कोणत्या ना कोणत्या तरी कामात राहण्याच्या संवयीमुळे अनुशासन आणि संयम या दोन्ही गुणांचा सहजच विकास झाला. त्यांचे वडील शादीराम, वचनाचे पक्के आणि व्यवहाराचे सच्चे होते. ते अशिक्षित असले तरी सुसंस्कृत होते.

लहान भावाने शिक्षण सोडले आणि तो आपल्या वडिलांना त्यांच्या धंद्यात मदत करू लागला, त्यामुळे वडील भावाला अभ्यास करण्यास भरपूर वेळ मिळू लागला. अभ्यासाबरोबरच आपला देश, आपली भाषा यांविषयी अधिक ज्ञान मिळविण्यासाठी ते उर्दू शिकले. १९०५ ते १९०८ हा काळ असा होता की

सैन्यातील सैनिकही वर्तमानपत्रे वाचीत, चर्चा करीत. तेव्हाच रूसो-जपानी युद्ध झाले; स्वदेशभक्तीची लाट उसळली. वंगभंग चळवळ याच वेळी झाली. काकांच्याकडे लोक जमत असत. लाला लजपतराय यांना देशनिर्वासन, लो. टिळकांना अटक याविषयी बोलले जाई. देशभक्तांना तुरुंगात डांबले जात आहे; त्यांना हद्दपार केले जात आहे हे ऐकून पृथ्वीसिंह यांचे रक्त सळसळू लागले. त्यांच्यावर देशप्रेमाचा रंग चढू लागला पण त्याबरोबरच दुसऱ्या एका गोष्टीने त्यांचे लक्ष वेधून घेतले. त्यांच्या वडिलांना साधुसंतांचे फार वेड. घरी अनेक साधू येत. वडील त्यांना जेवू-खाऊ घालत. स्वयंपाक आता पृथ्वीसिंह स्वतःच करू लागले. एके दिवशी त्यांनी रामनामावर चर्चा ऐकली आणि त्यांना मग त्याचाच नाद लागला. शाळेतून आले की हातपाय धुवायचे, थोडेसे काही खायचे आणि लगेच जंगलात जायचे. तिथे एक छोटेसे सरोवर होते; त्याच्या काठावर ते जपाला बसत. जंगल दाट असल्यामुळे हिंस्र श्वापदे तिथे पाणी पिण्यास येत; पण भक्ताचा ईश्वर पाठीराखी असतो या कल्पनेवर पूर्ण श्रद्धा असल्याने त्यांना या श्वापदांची मुळीच भीती वाटत नसे. कित्येक वेळा पांढरीशुभ्र दाढी असलेली एक व्यक्ती आपल्या डोक्यावर हात ठेवून उभी असल्याचा त्यांना भास झाला होता.

इतर साधुसंतांबरोबर बौद्ध भिक्षूही येत. पहाड खोदून लेणी तयार करावयाची आणि तिथे समाधी लावून बसायचे अशा गोष्टी नेहमी त्यांच्या कानावर पडत. त्याचा परिणाम असा की एक दिवस स्वारी स्वतःच समाधी लावून बसली. अर्थात हे कोणालाच ठाऊक नव्हते. बरीच रात्र झाली तरीही ते घरी परत न आल्यामुळे सर्व लोक काळजीत पडले. काका सगळीकडे शोधीत फिरत होते. पोलिसांना वाटले एखाद्या हिंस्र श्वापदाने मारून खाऊन तर टाकले नसेल ! कोणी म्हणाले, घरी भांडण झाले असेल म्हणून पळून गेला असेल प्रत्येकाचा तर्क वेगळा, एवढ्यात एका लाकूडतोड्याने बातमी आणली की ते सरोवराकाठी डोळे मिटून बसले आहेत. त्या दिवसापासून आपल्यात काही विशेष आहे, सामान्य माणसापेक्षा आपण वेगळे आहोत असे त्यांना वाटू लागले. रात्री तारे आणि दिवसा ढगयाकडे पाहात बसण्याचा त्यांना छंदच लागला.

# २. लंका सोन्याची; पण परक्याची

हा छंद पण थोडेच दिवस टिकला. देशप्रेमाच्या वेडाने पुन्हा डोके वर काढले. सांसारिक गोष्टीत मन रमेना. मातृभूमीची आठवण झाली आणि मग ब्रह्मदेशातील आरामाच्या जीवनात त्यांना राम वाटेनासा झाला. याला एक विशेष कारण घडले. एक भैया तुळशीरामायणाचा पाठ करीत होता. ' वाडवडिलांची भूमी दरिद्री असली तरी ती आपली म्हणून सुखदायकच असते. हे लक्ष्मणा, ही लंका सोन्याची असली तरी ती परक्याची आहे. ती सुखदायी नाही. ' अशा अर्थाची एक चौपायी त्या भैय्याच्या तोंडून त्यांनी ऐकली आणि त्यांची पंजाबची ओढ अधिकच तीव्र झाली. उदास उदास वाटू लागले. कशातही मन रमेना, पण सांगायचे कुणाला ! शेवटी मनाचा धडा करून घरामध्ये त्यानी तो प्रश्न काढलाच. भाऊ, वडील, मित्र कोणालाच ते पटले नाही. पंजाबमध्ये जाऊन राहणार कोणाकडे, तिथे काय करणार, आता आपले तिथे कोण आहे, इथं आता बरा जम बसला आहे, असे अनेक मुद्दे उपस्थित करण्यात आले, ब्रह्मदेशातील सुखी जीवनाचे रम्य चित्र त्यांच्या डोळ्यांपुढे उभे करून त्यांना त्यांच्या विचारापासून परावृत्त करण्याचे अनेक लोकांनी अनेक मार्गांनी प्रयत्न केले, पण व्यर्थ ! शेवटी आजचे मरण उद्यावर ढकलावे म्हणून ' एकटा कसा जाणार ' असेही विचारण्यात आले. ते तर अधीर झाले होते.

कर्मधर्मसंयोग असा की त्याच वेळी काही भारतीय सैनिक रजेवर चालल्याची बातमी कानावर आली आणि ते आनंदाने नाचू लागले. ब्रह्मदेश सोडून ते जेव्हा निघाले; तेव्हा त्यांना निरोप देण्यासाठी आलेले लोक त्यांच्याकडे पाहात होते; आणि त्यांना पंजाब दिसत होता. कधी एकदा आपल्या मातृभूमीच्या कुशीत शिरतो असे त्यांना झाले होते.

जहाजावरील प्रवास अतिशय त्रासाचा. संडासाची सोय नाही; उघड्यावर बसायची सवय नाही. तीन दिवस मग त्यांनी उपासच केला. तिसऱ्या दिवशी ते कलकत्त्याला पोचले. पंजाबची ओढ एवढी जबरदस्त की कलकत्ता पाहण्या-

साठी न थांबता स्वारी अंबाल्यापर्यंत टांग्यात बसून गेली. सामान होते एक पेटी आणि एक वळकटी. पेटीवर वळकटी आणि डोक्यावर पेटी अशा थाटात ते आपल्या घरी येऊन थडकले. घर सोडून सहासात वर्षे झाली होती. स्वत:ची उंची वाढली होती. मखमलसिह, नारायणसिंह कोणीच त्यांना ओळखले नाही. स्वत:च्या घरात— आपल्या माणसांत येऊनसुद्धा, त्यांना हे समजेना की मायभूमीत असे काय आहे म्हणून आपण इथे आलो. गावाकडे पाहावे तर चहूबाजूंला घाण, माणसाकडे पाहावे तर उतरलेले निस्तेज चेहरे. जिच्याकरिता श्रीरामचंद्रानी लंका सोडली, जिचे गुणवर्णन करताना कवींना शब्द अपुरे पडतात ती मातृभूमी, त्या मातृभूमीचे प्रेम, तिच्या कुशीत राहाणाऱ्या एकाही माणसात व्यक्त होत नव्हते. आपण का आलो हे कोणाला आणि कसे सांगायचे !

कल्पनेने निर्माण केलेल्या जगापेक्षा ते अगदी वेगळे जग होते. देशप्रेम किंवा मायभूमी याविषयी चर्चा सुरू केली तर असे वाटे की हा त्यांचा विषयच नाही. आपले विचार इतरांना समजत नाहीत; त्यांच्या आणि आपल्या विचारात जमीन-अस्मानाचे अंतर आहे याची त्यांना हळूहळू जाणीव होऊ लागली तरी त्यांनी तिथेच राहण्याचे ठरविले. तिथल्या शाळेत शिकायचे म्हणजे भाषेचा प्रश्न आला. त्यांचे इंग्रजी चांगले होते, पण हिंदी-उर्दू दोन्हीही कच्चे. बरीच खटपट करून सहाव्या इयत्तेत प्रवेश मिळविला. स्वत:पेक्षा अधिक वयाच्या मुलांशीच त्यांची घसट वाढली. खेळही ते खेळत नसत. त्यामुळे अधिक ओळखी होईना. १९०७–१९०८ साली समाजामध्ये आर्य-समाजाची चलती होती. त्यांच्या विचारांचा प्रभाव पृथ्वीसिंह यांच्यावर पडला असल्यास नवल नाही. नृत्याचे कार्यक्रम गाण्याच्या मैफली वगैरे त्यांनी वर्ज्य करून टाकले. हे व्रत त्यांनी सन १९३१ पर्यंत चालू ठेवले. त्यांनी सिनेमा पाहिला तो सुद्धा रशियन राज्यक्रान्तीचा पाहिला. ब्रह्मदेशात जसे स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले होते, तीच परिस्थिती भारतात होती. सरदारांचे शिकण्यात लक्ष लागेना. त्यांचे ते उद्दिष्टच नव्हते. सुख-समृद्धीचा तर विचारही त्यांच्या मनाला कधी शिवला नाही. ते भल्या पहाटे उठत, निर्जन अशा ठिकाणी जात आणि एकान्त सेवन करीत. त्यांच्या जीवनाचे स्वप्न काही वेगळे होते; ते स्पष्ट झाले नव्हते एवढेच.

शाळेत उर्दू शिकवायला एक मौलवी होते. त्यांनी रशिया-जपान यांच्यामधील युद्धावर एक निबंध लिहिण्यास सांगितले. सरदारांनी लिहिलेल्या निबंधातील पुढील भाग त्यांनी अधोरेखित केला. "जपान रशियापेक्षा अगदी लहान असूनही त्याने रशियाचा पराभव केला; तेव्हा हे गोरे सोल्जर भित्रे असले पाहिजेत. भारतातील असल्या या भेदरट इंग्रजांना नामोहरम करणे; त्यांना देश सोडायला लावणे मुळीच कठीण नाही." त्यांनी जणू काही सरदारांच्या या अक्षम्य अपराधाबद्दल त्यांना शाप दिला. "सबंध जन्म कष्टात काढावा लागेल." आणि ही शापवाणी भविष्यकाळी खरी ठरणार आहे हे त्या मौलवींच्या स्वप्नातही नसेल.

●

# ३. माणसांच्या केसांचे ढीग

कर्मधर्मसंयोग असा की, त्याच वेळी अमेरिकेत क्रान्तिकारकांचा अड्डा असल्याची बातमी त्यांच्या कानावर आली आणि त्यांनी घर सोडून अमेरिकेला पळून जाण्याचे ठरविले. पैशाचा सर्व व्यवहार त्यांच्याच हातात असल्यामुळे, आपल्याबरोबर शंभर रुपये घेऊन घरातून पसार होण्यात त्यांना कसलीच अडचण आली नाही. रंगूनहून पीनांगला जाणाऱ्या बोटीतून प्रवास सुरू झालाही. पीनांगहून सिंगापूर, तिथून हाँगकाँगला जायला सहा दिवस लागले. १५०० प्रवासी असलेले ते जहाज म्हणजे एक छोटेसे खेडेगावच होते. प्रवासात चित्तथरारक अनुभव मिळाला. वादळ झाले तेव्हा चिनी प्रवाशांची संख्या मोठी होती. वादळामुळे बोट लागून जे मरत त्यांना एखादे गाठोडे फेकावे तसे समुद्रात फेकून देत. हाँगकाँगला सरदार पोचले तेव्हा त्यांच्याजवळ फक्त ६५ रुपये होते. पीनांग, सिंगापूर, हाँगकाँग सर्व ठिकाणी उतरण्यासाठी एक मोठी सोयीची जागा म्हणजे शीखांचा गुरुद्वारा. यांचाही रात्रीचा मुक्काम गुरुद्वारात झाला. सकाळी उठून जवळची पुंजी सुरक्षित आहे की नाही म्हणून पाहिलं तर हाताला लागले फक्त पाच रुपये;' साठ रुपये गायब. नशीब

चोराने पाच रुपये तरी ठेवले. मग नोकरीसाठी पायपिटी सुरू झाली. बराच प्रयत्न केल्यावर एका सोडावॉटर फॅक्टरीत चौकीदाराचे काम मिळाले. हातांनी स्वयंपाक करावा, एक वेळाच जेवावे; असे दिवस चालले होते. आजूबाजूच्या लोकांशी जे काही बोलणे होई त्याचा विषय नेहमी देशाचे स्वातंत्र्य हाच असे. लाहोरच्या डी. ए. व्ही. कॉलेजचे दोन तरुणही अमेरिकेला जाण्याच्या तयारीत होते; एक बलवंतसिंह आणि दुसरा प्यारेलाल. दोघेही देशप्रमाने वेडे झालेले; एकाजवळ भाड्याला पैसे होते; पण कपडे नव्हते. सरदारांनी आपला सूट त्याला देऊन त्याची नड भागविली. हे त्यांचे देशप्रेम त्यांना नडले. राजद्रोही म्हणून पोलिसांनी खूप खटपट करून त्यांची नोकरी जाईल अशी व्यवस्था केली. हातावरचं पोट; खायचं काय ? त्या वेळी तिथे सात नंबरची रजपूत रेजिमेंट होती. सरदारांना ते लोक ओळखत असल्यामुळे त्यांनी खाण्यापिण्याच्या बाबतीत सरदारांना खूपच मदत केली.

एके दिवशी सरदार रस्त्याने चालले असताना त्यांना माणसाच्या केसांचे ढीगचे ढीग पडलेले दिसले. डॉ. सन्यत्सेन यांच्या नेतृत्वाखाली चिनी लोकांनी गुलामगिरीचे जोखड आपल्या मानगुटीवरून पार झुगारून दिले होते. चीनमध्ये त्या वेळी मांच्यू घराण्याची राजवट होती. सरकार इतके जुलमी की पुरुषांनीही स्त्रियांप्रमाणे आपले केस कायम ठेवले पाहिजेत; कापून घेता उपयोगी नाही अशी सरकारी आज्ञा होती. आणि लोक ती मुकाट्याने पाळीत होते. डॉ. सन्यत्सेन यांनी चिनी समाजपुरुष जागा केला. आपले केस कापून लोकांनी जाहीर केले की इथून पुढे ही गुलामगिरी सहन केली जाणार नाही. आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे अगदी शेवटच्या क्षणापर्यंत सरकारला त्याचा पत्ता लागला नाही. भारतात तर परक्यांचे राज्य आहे. इथे गुप्तपणे कार्य करून आपल्याला आपला देश का नाही स्वतंत्र करता येणार ? असे विचार सरदारजीच्या मनात घोळू लागले. "चिनी गुप्त पोलिसाना चिनी लोकांच्या हालचाली जर समजू शकल्या नाहीत तर इंग्रज गुप्त पोलिसाना चकविणे भारतीयांना का जमू नये ?" अशा रीतीने क्रान्तिकारकाचे मन तयार होत होते : पोटासाठी मग फेरीवाल्याचा धंदा ते करू लागले. आसपासच्या गावात विक्री करून परत मॅनीला येथे मुक्काम करीत. तिथे अनेक तरुणांशी मैत्री झाली. त्या काळी अमेरिकेत प्रवेश मिळविण्यासाठी ५० डॉलर

लागत. पाच मित्रांनी मिळून तेवढी रक्कम जमा केली आणि सरदारसाहेबांना ती दिली. १९१२ साली ते अमेरिकेच्या जहाजात बसले. ते ३५००० टनाचे मोठे जहाज होते. भोजनालयातच ५०० खुर्च्या होत्या. स्वयंपाक प्रवासीच आळीपाळीने करीत. या एक महिन्याच्या प्रवासात स्पॅनिश आणि इंग्रजी दोन्ही भाषा बोलणारे फक्त सरदारजीच होते.

अमेरिकेत सियाटल येथे सर्व प्रवासी लोकांना आपली माहिती सांगावी लागे. त्याकरिता वेनकोव्हर या बंदरावरून दुभाषी येत असे. गम्मत म्हणजे हे जहाज जेव्हा त्या बंदराला पोचले, तेव्हा हा दुभाषी त्या दिवशी आलाच नाही. कोणीतरी सांगितले की सरदारजी दुभाषाचे काम करू शकतील. त्यांना तशी विनंती करण्यात आली आणि त्यांनी ती मान्यही केली. ठराविक प्रश्न होते; तुझा धर्म कोणता ? तू आपला धर्म बदलणार आहेस काय ? लग्न झाले आहे काय ? इंथ कशासाठी आला आहेस ? किती वर्षे राहणार ? आपल्या मिळकतीचा कसा उपयोग करणार ? वगैरे.

बहुतेक पंजाबी प्रवासी म्हणत, " सानू की पता की जवाब देणा. " मग सरदारजी आपल्या मनाला येईल तशी उत्तरे देऊ लागले. त्यांचे स्वतःचे उत्तर म्हणजे एक भाषणच झाले. भारतात क्रान्ती करावयाची आहे. देश स्वतंत्र करावयाचा आहे. अशा एक ना दोन कितीतरी गोष्टी त्या उत्तरात आल्या. अधिकारी डोळे मिटून ऐकत होता. मग मोठ्याने हसून " यशस्वी हो " अशी त्याने शुभेच्छा व्यक्त केली आणि जाऊ दिले.

## ४. रोज बारा मैल डबल सीट

अमेरिकेत पहिले काम मिळाले स्टॉकटन शहराजवळ. मालक जपानी होता. एकंदर पंचवीस भारतीय तिथे काम करीत होते. काम चांगलेच कष्टाचे होते. लोखंडी पंजांनी जमिनीतून बटाटे ओरबडून काढायचे. त्यांचे ढीग करून ते पोत्यात भरायचे. पहिल्या दिवशी श्रम इतके झाले की भूकच मेली.

सगळे शरीर ठणकत होते. रात्रभर डोळ्याला डोळा नाही; पण इतर मुलांना आपला हा दुबळेपणा दिसू नये म्हणून ते दुसरे दिवशी तसेच कामावर गेले. परिणाम व्हायचा तोच झाला. सकाळी सपाटून ताप भरला. ते उठले तेव्हा तापाने फणफणले होते.

ही कामकरी मंडळी जेवणाच्या वेळी दारू पीत असत. एके दिवशी सरदारांनाही दारू पाजण्यात आली. त्यांना अर्थात ती खूपच चढली आणि त्या नशेत त्यांच्या बडबडीत क्रान्ती, स्वातंत्र्य हे शब्द आले. ते ऐकल्यावर या माणसाला दारू पाजण्यात आपण फार मोठी चूक केली असे त्या लोकांना वाटले आणि पश्चात्ताप झाला. त्यांचे जीवन अगदीच वेगळे होते; खावं, प्यावं, चैन करावी, आठवड्याची कमाई एका दिवसात उडवावी हा त्यांचा कार्यक्रम.

तो काळच असा होता की बहुतेक भारतीयांच्या मनात स्वातंत्र्याचे विचार घोळत होते. ओरिगन स्टेटमध्ये लाकडाचे कारखाने पुष्कळ होते. या कारखान्यांतून मजुरांना काम वेताचे, पगार भरपूर, विचार करायला शांतता आणि वेळ लागेल तेवढा. रशिया, चीन या देशांतील क्रान्तिकारी लोकांशी संबंध जोडणेही बरेचसे सोपे होते. भारत आणि भारतीय यांच्या कल्याणा-विषयीची योजना मनातल्या मनात आखली जाऊ लागली. भारतामध्येही क्रान्तीला अनुकूल असे वातावरण निर्माण होऊ लागले. दिल्लीत व्हाइसरॉयवर बॉंब टाकण्यात आला; सर्व देश हादरला. प्रक्षुब्ध वातावरण शांत करण्या-साठी शाही दरबार भरविण्यात आला. सर्व राजेमहाराजे बादशाहा पंचम जॉर्ज यांच्यापुढे झुकले. तरी बादशाहासुद्धा आपल्यासारखाच एक माणूस आहे हे दाखवून देणारे बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी मात्र आपली मान ताठ ठेवली; भारताची शान राखली. जागतिक परिस्थितीही क्रान्तिकारकांना दिलासा देणारीच होती. चीनमधील क्रान्तीने जनतेतील सामर्थ्याचा प्रत्यय आणून दिला. बलाढ्य अशा रशियाचा पराभव करून जपानने आशियातील लोक युरोपियन लोकांना कसे खडे चारू शकतात ते दाखविले आणि त्याच जपानला छोट्याशा कोरियाने आव्हान दिले. या सर्व घटना भारतीयांना उत्साहवर्धक होत्या.

सरदार आता कॅलिफोर्नियातील ‘ फ्रिजनो ’ या शहरात द्राक्षे तोडण्याचे

काम करू लागले. राहण्याचे ठिकाण द्राक्षमळ्यापासून बारा मैल. मित्र हरनामसिंह याच्या सायकलवरून त्याला डबल-सीट घेऊन रोज ते कामाला जात. घरी परत आल्यानंतर स्वत:च स्वयंपाक करायचा. सहा वाजण्याच्या आत ते घरातून बाहेर पडत. दहा दहा तास काम करावे लागे; पण लक्ष सर्व बाहेर काय चालले आहे याकडेच असायचे. लाला हरदयाळ यांनी 'युगान्तर' आश्रमाची स्थापना केली होती. 'गदर' नावाचे वर्तमानपत्र क्रांतीची आग भडकवीत होते. आश्रमात सर्व विनावेतन काम करीत. गदर पार्टीची स्थापना झाली ती याच वेळी. सर्व दु:खाचे मूळ कारण परकी शासन आहे, ते कसे नष्ट करावे; सशस्त्र क्रांतीसाठी लोकांना कसे तयार करावे, राजकीय जागृतीसाठी कसे प्रयत्न केले पाहिजेत वगैरे प्रश्न सोडविण्यासाठीच गदर साप्ताहिकाचे प्रकाशन सुरू झाले. याबरोबरच 'गदरकी गूंज' हा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. इंग्रजांनी केलेल्या अत्याचारांच्या भडक वर्णनांनीच या साप्ताहिकाची सर्व पृष्ठे भरून गेलेली असत. हे साप्ताहिक वाचून देशविदेशांतील देशभक्त क्रान्तिकारकांच्या बैठकी होऊ लागल्या. लोकांना पटू लागले की अधिकारी हा जनतेचा सेवक असतो, देशाची संपत्ती सत्ताधाऱ्यांच्या भोगविलासासाठी नसते. कॅनडातील लोकांना मार्ग सापडत नव्हता. तो लाला हरदयाळ यांनी युगान्तर आश्रम काढून आणि 'गदर' सुरू करून दाखवून दिला. सरदार पृथ्वीसिंहही या आश्रमात दाखल झाले. आश्रमीय जीवन म्हणजे एक तपश्चर्या होती; ते अथक परिश्रमाचे नि:स्वार्थी जीवन होते.

# ५. क्रान्तीची पूर्वतयारी – भारताकडे प्रयाण

दुसऱ्या महायुद्धाची वेळ. शस्त्रबळाला शस्त्रबळानेच तोंड दिले पाहिजे हा विचार पक्का झाला. शस्त्र बनविण्याची कला शिकण्याचे डोक्यात घोळू लागले. दि. १०–८–१९१४ ला अमेरिकेतील सेक्रेमेंटो येथे भारतीयांची एक

सभा झाली. आपल्याला काय हवे आहे, ते आपण कसे मिळविणार आहो याची खुली चर्चा झाली. सर्वांच्या भाषणात देशप्रेम भरपूर, त्याग करण्याची तयारीही दांडगी, पण क्रान्तीची स्पष्ट रूपरेखा अशी कोणाच्याच डोक्यात नव्हती, क्रान्तीच्या शास्त्राचे अध्ययन नव्हते. अशी ही भारतीय क्रान्तिकारकांची तुकडी भारतात जाण्यास निघाली.

दि. २९–८–१९१४ या दिवशी 'प्रिन्सेस कोरिया' हे जहाज या मंडळींना घेऊन निघाले. जहाजावर भाषण आणि चर्चा यात कधी खंड पडला नाही. जपानच्या योकोहामा या बेटावर हे लोक येतात न येतात तोच वर्तमानपत्रात यांच्याविषयी बातमी हजर. 'भारतीय क्रान्तिकारकांची एक मोठी तुकडी भारतात क्रान्ती घडवून आणण्यासाठी निघाली आहे.' ही बातमी वाचून लोक ठिकठिकाणी भेटण्यास येऊ लागले. पं. परमानंद झाशीवाले यांची अशीच भेट झाली या वेळी प्रत्येकाजवळ पिस्तुल होते आणि काडतुसे पण होती. हे किती धोक्याचे आहे हे कोणाच्याच डोक्यात आले नाही. हाँगकाँगला बोटीवरून उतरण्याच्या वेळी मात्र सर्वांनी आपली पिस्तुले आणि काडतुसे समुद्रात फेकून दिली. हे सर्व लोक कितीही बहादुर असले, तरी भोळे होते. क्रान्तिकारक एवढ्या मोठ्या संख्येने बोटीतून आले. दूर पहाडावरच्या छावणीतील सैनिकांनी त्यांचे स्वागत केले, ही बातमी ते उतरण्यापूर्वीच ब्रिटिश अधिकाऱ्यांना लागली होती याची कल्पना त्यांच्यापैकी एकालाही नव्हती. त्यांच्यापैकी काही लोकांनी असाही विचार मांडला की हाँगकाँगला बंड करून ते आपल्या ताब्यात घ्यावे. आपले ध्येय लाल किल्ला आहे हे ते विसरले; पण काही लोक सावध होते. त्यांनी विरोध केला. पुन्हा शस्त्र-खरेदी झाली. सिंगापूरला काहीही गडबड-गोंधळ न होता त्यांनी सिंगापूर सोडले. त्यांच्या नुसत्या आगमनानेच आग लागली होती. त्याच दिवशी सैनिकाचे बंड झाले. ६०० भारतीय सैनिक मारले गेले.

पीनाग सोडून रंगूनकडे यांचे जहाज निघाले तेव्हा रात्रीचे बारा वाजले होते. जर्मनीचे 'एमडन' जहाज रंगूनभोवती घिरट्या घालीत असल्यामुळे इतर लोकांची घाबरगुंडी उडाली असली तरी या क्रान्तिकारकांना ती इष्टापत्तीच होती. जर्मनीशी जर हातमिळवणी करता आली तर फार बरे होईल असे सर्वांना वाटत होते. आपले 'टोसामारू' जहाज त्यांनी आपल्या

ताब्यात घ्यावे आणि क्रांतिकारकांना अंदमानात पोचवावे अशी जरी त्यांची इच्छा असली तरी त्यांना अंदमानला नेण्यात आले नाही. ‘ टोसामारू ’ जहाज अंदमानजवळून जात असताना सर्वांना स्वा. सावरकरांची आठवण झाली आणि सर्वांनी प्रतिज्ञा केली की आम्ही यांची येथून सुटका करू, त्यासाठी प्राणार्पण करू किंवा स्वत: कैदी होऊन इथे येऊ.

हे लोक रंगूनला पोचले तेव्हा तिथे जवानांची सैन्यात भरती चालू होती. हे पाहिल्याबरोबर त्याविरुद्ध प्रचार करावा; लढाईवर जाऊ नका अशा घोषणा द्याव्या असे मनात आले; पण आपले उद्दिष्ट लाल किल्ला आहे हे आठवताच त्यांनी आपले तोंड बंद ठेवले. गदर पार्टीने या क्रान्तिकारकांपैकी प्रत्येकाला त्याचे कार्यक्षेत्र ठरवून दिले. सरदारांना ब्रह्मदेशला पाठविण्याचे ठरले. भारतातील परिस्थिती आपल्या डोळ्यांनी पहावी आणि मगच ब्रह्मदेशात जावे असा त्यांनी विचार केला.

टोसामारू जहाज कलकत्त्याच्या बंदराला लागण्यापूर्वीच या लोकांनी आपली हत्यारे पं. जगतराम यांच्याकडे दिली होती. त्यांनी ती एका पेटीत भरून, पेटी बोटीवरील डॉक्टरच्या ऑफिसमध्ये ठेवली होती. डॉक्टरी तपासणीचा बहाणा करून बंदरावर आपली झडती घेण्यात येणार ही त्यांची अपेक्षा खरी ठरली.

दि. १९–१०–१९१४ या दिवशी बोट जेटीला लागली. इंग्रज आणि गुरखा पलटणीने बोटीला घेरले होते. ब्रिटिश पोलीस अधिकारी बोटीवर आले आणि त्यांनी या सर्व क्रान्तिकारकांना इतर प्रवाशांतून खड्याप्रमाणे बाजूला काढले. यांपैकी एकच असा निघाला की त्याने पुढची अगोदरच तयारी करून ठेवली होती. आपले कपडे बदलल्यामुळे तो पोलिसांच्या नजरेतून सुटला आणि इतर प्रवाशांत जाऊन मिसळला. पं. जगतराम भारद्वाज सुटले खरे, पण हत्यारांची पेटी राहिली डॉक्टरांच्या केबिनमध्ये. सर्वांच्या नजरा चुकवीत ते तिकडे गेले, त्यांनी पेटी उचलली आणि ते आता दारातून बाहेर पडणार एवढ्यात डॉक्टर त्यांच्यापुढे ‘ दत्त ’ म्हणून उभा. ‘ तू कोण आहेस ?’ असे विचारीपर्यंत ते केव्हाच पसार झाले. डॉक्टर पेटी उघडून पहात होते तेवढ्यात पं. जगत्‌राम जहाजावरून उतरलेसुद्धा.

जवळच आगगाडी उभी होती. गुरखा पलटणीच्या पहाऱ्यात सर्व क्रांतिकार-

कांना डब्यात कोंबण्यात आले. लाचारीनं माना खाली घातलेले आणि संतापाने धुमसत असलेले ते क्रांतिकारक मनातल्या मनात म्हणत होते, आपण निघालो कुठे जायला आणि चाललो कुठे. मुगलसराय स्टेशनावर कोळसापाणी घेण्यासाठी गाडी थांबली. सरदारांची नजर सहज फलाटावर गेली. पाहातात तो पं. जगतराम धोतर, पागोटे आणि शर्ट या पोशाखात. सर्व क्रांतिकारकांनी आपल्याला पाहावे म्हणून ते प्रत्येक डब्यापुढून सावकाश जात होते. त्यानंतर गाडी रायबिड येथे थावली. थोडा थोडा पाऊस पडत होता. एवढ्यात एक फौजी अधिकारी आपल्या डब्यातून उतरला आणि एकेकाचे नाव घेऊन त्याला खाली उतरण्यास सांगू लागला. संधी साधून भलत्याच्याच नावावर सरदार खाली उतरले. त्यांच्याप्रमाणेच आणखी काही लोक उतरले. थोडे दूर अंतरावर जाऊन ते सर्व एके ठिकाणी जमले आणि लाहोरला कुठे, केव्हा आणि कसे जमावयाचे ते ठरवून प्रत्येक जण वेगवेगळ्या मार्गाने गेला.

●

## ६. कलकत्ता ते पेशावर – सर्व पूल उध्वस्त करण्याचा बेत

या वेळी सरदारांचे वय बावीस वर्षांचे होते. कोठे जावे, कोणाशी विचारविनिमय करावा असा विचार करीत करीतच ते आपल्या गावी पोचले. त्यांचे विचार ऐकून तरुण पिढीचे रक्त सळसळू लागले; तर वयोवृद्ध म्हणत, 'असले काम फक्त दाढीमिशावाले लोकच करू जाणे; तुम्ही कशाला यात पडताय !' हे ऐकले की आझादांचे मन खट्टू होत असे. काही दिवसांनी ते लाहोरला गेले. तिथे असे ठरले की कार्यकर्त्यांची पहिली सभा 'लोडोवाल' स्टेशनजवळ भरवावी. लोडोवाल स्टेशन लुधियानाजवळच आहे. ही नोव्हेंबर १९१४ ची गोष्ट आहे. या सभेला बाबा निधानसिंह, बाबा प्यारासिंह, सरदार कर्तारसिंह सरावा, पं. जगतराम, अमरसिंह असे कितीतरी लोक

उपस्थित होते. या ठिकाणी मुख्यत: तीन विषयांवर चर्चा झाली. पैसे कसे जमवावे, हत्यारे मिळविण्यासाठी काय करावे, आणि बंगाली क्रांतिकारकांशी संपर्क कसा साधावा. पैसा कोणाकडे मागणे हा आत्मघाती मार्ग होता. कारण त्यामुळे बेत बाहेर फुटण्याची धास्ती होती. कर्तारसिंहाने सूचना मांडली की डाके घालवेत. भाई निधानसिंह विचारी होते. त्यांनी या अविचारापासून सर्वांना परावृत्त केले; म्हणजे तात्पुरते सर्वांनी त्यांचे म्हणणे मान्य केले. पण शेवटी करायचे ते केलेच. डाके घातले गेले, संपत्ती लुटली गेली. हत्यारे जमा करणे आणि बंगाली क्रांतिकारकांशी संपर्क साधणे हे काम सरदार आझादांवर सोपविण्यात आले.

कलकत्त्यापासून पेशावरपर्यंत सर्व पुलांवर लष्करी पहारा होता. हा पहारा सात नंबरच्या रेजिमेंटचा होता. बरेच सैनिक या लोकांच्या परिचयाचे होते. आणि पूल उडवायचे झाले तर याच लोकांची मदत मिळणार होती. बरेच सैनिक अनुकूलही होते. पण तसे काही करण्याचा प्रसंगच आला नाही. अंबाल्यामध्ये पुष्कळ लोक परिचयाचे होते. सहाराणपूरच्या आसपासचे जमीनदारही इंग्रजांचा द्वेषच करीत होते. ज्यांच्या पूर्वजांनी १८५७ च्या स्वातंत्र्यसमरात भाग घेतला होता असेही पुष्कळ होते. हे सर्व सरदारांना अनुकूल होते. कॉलेजमध्जे असलेले सहपाठी, सनातन धर्म कॉलेज, डी. ए. व्ही. कॉलेज – या सर्व कॉलेजांतील तरुणांना भेटून आपले म्हणणे सरदारांनी त्यांना पटवून दिले. लाहोरमध्ये भाई परमानंद यांची फार्मसी हा या लोकांचा एक मोठा अड्डाच झाला होता. ते – भाई परमानंद – स्वत: यात भाग घेत नसत; पण क्रांतिकारकांबद्दल सहानुभूती मात्र त्यांच्या मनात भरपूर होती.

सरदार पृथ्वीसिंह आझाद हिंदुस्थानात परत आल्याची बातमी पंजाबच्या पोलिसांना केव्हाच लागली होती, आणि ते त्यांना पकडण्याच्या खटपटीतही होते. अंबाला–लालडू सडकेवर तीन पोलीस चोवीस तास पहारा करीत होते. अंबाल्यामध्ये सरदार पृथ्वीसिंह शेकडो तरुणांना भेटत होते पण त्यांपैकी एकानेही त्यांची माहिती पोलिसांना दिली नाही.

# ७. माझा जीव घ्या, पण मला असे मारू नका

७ डिसेंबर १९१४ च्या रात्री सरदार पृथ्वीसिंह यांचा मुक्काम रजपूत छात्रावासात होता. रजपुतांचे वरिष्ठ नेते लहनासिंह नंगलावाले त्या रात्री तिथेच मुक्कामाला होते. पृथ्वीसिंह छात्रावासात आहेत हे कळताच ते त्यांना भेटायला आले; पण त्यांच्याशी बोलताना पृथ्वीसिंहांनी संयम राखला; कारण लहनासिंह यांना सरदार ही उपाधी त्यांच्या ब्रिटिश निष्ठे-बद्दल मिळाली होती. शिवाय ते भेटण्यासाठी आले त्यात काही विशिष्ट हेतू होता. त्यांना पोलिसांकडून बातमी लागली की पृथ्वीसिंह नाव बदलून भारतात आला आहे आणि पोलिसांनी जंगजंग पछाडले तरी हाती लागत नाही. लहनासिंह आणि पृथ्वीसिंह दोघांचे बोलणे चालू असतानाच एक तगडा शीख जवान तिथे आला आणि विचारू लागला, 'हे खालसा छात्रा-वासच आहे ना?' पृथ्वीसिंह 'नाही' म्हणाले तरी तो तिथेच थांबला. थोडेसे हसून त्यांनी त्याला विचारले, 'का बाबा, आणखी काही विचा-रायचं आहे?' मोठ्या नम्रतेने तो सांगू लागला, 'मी मोठ्या अडचणीत सापडलो आहे. माझा धाकटा भाऊ क्रांतिकारकांच्या तावडीत सापडला आहे. मला अशी पक्की बातमी लागली आहे की तो रजपूत छात्रावासात लपून राहिला आहे. आपण माझ्याबरोबर याल आणि मला मदत कराल तर फार बरे होईल.'

तेव्हा पृथ्वीसिंह म्हणाले, 'या, आपण त्या पलीकडच्या खोलीत बसून बोलू या; मग मी आपल्याबरोबर येईन.'

ते दोघे खोलीत जाऊन बसतात न बसतात तोच पृथ्वीसिंहाचे एक मित्र काहनसिंह सजादपूरवाले कुठून, कसे कुणास ठाऊक येऊन टपकले. त्या तरु-णाला पाहाताच ते उद्गारले, 'हा तर पोलिसाचा माणूस' आणि निघून गेले. पृथ्वीसिंहांना कल्पना आलीच होती. लहनासिंह केव्हाच निघून गेले

होते. तो शिपाई–अमरसिंह तयारीनेच आला होता. पहिला वार आपण करावा असा पृथ्वीसिंह यांचा बेत होता; पण कहनसिंह मध्ये आल्याने अमरसिंहाला वार करण्याची संधी मिळाली. त्याने झटदिशी खिशातून रिव्हॉल्वर काढले. अंतर फारच कमी होते, नाहीतर त्याने केव्हाच गोळी झाडली असती. पिस्तुलाची नळी पुढे येताच पृथ्वीसिंहांनी तीच पकडली आणि अमरसिंहाचा हात खाली दाबला व त्याच्या हातातून पिस्तूल काढून घेण्याचा प्रयत्न करू लागले. पृथ्वीसिंह त्याच्या पाठीशी होते. त्यांना पुढे ओढून त्यांच्यावर गोळी झाडण्याचा त्याचा प्रयत्न होता आणि ते त्याच्या हातातून पिस्तूल काढून घेण्याचा प्रयत्न करीत होते. शेवटी त्यांनी त्याच्या हाताला एक जोराचा झटका दिला त्याबरोबर पिस्तूल त्यांच्या हातात आले आणि ते दोघे एकमेकांपासून दूर फेकले गेले. हा त्यांचा जीवघेणा खेळ खोलीच्या बाहेर चालला होता. पृथ्वीसिंहांनी पिस्तूल दूर फेकून दिले; त्यांना काही त्याला ठार मारण्याची इच्छा नव्हती. कोणत्याही हिंदी माणसाचा प्राण घेणे त्यांच्या पार्टीच्या तत्त्वात बसत नव्हते. त्याचे केस पकडून त्याला खोलीत कोंडून घालण्याचा त्यांचा बेत होता. अचानक उडी मारून त्यांनी त्याचे केस पकडले; पण त्याचे दोन्ही हात मोकळे होते. त्याने मोठ्या चलाखीने त्यांच्यावर चाकूचा वार केला. त्यांनी जर केस सोडले नसते तर चाकू त्यांच्या पोटात निश्चितच घुसला असता. केसाची पकड सुटताच तो चाकू घऊन त्यांच्यावर धावला. अमरसिंह उंचा-पुरा तगडा जवान होता. पृथ्वीसिंह आझादांच्या मानेवर त्याचे दोन वार बसले. एक घाव तर इतका खोल होता की थोडा जर तो आणखी जोरात बसला असता तर त्यांचा प्राणच गेला असता. त्याचा तिसरा वार मात्र आझादांनी आपल्या हातावर झेलला ते बेभान झाले होते. त्यांनी त्याचा चाकू हिसकावून घेतला आणि एखादा सिंह आपल्या शिकारीवर तुटून पडावा तसे ते त्याच्या अंगावर चालून गेले. त्यांनी त्याला अलगद वर उचलले आणि एका भिंतीवर आपटले; पुन्हा उचलून, पुन्हा आपटले. ‘माझा जीव घ्या; पण मला असे मारू नका’ असे तो ओरडत असतानाच ते त्याच्या छातीवर बसले. त्याचा गळा दाबून जीव घेण्यासाठी त्यांनी त्याचा गळा धरला; पण रक्तस्राव इतका झाला होता की त्यांच्या हातात आता शक्तीच राहिली नव्हती. अमर-

सिंहाचा एक कान दिसत नव्हता आणि चेहऱ्याची एका बाजूची कातडी सोलून निघाली होती. पुढे दोघांनाही हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. पृथ्वीसिंह, एक क्रांतिकारी, त्यांची कोण एवढी काळजी घेणार ! सिव्हिल सर्जन इंग्रज होता. त्याचे सर्व लक्ष अमरसिंहाकडे होते.

ऑपरेशन टेबलावर जेंव्हा त्यांना ठेवण्यात आले त्या वेळी नेहमीच्या सवयीप्रमाणे त्यांच्याकडे पाहून त्या सर्जनने प्रथम एक शिवी हासडली. पेटंट शिवी Son of a bitch ( कुत्तेकी अवलाद ). आझादांनी पण त्याच्याच शब्दांत त्याच्यावर प्रहार केला. एवढेच करून न थांबता आसपासच्या लोकांना त्या शिवीचा अर्थही सांगितला. सर्जनसाहेब संतापले; पण करतात काय ! त्यांच्या हातात होते तेवढे त्यांनी केले. एखाद्या चांभाराने जुना जोडा शिवावा त्याप्रमाणे त्याने त्यांची जखम शिवली. ही घटना दि. ८–१२–१९१४ ची आहे. आजही ते सिव्हिल हॉस्पिटल उभे आहे.

●

# ८. पोलिसाचा मामा

या घटनेची वार्ता सर्व शहरभर आगीसारखी पसरली. दुकाने बंद झाली. शाळा-कॉलेजेही बंद ठेवण्यात आली. हे पाहून शहराची नाकेबंदी करण्यात आली. आसपास रजपुतांचीच वस्ती होती आणि सात मैलांवर होते आझादांचे लालडू गाव. इतका बंदोबस्त केला तरी आझादांना हॉस्पिटलमध्ये ठेवणे पोलिसांना सुरक्षित वाटले नाही; म्हणून रात्री बारा वाजता त्यांची खाट उचलून त्यांना तुरुंगात बंदिस्त खोलीत ठेवण्यात आले. १२′ × ८′ ची खोली १६′ उंच होती. एका कोपऱ्यात मातीचा ढीग, पाणी पिण्यासाठी एक खोजा आणि लघवीसाठी पण तसाच दुसरा एक. ज्या सर्जनने त्यांची जखम शिवली होती, तोच जेलचा अधिकारी होता. तो आझादांना पाहायला म्हणून आला आणि काहीही न बोलता मुकाट्याने परत गेला. त्याच्या चेहऱ्यावरून असं दिसत होतं की तो ती शिवी अद्याप विसरला नव्हता. हिंदु-

स्थानात आल्यावर प्रथमच एका हिन्दी माणसानं असं धाडस केलं असावं! ज्या रात्री आझादांना जेलमध्ये आणण्यात आले, त्या रात्री जेलमधील एकही कैदी झोपला नाही. गावात झालेल्या हरताळाच्या बातम्या त्यांच्या कानावर आदळत होत्या. सर्वांना वाटत होते की आता बंड होणार, तुरुंगावर हल्ला होणार आणि सर्व कैदी सुटणार.

तुरुंगात भंगी, पाणीवाले वगैरे सर्व कर्मचारी आझादांचे मित्र झाले होते. बाहेर काय चालले आहे याची खडान् खडा माहिती मिळत असे. याच वेळी त्यांच्या कोठडीत अमरनाथ आला. त्याच्याशी आझादांची मित्रता वाढली. हा अमरनाथ मोठा चतुर माणूस होता. तो आझादांबद्दल फार सहानुभूती दाखवी. आपला काही गुन्हा नसता पोलिसांनी पकडल्याचे तो सांगे आणि म्हणे की "काहीही करून तुम्ही एक पिस्तूल मिळवून द्या, नाहीतर बाँब तरी बनवायला शिकवा. आज ना उद्या मी सुटणार हे निश्चित, कारण मी काहीच गुन्हा केलेला नाही. सुटल्याबरोबर नाही त्या अधिकाऱ्याचा काटा काढला तर माझे नाव बदलून ठेवा. विनाकारण मला तुरुंग दाखवितो म्हणजे काय?"

त्याची बडबड आझाद एका कानाने ऐकत आणि दुसऱ्या कानाने सोडून देत. मग तो आणखी प्रश्न विचारू लागला, 'तुम्ही अमेरिकेहून बंड करण्यासाठी आलात; बंड तर झालेच नाही. पंडित जगतराम भेटले होते. ते म्हणत होते, दोन महिन्यांत बंड होईल; कुठे झाले?' हे ऐकले तेव्हा आझादांना शंका आली. इथे येण्याच्या अगोदर जगतराम याला कुठे भेटला आणि त्याने ओळख कशी दिली? मग त्यांनी सहज म्हणून त्याला विचारले, 'जगतराम कुठे भेटला?' उत्तर मिळाले, 'तीन महिन्यांपूर्वी पेशावरला भेटला.' आणि हे ऐकताच त्यांच्या शंकेचे निरसन झाले. तिथून पुढे आझाद त्याच्याशी मोकळेपणाने बोलू लागले. थंडीचे दिवस होते म्हणून खोलीच्या बाहेर शिपाई त्या दोघांना उन्हात बसून गप्पा मारण्याची अनुमती देत. एके दिवशी तो हट्टच धरून बसला. तो म्हणाला, 'आज तुम्ही मला बाँब तयार करण्याची कला शिकवाच.' तेव्हा आझाद म्हणाले, 'त्या काय एक-दोन वस्तू आहेत? इतक्या कशा तुझ्या आठवणीत राहातील? तू एक कागद-पेन्सिल घेऊन ये आणि मी सांगतो ते लिहून घे!' दुसरे दिवशी कागद-पेन्सिल घेऊन तो हजर. गंभीर चेहरा करून आझादांनी त्याच्याकडून कितीतरी आणा-भाका

घेतल्या; कोठेही, काहीही न बोलण्याचे वचन घेतले आणि शेवटी बॉंब तयार करण्यासाठी लागणाऱ्या सामानाची यादी सांगू लागले.

"एका स्वच्छ अशा पॅकबंद खोलीत एक शेगडी पेटव. ती चांगली धगधगीत पेटल्यावर त्यावर लोखंडाची कढई ठेव. ती अगदी लाल होईपर्यंत तापू दे. त्याला वेळ लागेल. तोपर्यंत मसाला तयार कर – एक शेर गंधक, एक शेर पोटॅश, एक शेर सोरा आणि एक शेर साखर ही सर्व वेगवेगळी वाटून मग एकत्र करून ठेव. जेव्हा कढई लाल होईल तेव्हा मन शुद्ध करून दरवाजा आतून बंद करून घे. मग ते सर्व जिन्नस त्या कढईत घालून हालवीत राहा. एका तासात एक छानसा बॉंब तयार होईल. तो घेऊन त्या अधिकाऱ्याच्या घरावर फेका – कोणीही वाचणार नाही."

लाला अमरनाथ समजायचं ते समजला; तरीपण हसण्याचा प्रयत्न करीत म्हणाला, 'भाऊसाहेब, असा बॉंब बनविला तर मीच मरून जाईन.' तेव्हा आझाद म्हणाले, 'भैय्या, आम्ही तर हेच शिकलो; आत्माहुती देऊनच दुसऱ्याला मारता येतं.' तो निराश झाला.

एका तासानंतर समजले की त्याची कोठडी रिकामी आहे. हा पोलिसचा माणूस आहे हे ओळखूनच आझादांनी त्याला मामा बनविले.

●

# ९. हजार बिघे जमिनीचा मालक : पॉकेटमार

सरदार पृथ्वीसिंह आझादांना तुरुंगातून कोर्टात घेऊन जाण्याचे धाडस पोलिसांना झाले नाही; म्हणून कोर्ट तुरुंगातच भरवावे असा विचार चालू असल्याचे बाहेर आले. तेव्हा सर्व बाजूंनी टीका होऊ लागली. शेवटी तुरुंगा-बाहेर खटला चालविण्याची व्यवस्था करण्यात आली. ही बातमी कानावर येताच आझादांचे वडील आणि चौधरी नारायणसिंह दोघेही भेटण्यासाठी आले. त्या वेळी वडिलांचे वय होते साठ. सहा फूट दोन इंच उंची, सुदृढ शरीर अशी शरीरसंपदा असल्यामुळे लोकांना वाटे की हे दोघे भाऊभाऊच

आहेत. काकांचे डोळे पाणावले; पण वडिलांनी आपले दु:ख प्रकट होऊ दिले नाही. आझादांच्याकडून त्यांना सर्व माहिती हवी होती. आजूबाजूला पोलीस असल्यामुळे बोलणार कसे ? शिवाय लाला अमरनाथ यांचे बोलणे ऐकायला टपलेलाच होता. त्याच्याविरुद्ध न्यायाधीशाकडे तक्रार करूनही काही उपयोग झाला नाही. तेव्हा आझाद हसत त्याला म्हणाले, 'तुम्हाला आमचे बोलणे ऐकायचे आहे ना; नुसते ऐकू नका, लिहून घ्या.' अमरनाथला वाटले आपण जिंकली. मोठ्या उत्सुकतेने त्यांच्याकडे पाहात त्याने पेन सरसावले. पण लिहून काय घेणार, कपाळ ? पिता-पुत्रांची भाषा त्याला कळेल तेव्हा ना. ते दोघे बर्मी भाषेत बोलत होते आणि त्याच्याकडे पाहून हसत होते.

आझादांनी आपल्या वडिलांना आपल्या जीवनाचा उद्देश स्पष्ट करून सांगितला. देशासाठी सर्वस्वाचं बलिदान करणे हा क्षत्रियाचा धर्मच असल्याची त्यांना आठवण करून दिली आणि त्यांचा आशीर्वाद घेतला.

मॅजिस्ट्रेटने केस सेशन जज्जाकडे सोपविली. केस चालविण्यासाठी वकील मिळणे कठीणच होते. क्रांतिकारकाची केस चालविणे म्हणजे स्वत:च आपल्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे होते. त्या वेळचे वातावरणच असे काही होते की जो कोणी देशभक्तांना मदत करील त्याचे जीवन बरबाद झालेच म्हणून समजा. त्याच्यावर काहीतरी आरोप ठेवून — शिपाई काहनसिंगचे उदाहरण आहेच. काहनसिंह आझादांचा सहपाठी. ते हॉस्पिटलमध्ये असताना तो त्यांना भेटायला आला एवढा त्याचा गुन्हा. त्याच्याकडून आझादांची माहिती मिळेना म्हणून त्याच्यावर चोरीचा आरोप ठेवण्यात आला आणि नानापरींनी त्याचा छळ करण्यात आला. अशा परिस्थितीत कोणता वकील यांचे वकीलपत्र घेणार ! वडिलांनी खूप खटपट केल्यानंतर लाला दुनीचंद अबालवी केस चालवायला तयार झाले. त्यांचीही त्या वेळी देशभक्तांत गणना होती. प्रामाणिकपणा आणि निर्भयता या दोन गुणांबद्दल त्यांची ख्याती होती.

आझादांवर ३०७ आणि ३५३ कलम लागू केले आणि काहनसिंगाला कलम ३९२ प्रमाणे गुन्हेगार ठरविण्यात आले. पोलिसाशी झटापट करून त्याचे पिस्तूल काढून घेण्याचा प्रयत्न करणे हा आरोप आझादांच्यावर होता आणि काहनसिंह – हजार बिघे जमिनीचा मालक — एका पोलिसवाल्याच्या खिशातून त्याचे पैशाचे पाकीट काढून घेतो असा आरोप त्याच्यावर ठेवण्यात

आला होता. याला कसलाही पुरावा नव्हता तरी इंग्रज न्यायाधीशांनी तो मान्य केला.

आझादांच्या विरुद्ध साक्षीदार मिळविण्यासाठी पोलिसांनी अनेक लोकांचा छळ केला. रावसाहेब बाजसिंह पीकीवाले खरे म्हणजे वयोवृद्ध; त्यांचेही फार हाल करण्यात आले. चौधरी हंसराज स्यालबा माजरीवाले यांना अनेक प्रकारे लालूच दाखविली आणि शारीरिक यातना पण दिल्या; सतत सात दिवस झोपू दिले नाही; पण व्यर्थ ! भारतीयाच्या इभ्रतीला धक्का लागेल असे काहीही त्यांच्या तोंडून बाहेर आले नाही. ज्यांच्या ज्यांच्याशी क्रांती-विषयी बोलणी झाली होती त्यांपैकी एकानेही पृथ्वीसिंह बंड करून इंग्रजी शासन उलथून पाडण्याचा प्रयत्न करीत आहे, असं सांगणं तर दूरच; नुसतं सूचितही केलं नाही. आझादांनी आपल्या जबानीत असे सांगितले की ज्याच्याशी आपली झटापट झाली आणि ज्याचा आपण खरपूस समाचार घेतला तो पोलिसच्या गणवेशात नव्हता. जे काही आपण केले ते तो एक डाकू आहे असे समजूनच केले. तो पिस्तूल दाखवून आपल्याला लुटणार अशी आपली समजूत झाली.

न्यायाधीशाला मदत म्हणून तीन असेसर्स होते. एक सुशिक्षित मुसलमान आणि दोन ग्रामीण भागातील सभ्य गृहस्थ. सर्वांनी एकमताने सांगितले की अभियुक्त निरपराधी आहे. न्यायाधीशांनी कारण विचारले तर तिघांपैकी एकही उठेना. शेवटी मोठ्या मुष्किलीने घाबरत घाबरत एक जण उभा राहिला, तर त्याच्या तोंडून शब्द फुटेना. त्याला घाम फुटला. त्या रजपूत मुसलमान असेसराने मात्र आपले मत स्पष्ट शब्दांत सांगितले. बाकीच्या दोघांनाही काही बोलावयाचे आहे; पण पोलिसांना घाबरून ते काही बोलत नाहीत हे न्यायाधीशाने ओळखले आणि त्याने पोलिसांना बाहेर जाण्यास सांगितले. पोलीस निघून जाताच त्या दोघांना वाचा फुटली. 'खानसाहेब' सांगतात ते खरे आहे असे त्यांनी मोकळेपणाने सांगितले. तेव्हा सरकारी वकिलाला धास्ती पडली की आता पृथ्वीसिंह सुटणार. तेव्हा त्याने कोर्टाला अशी विनंती केली की त्याला एकदम मुक्त न करता नजरकैदेत ठेवावे. न्यायाधीश गोंधळात पडले आणि निकाल दुसरे दिवसावर टाकला. इंग्रजांच्या राज्यातला न्याय असा की दोघांनाही शिक्षा झाली. पृथ्वीसिंहांना दहा वर्षे

सक्तमजुरी आणि काहनसिंगला दोन वर्षे. हायकोर्टात अपील केले, तर निर्दोष सुटण्याची खात्री आहे. अपील करावे असे लाला दुनीचंदाचे मत होते; पण पृथ्वीसिहांनी ते नाकारले.

●

## १०. आता काय पीठ दळू ?

जेलच्या दरवाजातच एका वॉर्डरने त्यांना त्यांचा नवा पोशाख दाखविला. तो नुकताच एका कैद्याने अंगातून काढून ठेवला होता. पृथ्वीसिहांनी आपल्या मनाची तयारी ठेवलेलीच होती. त्यांनी ते कपडे उचलले मात्र त्यातून बदाबदा किडे खाली पडले. त्या वॉर्डरकडे पाहून ते थोडेसे हसले आणि म्हणाले, 'आपली परवानगी असली तर खोलीत गेल्यावर मी कपडे बदलतो.' परवानगी मिळाली. आत गेल्यानंतर त्या कपड्यातील लंगोटी तेवढी त्यांनी उचलली आणि ती जमिनीवर खूप घासली. त्यांचे लंगोटी लावून घेणे होते न होते तोच मक्याने भरलेला ४० पौंडांचा एक डबा त्यांच्यापुढे ठेवण्यात आला आणि असे बजाविण्यात आले की पाच वाजेपर्यंत जर हे दळण दळून झाले नाही तर उघड्या अंगावर फटके खावे लागतील.

जेलच्या आवारात पाऊल टाकले तेव्हाच तिथल्या जीवनाला लायक बनण्याचे पृथ्वीसिहांनी ठरविले. त्यांनी आपले दळण पाच वाजायच्या आतच संपविले. तेव्हा ते इतके दमून गेले होते की त्यांच्यात उभे राहण्याचीही शक्ती नव्हती. त्यांनी कोपऱ्यातील मातीच्या ढिगावरच अंग टाकून दिले आणि अंगावर घोंगडे ओढून घेतले. अंगातून घामाच्या धारा फुटल्या. अधिकारी जेव्हा पाहायला आले तेव्हा त्यांना झोपलेला दिसला आणि मक्याचा डबा पूर्वी होता तसा बंद. ते म्हणाले, 'आता तुला झोपता येणार नाही, मका दळला पाहिजे अगोदर.' पृथ्वीसिंह हसत हसत म्हणाले, 'आता काय पीठ दळू ? दळण एकदा दळायचं की दोनदा ?' डबा उघडून पाहिला तर खरंच; मक्याच्या पिठाने डबा भरलेला. त्याचा विश्वास बसेना. त्याला

वाटले वरवर पीठ असेल आणि खाली मका तसाच. त्याने आत हात घातला तेव्हा त्याची खात्री झाली. तरीपण त्याने कैदी वॉर्डरला दम देऊन विचारले, "हा मका कोणी दळून दिला ते सांग.' पृथ्वीसिंहांना राग आला. ते म्हणाले, 'त्याला का उगीच बोलता ? खोटं वाटत असेल तर उद्या तुम्ही माझ्याजवळ येऊन बसा आणि पाहा.'

ज्या डॉक्टरने त्यांच्या जखमेला टाके घातले होते तोच त्या जेलचा मुख्य अधिकारी होता. काही दिवसांनंतर त्यांना दुसऱ्या कोठडीत हलविण्यात आले; फाशीच्या कैद्यांना या कोठडीत ठेवीत असत. दुसरे दिवशी त्या खोलीत एक जाते आणून जमिनीवर ठेवण्यात आले. बसून दळण्यापेक्षा उभे राहून दळणे अधिक सोपे म्हणून तसे जाते आपल्यास मिळावे अशी विनंती त्यांनी त्या अधिकाऱ्याला केली. तेव्हा तो उपहासाने हसून म्हणाला, 'तुला कष्ट व्हावेत म्हणून तर ही व्यवस्था केली आहे.' हे उत्तर ऐकून पुन्हा म्हणून कधी कसलीही सवलत त्या अधिकाऱ्याजवळ मागायची नाही असे त्यांनी ठरविले.

फेब्रुवारीची चोवीस किंवा पंचवीस तारीख असावी. जेलचा दरवाजा उघडताच एक पोलीस शिपाई समोर उभा राहिला. तो पृथ्वीसिंहांना नाना परींनी समजावू लागला. 'ज्या दिवसाची तुम्ही वाट पाहात आहात तो दिवस कधीच उगवणार नाही. तुझे सर्व क्रांतिकारी साथीदार पकडले गेले आहेत. तुला आपला जीव वाचवावयाचा असेल तर खरं खरं सांगून मोकळा हो. तुझ्यावरील खटला काढून घेण्यात येईल. तुला पोलीस खात्यात मोठी मानाची जागा पण मिळेल.' आझाद मोठ्याने हसून म्हणाले, 'तू काय म्हणतो आहेस; मला काही समजत नाही. माझे कोणी मित्र क्रांतिकारक नाहीत आणि मी कोणाचा साथी नाही."

काही दिवसांनंतर आझादांना लाहोर सेंट्रल जेलमध्ये ठेवण्याचे ठरले. अंबाला जेलमधील बरेचसे शिपाई आता त्यांचे चांगले मित्र झाले होते. यांच्या बदलीची बातमी लालडूला त्यांच्या वडिलांपर्यंत गेली. पिता-पुत्रांची भेट स्टेशनवर झाली. लाहोर जेलमध्ये त्यांना १४ नंबरच्या कोठडीत ठेवण्यात आले. थोड्याच दिवसांत पुन्हा कोठडी बदलण्यात आली. नव्या कोठडीत पाऊल टाकतात तो समोर बाबा सोहनसिंह. नंतर पंडित जगतरामही

तिथेच आले. एकमेकांना भेटताना त्यांच्या मनात पुन्हा तोच प्रश्न, 'इथे असे तुरुंगात बसण्यासाठीच का आपण अमेरिका सोडली ?'

२३ फेब्रुवारीनंतर जे क्रांतिकारक पकडले गेले त्यांच्यापैकी ९ माफीचे साक्षीदार बनले. ८५ लोकांवर वॉरंट सुटले. त्यांपैकी फक्त ६५ लोकांनाच, पोलीस कोर्टात हजर करू शकले. लाहोर सेंट्रल जेलची एक बरॅकच कोर्टरूम झाली. न्यायदानाचे नाटक सुरू झाले. हे नाटक करून इंग्रजांना असे सिद्ध करावयाचे होते की इंग्रजांचे सरकार उलथून पाडण्यासाठी खटपट करणारे लोक मूर्ख आहेत आणि ज्यांनी या क्रांतिकारकांना पकडून दिले आहे तेच खरे देशभक्त आहेत.

लाहोरचे एक प्रसिद्ध वकील–मिस्टर पेटमन–सरकारी वकील नेमण्यात आले. सर्वच क्रांतिकारी लोकांनी आपला बचाव केला किंवा ते मूग गिळून बसले तर गदरपार्टीचे हे क्रांतिकारक देश स्वतंत्र करण्यासाठी जिवाचे रान करीत आहेत ही गोष्ट लोकांसमोर कशी येणार ? तेव्हा सर्वानुमते असे ठरले की काही लोकांनी छातीठोकपणे सांगितले पाहिजे की आम्ही इंग्रज सरकारचे दुष्मन आहोत. आमच्या देशावर आमचे प्रेम आहे आणि देश-द्रोहाबद्दल आमच्या मनात तिरस्कार आहे.' पार्टीतील सात लोकांनी सर्व जबाबदारी आपल्या शिरावर घ्यावी. या सात लोकांची नावे अशी — बाबा सोहनसिंह भकना; पं. जगतराम भारद्वाज हरियाना; सरदार कर्तारसिंह सरावा, विष्णु गणेश पिंगळे; सरदार जगतसिंह; सरदार हरनामसिंह आणि पृथ्वीसिंह, लालडू.

यांपैकी सहा जणांनी कोर्टात तोंडी जबाब दिला. फक्त पं. जगतरामने लेखी दिला. त्यामध्ये त्यांनी, इंग्रजांनी केलेल्या अत्याचाराचा पाढा वाचला. आणि असा सवाल केला की या अत्याचाराबद्दल प्रत्येक इंग्रजाला फाशीची शिक्षा का देऊ नये ? ही त्यांची कैफियत आजही 'लाहोर साजिरा केस'च्या फाइलीत वाचावयास मिळेल.

# ११. स्नान झाले; पण फाशी राहिली

पृथ्वीसिंहानी आपल्या जबानीत इंग्रज गुप्त पोलिसांना मूर्ख ठरविले. इंग्रज न्यायाधीशाला उद्देशून ते म्हणाले, 'अमेरिकेपासून कलकत्त्यापर्यंत बेंबीच्या देठापासून ओरडत आलो की इंग्रजांचे आम्ही शत्रू आहोत; हिंदुस्थानात पोचल्यावर त्यांचा नायनाट करणं आमचा धर्म आहे.' तरी तुमचे हे चलाख पोलीस काही आम्हांला पकडू शकले नाहीत आणि आज या भोळ्या बिचाऱ्या शेतकऱ्याला पकडून ठेवले आहे. क्रांतिकारकांच्या वतीने सरकारनेच वकील दिला होता त्याची रोजची फी होती फक्त वीस रुपये आणि सरकारी वकिलाला रोजचे रुपये दोनशे मिळत. यावरून बचाव करणाऱ्या वकिलाची पात्रता कळून येईल. अमरसिंह हा पृथ्वीसिंहाचा लहानपणापासूनचा मित्र. तो होता सरकारचा साक्षीदार. त्याला पृथ्वीसिंहाची सर्व माहिती होती. ओळख परेडीच्या वेळी बाकीच्या लोकांना त्याने एक फेरीतच ओळखले. पृथ्वीसिंहाच्या पुढून तो तीन वेळा गेला तरी हाच पृथ्वीसिंह असे नेमके काही त्याने सांगितले नाही. न्यायाधीशाने त्याला धमकावले तेव्हा लांबूनच पृथ्वीसिंहाकडे त्याने बोट दाखविले. 'मग अगोदरच का नाही सांगितलेस ?' असे न्यायाधीशाने विचारताच 'त्याचा चेहरा थोडा काळवंडला आहे.' असे तो म्हणाला. हे ऐकून एक दिलेर वकील म्हणाला, 'चेहरा त्याचा काळवंडला आहे की तुझा ?' हे नाटक जवळजवळ पाच महिने चालले. निकाल लिहिण्यासाठी जज्जसाहेब हिल स्टेशनला दोन महिने राहिले. कित्येकांना फाशी झाली; कित्येकांना जन्मठेप !

१४ सप्टेंबर १९१५ या दिवशी सर्व कैद्यांना गटागटाने कोर्टात आणले गेले. आझादांच्या गटात त्यांना एकट्यालाच फाशीची शिक्षा झाली होती. ते खुषीत होते. कोठडीत नेल्यानंतर कुठे कुठे कोणाकोणाला ठेवण्यात आले हे समजायला काही मार्ग नव्हता. पोलीस काही सांगेनात. इतक्या लोकांना फाशी देण्याचा पोलिसांच्या आयुष्यातही पहिलाच प्रसंग होता. मग या कैद्यांनीच युक्ती काढली. आरंभी ते सर्व एकदम जोरजोरात ओरडले आणि

मग ठरविले की आपल्या आपल्या कोठडीतून आपले नाव आपणच ओरडून सांगायचे. अशा रीतीने मरेपर्यंत आपल्याला कोणी कोणी साथ दिली हे समजणार होते.

फाशीची शिक्षा झालेले हे चोवीस जण मृत्यूची वाट पाहात होते. सकाळ झाल्यावर प्रत्येकाच्या हातात एक एक टिन पॉट दिले. समोर गार पाणी होते. आंघोळ करण्याचा हुकूम झाला. फाशीच्या अगोदर स्नान झाले पाहिजे. एका वेळेला तीन तीन कैद्यांना फाशी देण्याची सोय होती. हिंदू धर्मात अंत्य-संस्काराचे वेळी दहनक्रिया करण्यापूर्वी प्रेताला स्नान घालण्याची प्रथा आहे. जेलच्या अधिकाऱ्यांनी विचार केला एवढ्या लोकांच्या प्रेतांना स्नान घालीत बसण्यापेक्षा त्यांचं त्यांनीच स्नान केलेलं काय वाईट. नाहीतरी आता ती प्रेतेच होतील की. सर्वांचे स्नान झाले. इतर कैदीही बाहेर आले. सबंध दिवस वाट पाहण्यात गेला. दुसरा दिवस उगवला. पुन्हा स्नान; पुन्हा प्रतीक्षा. तीन दिवस असे झाले. फाशी देण्यासाठी एक जल्लाद नेमलेला असतो. मासिक पगाराशिवाय त्याला एका फाशीला दहा रुपये असे आणखी मिळतात.

भाई परमानंद प्रख्यात वंदनीय, माननीय नेत्यांपैकी एक व्यक्ती. त्यांच्या-वर कसलाही गुन्हा शाबीत झाला नाही, तरीही त्यांना जेव्हा फाशीची शिक्षा झाली तेव्हा देशात खूपच खळबळ माजली. व्हाइसरॉयच्या कौन्सिलात यावर दोन महिने विचार चालू होता. बऱ्याच लोकांनी अपील करण्याचा सल्ला दिला आणि बऱ्याच जणांनी ते केलेही. आझादांनी अपील केले; पण त्यात काय लिहिले असेलसे वाटते ? त्यांनी लिहिले की " आपण आजपर्यंत जे काही केले ते सर्व विचारपूर्वकच केले आहे. तो गुन्हा आहे असे जर इंग्रज सरकारला वाटत असेल तर त्यांना योग्य वाटेल ती शिक्षा त्यांनी मला द्यावी." हे विचित्र अपील पुढे पाठविण्यात आले किंवा नाही काही कळायला मार्ग नाही.

अपिलाचा निकाल लागेपर्यंतचे दिवस अगदी कंटाळवाणे गेले. कुठे जाणे नाही येणे नाही; जेवणच काय पण आंघोळसुद्धा गजाआड. वाघसिंहांना ज्याप्रमाणे गजांतून जेवण पिंजऱ्यात ठेवतात; तसेच इथेही ठेवण्यात येई. दरवाजा फक्त दोन मिनिटे उघडला जाई. भंगी येऊन साफ करून जाई. असे दि. १५–११–१९१६ पर्यंत चालले. त्यानंतर एक दिवस दरवाजे उघडले गेले आणि सर्वांना दुसरीकडे हलविण्यात आले. किती जण फाशी गेले

हे समजलेच नाही. तेव्हा जुनीच युक्ती अमलात आणली. आपले नाव घेऊन प्रत्येक जण ओरडला, तेव्हा सात नावे आली नाहीत. ते फाशीच्या खोलीत राहिले; म्हणजे त्यांची फाशीची शिक्षा कायम झाली. त्या दिवशी त्यांच्या-पैकी कोणीही जेवले नाही. दुसरे दिवशी सर्वांच्या पायांत पाच पाच शेराच्या बेड्या ठोकण्यात आल्या आणि गळ्यात एक एक बिल्ला अडकविला. सुटकेचे वर्ष १९५१ लिहिलेले. एके दिवशी संध्याकाळी सर्व कैद्यांना घोडागाडीत घालून लाहोरजवळच्या मोगलपुरा स्टेशनवर नेण्यात आले. तिथे रेल्वेचे डबे अगोदरच आणून ठेवले होते. सर्व कैद्यांना त्यात बसविले. त्या स्टेशनवर मेल कधी थांबत नाही; पण त्या दिवशी ती थांबविण्यात आली आणि हे डबे तिला जोडण्यात आले. स्वातंत्र्याची नशा चढलेले ते लोक; त्यांनी जेव्हा गायला आरंभ केला तेव्हा प्लॅटफॉर्मवरील सर्व लोक त्यांच्या डब्यापुढे गोळा झाले. पुढे ज्या ज्या स्टेशनवर गाडी थांबे त्या त्या स्टेशनवर असेच लोक गर्दी करीत. 'हे कोण चालले आहेत ? कुठे चालले आहेत ?'

●

## १२. अंदमानचा खुदा

इ. स. १९१५ मध्ये देशाचे वातावरण कसे होते ते या घटनेवरून समजून येईल. पाच महिने खटला चालला, चोवीस कैद्यांना देशप्रेमाबद्दल फाशीची शिक्षा झाली; त्यांतले सात जण फाशी गेलेही, बाकीच्यांना काळे पाण्यावर पाठविले जात आहे तरीही लोक विचारतात 'हे कोण आहेत ?' लाहोर-पासून कलकत्त्यापर्यंत त्याना सहानुभूती दाखविणारे फारच थोडे लोक भेटले. कैद्यांना दोघादोघांत एक हातकडी होती. शौचाला एकजण गेला तर दुसऱ्या-लाही त्याच्याबरोबर बसावे लागे. असा चाळीस तासांचा प्रवास झाला. ते हावरा स्टेशनवर आले तेव्हा तेथील बंगाली क्रांतिकारकांनीही त्यांची काहीच विचारपूस केली नाही असे आझाद म्हणतात. तेथेही 'हे कोण ?' असाच प्रश्न विचारण्यात आला. तिथून अलीपूर सेंट्रल जेल आणि मग 'महाराजा'

या नावाच्या जहाजावरील प्रवास. मातृभूमी सुटली आणि परत इथे पाय लागतीलच अशी खात्री नाही. बोट तिसऱ्या दिवशी अंदमानला पोचली.

जहाजावरून उतरताच जेलकडे नेण्यात आले. या तुरुंगात एकंदर सातशे चाळीस खोल्या आहेत. क्रांतिकारकांना सोडून बाकी सर्व कैद्यांना आत सोडण्यात आले. इथल्या जेलरचे नाव होते बारीबाबा. तो आयर्लंडचा राहाणारा. या बारीबाबाला सर्व कैदी अंदमानचा खुदा मानीत. सर्व सत्ता त्याच्या हातात होती. इरसाल कैद्यांना वठणीवर आणण्यासाठी आवश्यक ते पाषाणहृदय त्याच्याजवळ होते. इंग्रजांचे राज्य उलथून पाडू पाहणारे क्रांतिकारी कैदी येणार असल्याची बातमी त्याला होतीच. त्यांचे स्वागत करण्याची सर्व तयारी झाली होती. तो खुजा पण शरीराने भरभक्कम होता. आझादांना पाहिल्याबरोबर तो म्हणाला, "बंबवाला स्वराज मांगटा है, कोल्हू मिलेगा" बंगालचे सर्व क्रांतिकारी बंबवाले (बाँबवाले) म्हणूनच तिथे ओळखले जात. त्याचं ते ध्यान पाहून सर्वांना हसू आले.

इतर ठिकाणेच्या जेलपेक्षा इथला एक विशेष म्हणजे इथे कैद्यांना पादत्राणे वापरू देत नसत. मागे काही कैद्यांनी अधिकाऱ्यांची जोड्याने पूजा केली, तेव्हापासून हा निर्बंध अमलात आला. पहाटे पाच वाजताच खोल्यांचे दरवाजे उघडण्यात आले. सर्वांची गणती झाली. शौचमुखमार्जनासाठी दहा मिनिटे देण्यात आली. हा कार्यक्रम आटोपल्यानंतर प्रत्येकाला लोखंडाची दोन भांडी देण्यात आली. एक पाणी प्यायला आणि दुसरे जेवणासाठी. मग सर्वांना कांजी मिळाली आणि परत कोठडीत बंद करण्यात आले. तिथे एक लाकडाची फळी आणि सोटा ठेवलेला होता. जवळच नारळाच्या शेंड्यांचा ढीग घातलेला होता.

अंदमान बेटावर नारळाचा फार मोठा व्यवसाय आहे. नारळीच्या पानांपासून चटया तयार होतात; खोबऱ्याचे तेल निघते, त्याचे आवरण कुटून त्याचा धागा तयार करतात आणि त्याचे दोर वळतात. काथ्याच्या आणि करवंटीच्या सुद्धा अनेक वस्तू तयार होतात. नारळाचे आवरण जर हिरवे असेल तर धागा काढणे सोपे जाते; पण ते वाळून गेले असले तर कुटून कुटून हात दुखून येतात. सकाळी आठ वाजता काम सुरू होते. संध्याकाळी चार वाजण्याच्या आत अर्धा शेर वजनाचा धागा तयार करून द्यावा लागे. ज्याच्या

हातून हे काम होत नसे त्याला आपल्या उघडचा पाठीवर वेताचे फटके खावे लागत. सहा महिने पायांत बेडचा, चोवीस तास हात वर करून बांधलेले आहेत अशा अवस्थेत सात सात दिवस उभे राहाणे, नेसायला तरटाचे वस्त्र देणे, अशा अनेक प्रकारच्या शिक्षा त्या अपराध्याला भोगाव्या लागत.

●

## १३. फटक्यांची शिक्षा

अंबाल्याजवळ शहाबाद नावाचे एक गाव आहे. तिथला एक डाकू रहिमत अलीखाँ काळचा पाण्याची शिक्षा भोगत होता. लालडूचा कोणी चौधरी कैदी म्हणून आला असल्याचे त्याला समजले. अधिकाऱ्यांशी सतत भांडत असल्यामुळे तो प्रसिद्ध झाला होता. त्याने आझादांना निरोप पाठविला की तुला नारळाची शेंडी कुटण्याचे कारण नाही. संध्याकाळी अधिकारी येण्याच्या आत धाग्याचे बंडल तुझ्या हातात पडेल आणि तसे ते बंडल आले. त्यांच्या हातात ते बंडल पाहून अधिकारी हसत सुटला. दुसऱ्या एकालाही ते काम पूर्ण करता आले नव्हते.

'हे काम कोणी केलं ?' गंभीरपणे त्याने विचारले. तितक्याच गंभीरपणे उत्तर आले, "मी" तो पुढे काहीच बोलला नाही. बाकी सर्वांना त्याने सांगितले की आज पहिलाच दिवस आहे म्हणून माफ; उद्या मात्र जर काम पूर्ण झाले नाही तर शिक्षा होईल. यावर कोणीही काही बोलले नाही. भाई परमानंद मात्र ती धमकी ऐकून हसले. पोलीस अधिकाऱ्याला ते लागले आणि त्यांनी परमानंदांना बारीबाबासमोर उभे केले. त्यांना पाहिल्याबरोबर एक शिवी हासडून बारीबाबाने त्यांचे स्वागत केले. इंग्रजी शिवीचा जबाब जर इंग्रजीत दिला तर ते इतरांना समजणार नाही म्हणून परमानंदांनी हिंदी आणि पंजाबी भाषेत बारीबाबावर शिव्यांची लाखोली वाहिली. त्या अंदमानच्या खुदाला ते कसे सहन होणार ? परमानंदांना मारण्यासाठी तो पुढे झाला; पण त्याचा हात त्यांच्यापर्यंत पोचण्यापूर्वीच त्याचे पोट त्यांना

भिडले. परमानंदांना आयतीच संधी मिळाली. त्यांनी त्यापुढे येणाऱ्या पोटा-वर अशी एक लाथ मारली की बारीबाबा पलीकडच्या खुर्चीवर जाऊन आपटला. अर्थात त्याची शिक्षा पंडितजींना भोगावीच लागली. इतर अधि-कारी दंडे घेऊन त्यांच्या अंगावर तुटून पडले. आणि त्यांना खूप बदडून काढले. एवढ्यावरच हे प्रकरण संपले नाही. त्यांना वीस फटक्यांची शिक्षा देण्यात आली.

फटके मारण्याचा विधी काही तसा सोपा-सुटसुटीत नव्हता. एक बोट जाडीची वेताची छडी पाण्यात भिजत घालून ठेवलेली असे. तुरुंगातील एखाद्या दणकट डाकूला हे काम देण्यात येई. फटके मारण्याची त्याची शक्ती कायम टिकावी म्हणून त्याला रोज त्याच्या कैद्याच्या खुराकावरोबर मांस आणि दूध देण्यात येई. फटके मारण्यापूर्वी कैद्याला उघडा करून त्याचे हात-पाय बांधत. त्याच्या कुल्ल्यावर एक पातळ ओले फडके घालीत. तो फटके मारणारा मग पट्टा फिरविल्याप्रमाणे आपल्या दोन्ही बाजूंला ती छडी फिर-वून त्या कैद्याच्या कुल्ल्यावर सप्दिशी एक फटका मारी. फटका बसताच कातडे फाटून रक्ताच्या चिळकांड्या उडत. एक फटका मारल्यानंतर, लवकर थकून जाऊ नये म्हणून त्या फटके मारणाऱ्याला एक मिनिट विश्रांती घेण्याची परवानगी असे. भाई परमानंदांना असे वीस फटके मारून त्यांच्या कोठडीत त्यांना टाकून देण्यात आले.

ही बातमी त्यांच्या सहकाऱ्यांना लागल्याबरोबर सर्वांनी असे ठरविले की या कृत्याचा निषेध म्हणून इथून पुढे आपल्याला पसंत असेल तेच आणि तेवढेच काम करावयाचे. त्या वेळी मेजर मरीसाहेब हा तुरुंग प्रमुख होता. त्याला जेव्हा हे कळले तेव्हा त्याने प्रत्येकाच्या कोठडीसमोर उभे राहून सहा महिने पायांत बेड्या आणि सात दिवस चोवीस तास हातकड्या घालून उभे राहण्याची शिक्षा सर्वांना फर्माविली.

तेथून पुढे सुमारे सहा वर्षे क्रांतिकारी कैदी आणि जेलचे अधिकारी यांच्यात एक प्रकारचे युद्धच सुरू झाले. आझादांच्या बरोबर भाई केसरसिंह, शेरसिंह, बिशनसिंह पहेलवान असे एकापेक्षा एक बलदंड कैदी होते. त्यांना पाहण्यासाठी गोरे लोकही येत. या लोकांच्याकरिता, कैद्यांकरिता स्पेशल हातकड्या बनवाव्या लागल्या. एक दिवस वॉर्डरांना हुकूम मिळाला की या

बिशनसिंगाला चांगला चोपून काढा. हातात दंडे घेऊन ते वॉर्डर बिशनसिंहाजवळ जाऊ लागले तेव्हा बिशनसिंहाने आपल्या वेड्यांची दोरी कमरेला बांधली आणि आव्हानार्थक पंजाबी भाषेत ओरडला, 'आओ अग्गे, जिणे मौत लेणी है. दोनो टंगे फडके चीर डालूंगा.' सहा फूट तीन इंच उंची; २५० पौण्ड वजन असा हा बिशनसिंह पंजाबचा प्रसिद्ध पैलवान होता. त्याचे ते रौद्ररूप पाहून वॉर्डर जागच्या जागीच थांबले. जवळ गेलो तर तो काही आपल्याला जिवंत ठेवणार नाही अशी सर्वांची खात्री झाली होती. बारीबाबा लांबूनच 'मारो; पकडो' असे ओरडत होता; पण त्याची सुद्धा पुढे जाण्याची छाती झाली नाही. असे असले तरी हातापायांत वेड्या असलेला माणूस करून करून काय करणार ! बाबा मानसिंह नावाचा एक वृद्ध कैदी. त्याचा इतका छळ झाला की तो आता दोन-चार दिवसांचाच सोबती राहिला असल्याची दुःखद बातमी बाहेर आली. तेव्हा पुन्हा एकदा त्याच्या निषेधार्थ अधिकाऱ्याजवळ कसलीही सवलत मागायची नाही आणि त्यांच्या कसल्याही आज्ञेचे पालन करायचे नाही असे त्यांनी ठरविले. यांना वठणीवर आणण्यासाठी अनेक उपाय करण्यात आले. पायांत दंडाबेडी, हातकड्या घालून वर हात करून उभे राहण्याची शिक्षा, खुराकात कपात, रात्रंदिवस कोठडीत बंद, वगैरे शिक्षा देण्यात आल्या. पुढे सर्वांच्या संमतीने बाबा सोहनसिहांनी भूकहरताळ सुरू केला. आणि त्यांच्या जोडीला मग आझादांनीही आपले उपोषण सुरू केले.

●

# १४. सरदारांचे उपोषण

यापूर्वी त्यांनी कधीही उपोषण केले नव्हते; एकादशी सुद्धा नाही. आपल्याबरोबरचा एक वृद्ध साथीदार हाल सोशीत मरणार आहे एवढे कारण त्यांना पुरेसे होते. बाबा सोहनसिंह भकना एक आदर्श तपस्वी पुरुष होते. या

अन्नसत्याग्रहामागे त्यांचीच प्रेरणा होती. उपोषणात पाणी प्यायले तरी चालते; पण उत्साहाच्या भरात आझादांनी पाणीही घेतले नाही. सर्वांनी त्याना उपोषणापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला; स्वतः भकना यानी पण चिठ्ठी लिहिली; त्यांनी कोणाचेही ऐकले नाही. स्वाभिमानाने जगावयाचे असेल तर माणसाने मृत्यूची पर्वा करता उपयोगी नाही हेच त्यांना आपल्या साथीदारांना सुचवावयाचे होते. सात दिवस त्यांनी असा निर्जळी उपास केला. सातव्या दिवशी रात्री त्यांना अगदी राहावेना; प्राण व्याकूळ झाले; आता पाणी घेतले नाही तर आपण मरणार अशी अवस्था झाली आणि ते पाण्याच्या भांड्याजवळ गेले; पण तेवढ्यात त्यांना आपले साथीदार दिसू लागले. 'मरणाला भीत नाही म्हणणारा तूच काय ?' असे विचारून ते आपला उपहास करीत असल्याचा त्यांना भास झाला आणि पाणी न पिताच ते परत फिरले. पण तहानेने जीव इतका कासावीस झाला होता की ते पुन्हा त्या भांड्याजवळ गेले आणि पूर्वीसारखेच परत आले. असे तीन वेळा घडले तेव्हा त्यांनी मोहात पाडणारे पाण्याचे ते गाडगे उचलून पहारेकऱ्याच्या तोंडावर फेकून दिले.

दुसऱ्या दिवशी त्यांना घोंगड्यात गुंडाळून दवाखान्यात नेण्यात आले. तिथे डॉक्टरांनी तपासले ! पुष्कळ समजावले; पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. तेव्हा परत त्यांना त्यांच्या कोठडीत आणून ठेवले. पुढे सहा दिवस असा कार्यक्रम चालला. आता त्यांना तहानही लागेनाशी झाली. तेरा दिवसांनी हॉस्पिटलमध्येच एका खोलीत त्यांना ठेवण्यात आले. त्याच दिवशी काही पोलीस बरोबर घेऊन डॉक्टर आले. जमादार कैद्यांनी त्यांचे हात, पाय आणि डोके दाबून धरले. रबराची एक नळी त्यांच्या नाकात घालण्यात आली आणि त्यातून अर्धा शेर दूध त्यांच्या पोटात गेले, पण ते लोक बाजूला झाल्याबरोबर त्यांनी घशात बोटे घालून ओकारी काढण्याचा प्रयत्न केला; पण असफल झाला. रोज नाकावाटे दूध पोटात जाई; ओकून टाकण्याचा प्रयत्न असफल होई. असे दोन महिने चालले होते. हे अनशन आणि हरताळ वर्तमानपत्रात छापून आले. देशवासी लोकांना क्रांतिकारकांच्या या हरताळाचे कारण समजले; आपला हेतू साध्य झाला म्हणून बाबा सोहनसिंह यांनी आपले उपोषण थांबविले. सरदारांनी मात्र

तीन महिने तसाच जीवनक्रम चालू ठेवला. पोटात गेलेले दूध पचत असल्यामुळे या अवधीत त्यांना कधी आजारपण आले नाही की मरणाची भीती निर्माण झाली नाही.

एक दिवस त्यांना वॉर्डरकडून कळले की बाबा रूढसिंह आजारी आहेत. त्यांना औषधपाणी दिले जात नाही. ते काही खाऊ शकत नाहीत; दिवसा झोपण्यासाठी त्यांना घोंगडे पण मिळत नाही. आझादांना गादी होती, कांबळे होते, रोज दूध पोटात जात होते. लोकांच्या दृष्टीने ते मरणासन्न होते; पण खरा मरत होता रूढसिंह. आझादांना वाईट वाटले. त्यांनी स्वतःचे अंथरूण-पांघरूण बाहेर फेकून दिले. जेलचे अधिकारी, त्यांचे साथीदार, डॉक्टर यांना जेव्हा हे कळले तेव्हा त्यांना संशय आला की पृथ्वीसिहाचे डोके फिरले असावे. ते कदाचित आत्महत्येचाही प्रयत्न करतील म्हणून पहाऱ्यावर खास चार शिपाई ठेवले गेले. या बंदिवासात आझादांनी स्वामी रामतीर्थ आणि विवेकानंद यांचे समग्र वाङमय वाचून काढले. त्या काळात त्यांनी ध्यान-धारणेचाही अभ्यास केला. अंगाला तेल चोपडावे तसे ते पाणी लावीत आणि भितीवर हात घासून तो चुना अंगाला फाशीत. त्यामुळे शरीराला गारवा मिळत असे आणि थंडीचे निवारणही होई.

थोडयाच दिवसांत आणखी काही क्रांतिकारी काळ्या पाण्याची शिक्षा होऊन आले. त्यांनीही हरताळात भाग घेतला. दोघांनी मौलवी जफ्फर हुसेन आणि रामरखा वाली यांनी उपोषण सुरू केले. त्यांनाही रबराच्या नळीतून नाकावाटे दूध पाजण्यात आले. रामरखा विचारे ५० दिवसांतच इहलोक सोडून गेले. सर्वांना आता आझादांची काळजी वाटू लागली. पं. जगतरामनी तर स्वतःच्या रक्ताने पत्र लिहून आझादांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ. बावा शेरसिंह यांना अशी बातमी लागली की आझादांनी आता जर उपोषण सोडले नाही तर त्यांच्या जिवाला धोका आहे. एकदा वाटले की स्वतः भेटावे. पण भेटणार कसे ? ते स्वतः तुरुंगातील कोठडीत तर आझाद हॉस्पिटलमध्ये. मग त्यांनी एक युक्ती केली. काचेचा एक तुकडा दगडावर ठेवून त्यानी त्याची पूड केली आणि पाण्यात घालून ती पिऊन टाकली. या लोकांच्या भूक-हरताळाने डॉक्टर अगोदरच घाबरून गेले होते, त्यात आता यांच्या उलटीतून आणि शौचाच्या वाटेने रक्त पडू लागले. ते

अधिकच घाबरले. त्यांनी बाबा शेरसिंह यांना हॉस्पिटलमध्ये ठेवले. हे सर्व कशासाठी चालले आहे हे तेथील वॉर्डरांना समजत होते; म्हणून डॉक्टरला न कळवता त्यांनी या दोघांची भेट घडवून आणली. बाबांनी मोठ्या प्रेमाने उपोषण सोडण्याचा आग्रह केला; पण काहीही उपयोग झाला नाही. या सहा महिन्यांच्या अवधीत काही लोक आजारी पडले; पण मरण मात्र कोणालाही आले नाही. पृथ्वीसिंहांना तर चार महिन्यांत साधे पडसे सुद्धा आले नाही. काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या कैद्यांमध्ये याबद्दल बरीच चर्चा झाली. हे योगसाधनेचे बळ आहे असेही बोलले जाऊ लागले.

खरं म्हणजे या उपोषणात काही तथ्य नव्हते. रोज दहा वाजता सहा माणसे येत, जबरदस्तीने नाकातून दूध पाजीत आणि निघून जात. आझाद या जीवनाला कंटाळले. एक दिवस त्यांनी त्या लोकांवर हल्ला केला. अपेक्षा अशी की त्यानीही आपल्याला मारावे आणि त्यातच आपल्याला मृत्यू यावा. पण तसे काहीच घडले नाही. उलट त्यांच्या पायांतील बेडचा काढण्यात आल्या; कोठडीचे कुलूपही काढून टाकले, खोलीभर फरशीवर गाद्या टाकण्यात आल्या, चार बाजूला चार वॉर्डर्स मात्र बसविले गेले. आझादांच्याबद्दल अधिकाऱ्यांसकट सर्वांच्याच मनामध्ये सहानुभूती निर्माण झाली होती. इतर कैद्यांच्या चिठ्या तर रोज येत. सावरकर बंधूंचेही पत्र आले की असेच जर तुम्ही चालू ठेवलेत तर डोके फिरण्याची शक्यता आहे आणि ती एक आत्महत्याच होईल हे पत्र वाचत असतानाच एक डास सारखा त्याना चावण्याचा प्रयत्न करीत होता. तो त्यांनी चिमटीत पकडला; जोरात दाबून फेकून दिला. त्यांना वाटले होते की डास मेला असावा म्हणून त्यांनी तो फेकून दिला. पण काय आश्चर्य ! तो जिवंत होता. त्यांच्या मनात विचार आला आणि तो पक्का झाला. इथे आपला कितो जरी छळ झाला तरी आपण काही मरणार नाही. आपल्या हातून जर काही सत्कार्य घडावयाचे असेल तर मृत्यू येणेच शक्य नाही. सावरकर बंधूंना त्याप्रमाणे त्यानी कळविले. तरीही पहारेकऱ्यासकट सर्व लोक त्यांना समजावीतच होते. हळू हळू या समजावण्याचा परिणाम होऊ लागला. १२५ दिवस झाले तेव्हा सर्व साथीदारांनी मिळून एक चिठ्ठी पाठविली. त्यामध्ये त्यांना असे कळविण्यात आले की आता इथून पुढे कैद्यांचा असा छळ केला जाणार नाही, वर्तमान-

पत्रामध्ये झालेल्या चर्चेचा परिणाम सर्व अधिकाऱ्यांवर झाला आहे. आणि मग त्यांनी उपोषण सोडण्याचे ठरविले.

यानंतर काही दिवस शांततेच गेले. तेवढ्यात जेलची पाहणी करण्यासाठी भारतातून एक कमिशन आले. बारीबाबा केव्हाच निवृत्त झाला होता. क्रांतिकारकांनी आपल्या मागण्या लेखी दिल्या, त्याप्रमाणे मग काही सुधारणाही झाल्या. वाचायला पुस्तके मिळू लागली; वर्तमानपत्रेही मिळत. जेल अधिकाऱ्याबरोबर केलेल्या पाच वर्षांच्या संघर्षात आठ क्रांतिकारकांची आहुती पडली. भूक हरताळात एक, मारपिटीत एक आणि बाकीचे डॉक्टराच्या निष्काळजीपणाला बळी पडले.

इंग्रजांबद्दलचा राग आझादांच्या मनात इतका भिनला होता की कोणालाही कसल्याही बाबतीत सहकार्य द्यायचे नाही; आणि त्याच्याकडे कसलीही सवलत मागायची नाही. हे व्रत चालूच होते. मरीच्या जागेवर नवा जेल सुपरिंटेंडंट आला. त्याच्या डोक्यात काय आले कुणास ठाऊक, त्याने खाद्य तेलाचे प्रमाण कमी केले. खरे म्हणजे तो स्वतः डॉक्टर होता. त्याने तसे करावयास नको होते. त्याची सर्वांनाच चीड आली. पुन्हा हरताळ सुरू झाला.

नवा मेडिकल ऑफिसर एक भीमकाय सैतान होता. सहा फूट तीन इंच उंचीचा. एक दिवस तो आझादांच्या कोठडीसमोर येऊन उभा राहिला. आझाद बसूनच राहिले. साहेबांना अपमान वाटला. इंग्रजीत त्यांनी हुकूम दिला. आझाद फक्त हसले. यावर कोठडीचे कुलूप काढायला लावून साहेब आत आले आणि आझादांची दाढी धरून त्यांना उठवले. दुसऱ्या दिवशी पुन्हा तेच साहेब आले, आझादांचे काही उठण्याचे लक्षण दिसेना. आदल्या दिवसाप्रमाणे दार उघडून तो जवळ आला आणि त्याने आझादांच्या दाढीला हात घातला. सरदार पृथ्वीसिंह याचीच वाट पाहात होते. त्यांनी त्याच्या कानशिलात अशी एक भडकविली की त्याच्या डोळ्यांपुढे काजवे चमकले. पुढे व्हायचे तेच झाले. आझादांच्यावर वॉर्डरांच्या दंड्यांचा वर्षाव झाला. खूप जखमा झाल्या. ते रक्तबंबाळ झाले. याबद्दल शिक्षा म्हणून एखाद्या हिंस्र श्वापदाप्रमाणे त्यांना एका पिंजऱ्यात ठेवण्यात आले.

# १५. धावत्या गाडीतून उडी

असे दिवस चालले होते. इतक्यात अशी बातमी आली की राजनैतिक कैद्यांना भारतात नेणार आहेत. त्याबरोबर असेही ऐकण्यात आले की भारतातील कोणताही प्रांत या पंजाबी क्रांतिकारकांना आपल्या तुरुंगात घ्यायला तयार नाही. हजारीबागमधील 'गदर' पार्टीचे १८ क्रांतिकारी संध्याकाळच्या वेळी अधिकाऱ्यांना चोप देऊन शिडीचा उपयोग न करताच भितीवरून उड्या मारून निसटून गेल्याची बातमीही याच वेळी आली. त्या वेळचे भारताचे गृहमंत्री या क्रांतिकारकांना माणसे न मानता 'हिंस्र पशू' समजत असत. आणि मग एके दिवशी दुसरी बातमी आली की काळ्या पाण्यावरील सर्व क्रांतिकारकांना मद्रास प्रांतातील कारागृहात ठेवणार आहेत. मद्रास निवडण्याचे कारण असे की तेथील भाषा, राहाणी, सर्वच पंजाबी लोकांपासून भिन्न होते आणि त्यामुळे तेथील लोकांच्या सहानुभूतीला ते पात्र ठरण्याची शक्यता कमी होती. अशा परिस्थितीत त्यांनी जर तुरुंगातून निसटून जाण्याचा प्रयत्न केला तर तो निश्चितच असफल होणार होता. बऱ्याच लोकांना वाटत होते की सर्व कैद्यांना भारतात जायला मिळेल; पण पृथ्वीसिंहाला काही सोडणार नाहीत. अधिकाऱ्यांशी आता थोडे नमून वागावे असे सर्वांनी त्यांना सुचविले, पण काही उपयोग झाला नाही. डॉक्टरी परीक्षेसाठी त्यांना उचलून न्यावे लागले. सर्वांची परीक्षा झाली. एक इंग्रज अधिकारी प्रत्येकाचा जीवनपट पाही आणि आपले मत जेलच्या तिकिटावर लिही. कोणाबद्दल लिहिले "भला माणूस दिसतो" तर कोणाबद्दल "वर्तणूक चांगली आहे." एकाबद्दल लिहिले, "आदर्श कैदी आहे; लवकर मुक्त करावा." सरदार पृथ्वीसिंह आझादाबद्दल मात्र त्यांनी लिहिले, "फार भयंकर; सुधारणे अशक्य; याच्यावर चांगली नजर ठेवली पाहिजे."

१९२१ च्या जून किंवा जुलै महिन्यात काळ्या पाण्यावरील गदर पार्टीचे सर्व कैदी 'महाराजा' जहाजावर चढविण्यात आले. ते जहाज तिसऱ्या दिवशी मद्रास बंदरात आले. तिथून कैद्यांना वेगवेगळ्या ठिकाणी पाठविण्यात

आले. पृथ्वीसिह् यांना आणखी दोन कैद्यांबरोबर कलकत्त्याला जाणाऱ्या गाडीत बसविले. या तीन कैद्यांबरोबर शिपाईही तीनच होते. तिघाही पोलिसांच्या हातात बंदुका होत्या तर कैद्यांच्या हातापायात बेड्या होत्या. तरीपण कैदी एवढे तगडे होते की त्यानी जर मनात आणले असते तर पोलिसांच्या हातावर तुरी देऊन पळून जाणे काही अशक्य नव्हते. तिघेही पंजाबी होते. पृथ्वीसिह सारखे त्या पोलिसांकडे पाहात होते. मधून मधून त्यांची दृष्टी आपल्या बरोबरच्या दुसऱ्या दोन कैद्यांकडे वळत होती. त्यांना उद्देशून ते पंजाबीत म्हणाले, " सोडनाल तीन कुक्कडहेंगे, आओ, इन्दानू मरोड सुट्टिए " पण त्यांच्या या आवाहनाला त्या कैद्यांकडून मुळीच प्रतिसाद मिळाला नाही. पृथ्वीसिह थोडे विचारात पडलेले दिसले. त्यांचे हात बेड्यानी जखडलेले असल्यामुळे पोलीस अगदी बेसावध होते. कैदी पळून जातील अशी भीती बाळगण्याचे त्याना मुळीच कारण नव्हते. ताशी तीस मैल वेगाने धावणाऱ्या गाडीतून उडी टाकणे म्हणजे ती आत्महत्याच होती. हळू हळू ते दुसरे कैदी आणि इतर प्रवासीही पेंगू लागले. आझादांची चुळबूळ चालूच होती. शेवटी एका पोलिसाजवळ जाऊन ते म्हणाले, " लघवीला जायचं आहे; हातबेड्या काढता का थोडा वेळ ?"

हातबेडी काढली गेली. पृथ्वीसिह संडासाकडे गेले. इकडे हे पोलीसही पेंगू लागले. पृथ्वीसिह परत आले. तेव्हा त्यांचे दोन्ही जोडीदार खिडकीजवळ बसले होते. डब्यातील जवळ जवळ सर्वच अर्धनिद्रितावस्थेत होते. पृथ्वीसिहानी खिडकीतून बाहेर डोकावून पाहिले; बाहेर अंधाराशिवाय काहीच दिसत नव्हते. त्यांनी पुन्हा एकदा इकडे-तिकडे पाहिले आणि एखाद्या विहिरीत सूर मारावा तसे त्यानी आपले शरीर खिडकीबाहेर झोकून दिले. पण ती आत्महत्या नव्हती. त्यात निर्भयता, साहस, कौशल्य सर्वकाही होते. आपण मरणार नाही अशी त्यांची पक्की खात्री होती. त्यांचे हे धाडस बराच वेळ कोणाला कळले नसते; पण खिडकीत बसलेल्या दुसऱ्या कैद्याला त्यांचा पाय लागला. आणि तो ओरडला त्यामुळे पोलीस जागे झाले; साखळी ओढली गेली, ब्रेक लागले; गाडी थांबली. खाली उतरून पोलिसांनी गोळीबार केला; पण तो कैदी असा मरणारा नव्हता; तो मरून अमर होणारा कैदी होता.

उडी अशी मारली की जमिनीला आपले पाय लागावेत; पण लागले गुडघे. खूप दुखापत झाली, उठता येईना. त्या वेळी त्यांना मानसिक बळ उपयोगी पडले. उठून दूर पळून जाण्याशिवाय गत्यंतर नव्हते. ते सुसाट पळत सुटले. तर वाटेतील काटेरी कुंपण आडवे आले. विचार करायला वेळ कुठे होता. त्यांनी आपल्या डोळ्यांवर हात ठेवून एक कोलांटी उडी घेतली; उडी बरोबर पलीकडे गेली; पण सगळे अंग काट्यांनी भरले. ते भाताचे खाचर होते, थोडेसे पुढे जातात, तो पुन्हा कुंपण. आता काट्यांची भीती उरली नव्हती. त्या कुंपणातूनही ते पुढे गेले. सुमारे एक तासभर चालल्यानंतर त्यांना एक दिवा दिसला. त्या दिव्याजवळ गेल्यावर त्यांनी पाहिले तर एक माणूस एका खाटेवर झोपला आहे आणि दुसऱ्या खाटेवर एक स्त्री आहे. एका कोपऱ्यात एक वासरू बांधलेले आहे. त्या उजेडात त्यांनी स्वतःकडे पाहिले तेव्हा त्यांना असे दिसले की हात, गुडघे आणि कोपरे यांची कातडी सोलली गेली आहे; सर्व शरीरात काटे भरले आहेत; ते रक्ताळले आहे आणि कपडे रक्ताने भरले आहेत. ते खूप थकले होते; भूक पण लागली होती. बेड्या आवरून ते खाली बसण्याचा प्रयत्न करू लागले, तो बेड्यांचा आवाज झाला; तो त्या स्त्रीने ऐकला. तिने यांच्याकडे पाहिले मात्र तिची बोबडीच वळली. ती आता ओरडणार असे पाहातच पृथ्वीसिंहांनी ओठावर बोट ठेवले. ती ओरडली नाही; पण तिने त्या पुरुषाला मात्र जागे केले. आपण भूत नसून माणूस आहोत असे त्यांना सांगायचे होते; पण कसे सांगणार ? भाषेचा प्रश्न आडवा आला. शेवटी पृथ्वीसिंहांनी स्वतःच्या बेड्या दाखवल्या आणि 'देशभक्त', 'स्वराज्य' असे शब्द उच्चारले; त्या वेळी म. गांधींचे असहयोग आंदोलन जोरात चालू होते. त्यामुळे भारतभर 'देशभक्त', 'स्वराज्य' हे शब्द भारतातील कोणत्याही भाषेतील लोकांना चांगले अवगत झाले होते. त्यांनी हातवारे करून असे विचारले की 'आम्ही काय करावे ?' पृथ्वीसिंहांनीही खुणा करून असे सुचविले की प्रथम या बेड्या काढल्या पाहिजेत. इकडे तिकडे पाहिल्यावर त्यांना एक लोखंडी फाळ दिसला. पृथ्वीसिंह अतिशय थकले असले तरी तो फाळ घेऊन त्यांनी बेड्या तोडून काढल्या. नंतर खुणा करून त्या जोडप्याला त्या बेड्या कुठे तरी पुरून टाकायला सांगितले. मग त्यांनी आपले कपडे काढले आता

त्यांच्या अंगावर फक्त लंगोटी होती. त्या लोकांच्याजवळही दुसरे कपडे नव्हते. खायलाही काही मिळाले नाही. तेव्हा पृथ्वीसिंह बाहेर पडले. पाऊस थांबला होता. समोरच दुसरे एक घर दिसत होते. त्या घराचे दार ठोठावणार एवढ्यात त्या पहिल्या झोपडीतील माणसाने ‘ जाऊ नका ’ म्हणून खूण केली. त्यावरून ते समजले की तिथे कोणी देशद्रोही राहात असला पाहिजे. मग ते वाट फुटेल तिकडे जाऊ लागले. थोडे पुढे गेल्यावर त्यांना एक स्टेशन लागले. तिथे पोलीस तयारच होते. धावत्या गाडीतून उडी टाकून कोणी डाकू पळून गेल्याचे वृत्त आगीसारखे दूरवर पसरले होते. लंगोटी लावलेला आणि रक्तबंबाळ शरीराचा असा माणूस पाहताच पोलिसांनी तावडतोब ओळखले. कारण स्टेशनमास्तरांनी सर्व हकीकत पोलिसांना अगोदरच सांगितली होती. पोलिसांच्या एकाही प्रश्नाला सरदारांनी उत्तर दिले नाही. तेव्हा त्यांनी पृथ्वीसिंहांनो गाडीत घातले आणि ज्या स्टेशनवर त्यांनी उडी घेतली होती त्याच स्टेशनवर आणले. त्या स्टेशनचे नाव होते अंगोला. आंध्र प्रदेशातील ते एक सुंदर शहर आहे. त्या शहरातील लोकांना जेव्हा ही बातमी समजली तेव्हा धावत्या गाडीतून उडी घेणाऱ्या या साहसी माणसाला पाहण्यासाठी पोलीस चौकीसमोर ही गर्दी झाली. त्या वेळी त्यांच्या अंगावर लंगोटीशिवाय दुसरे वस्त्र नव्हते; दुसरे कपडे पोलीस देऊ शकत नव्हते. एका इसमाने देऊ केलेले कपडे विदेशी म्हणून आझादांनी ते नाकारले. काँग्रेस कार्यकर्त्यांनी खादीचे कपडे आणले; पण पोलिसांनी ते वापरू दिले नाहीत. मग त्यांच्यावर खटला भरण्यात आला. कोर्टातही ते जमिनीवरच बसून राहिले. न्यायाधीश आले तरी ते उठले नाहीत.

‘ उभे राहा; हे काही तुमचे घर नाही ’ असे त्यांना सांगण्यात आले.

पृथ्वीसिंह बसल्या बसल्याच न्यायाधीशाला उद्देशून म्हणाले, “ इंग्रजी शासनाचे हे कोर्ट आहे आणि ज्या ठिकाणी तुम्ही बसला आहात तिथे तुमच्या डोक्यावर बादशहाची तसबीर आहे. त्यांना मी भारताचे वैरी समजतो; म्हणून या कोर्टाबद्दल माझ्या मनात मुळीच आदर नाही. मी उभा राहाणार नाही.”

आझादांचे हे बोलणे ऐकून तो चतुर न्यायाधीश हसला आणि त्याने शिपायाला आपली टेबल-खुर्ची बाहेरच्या एका झाडाखाली ठेवण्यास सांगितले.

तिथे तो स्वत: एका खुर्चीवर बसला आणि आझादांनाही एका खुर्चीवर बसण्यास सांगितले. अनेक तरुण वकील त्यांचा खटला मोफत चालवायला तयार होते; पण आझादांनी नकार दिला.

ते म्हणाले, " मी कैदेतून आपली सुटका करून घेतली यात माझे काही चुकले आहे, असे मला वाटत नाही; पुन्हा संधी मिळाली तर पुन्हा निसटून जाईन. मी याला गुन्हा समजत नाही. इंग्रज सत्तेविरुद्ध बंड करणे हे माझे कर्तव्यच आहे."

तीन-चार दिवस खटला चालला आणि पूर्वीच्या शिक्षेत आणखी एका वर्षाची भर पडली. त्यांना अंगोला सबजेलमध्ये नेण्यात आले. त्या वेळी एका देशप्रेमी युवकाने त्यांच्या डोक्यावर एक गांधी टोपी ठेवली. तुरुंगाच्या दरवाजापर्यंत ती त्यांच्या डोक्यावर होती. तिथे ती काढून टाकण्यात आली. त्या दिवसापासून देशप्रेमाचे प्रतीक म्हणून ते गांधी टोपी वापरू लागले.

तिथून त्यांना राजमहेंद्रीच्या तुरुंगात पाठवायचे ठरले. अंगोला येथील जेलचा अधिकारी सज्जन होता. तो आझादांना म्हणाला, " आपल्यासारख्या देशप्रेमी माणसाच्या हातापायांत बेड्या घालून नेणे मला बरोबर वाटत नाही. माझ्या मनात आपल्याबद्दल आदर आहे. मी तीन पोलीस आपल्या-बरोबर पाठवितो. विनंती एवढीच की पूर्वीप्रमाणे धावत्या गाडीतून उडी टाकून निसटून जाण्याचा प्रयत्न करू नये. आपल्या जिवाला त्यात धोका आहे. मागच्या खेपेलाच आपण कसे काय वाचलात आश्चर्य आहे. देशातील परिस्थिती झपाट्याने बदलत आहे. आपण जिवंत राहिलात तर देशाची अधिक सेवा करण्याचे भाग्य आपल्याला लाभणार आहे."

त्यांना निरोप देण्यासाठी शेकडो नवयुवक स्टेशनवर जमा झाले. त्या लंगोटधारी व्यक्तीला त्यांनी पुष्पहारांनी झाकून टाकले. तेव्हा ते तीन पोलीस हात जोडून म्हणाले, " आपल्या हातापायांत बेड्या नाहीत. एवढे सगळे लोक आपल्या दर्शनासाठी जमा झाले आहेत. आपण जर निसटून जाण्याचा प्रयत्न केला आणि या लोकांनी त्यात मदत केली तर आम्ही काहीच करू शकणार नाही. आपल्या जागी आम्हांला तुरुंगात बसावे लागेल."

" तुम्ही घाबरू नका " सरदार म्हणाले, " राजमहेंद्रीच्या दरवाजापर्यंत मीच तुम्हांला घेऊन जातो आहे असे समजा. तुम्ही मुळीच काळजी करू नका."

राजमहेंद्रीला ही बातमी अगोदरच पसरली असल्याने काँग्रेसचे हजारो तरुण प्लॅटफॉर्मवर जमा झाले होते. त्यांनी सरदार पृथ्वीसिंह आणि पोलीस यांना घेरले. ते पोलिसांना म्हणाले, "यांना आम्ही गोदावरीचे स्नान करवून आणतो; नदीचे स्नान झाल्याशिवाय तुम्हांला आम्ही यांना तुरुंगात नेऊ देणार नाही."

पोलीस बिचारे काय बोलणार ? तेही त्यात सामील झाले. नदीचे स्नान झाले. मिठाई वाटण्यात आली आणि मग त्यांना एका बैलगाडीत बसवून त्या तुरुंगाच्या दारापर्यंत पोचविण्यात आले. जेलचा अधिकारी एक अँग्लो इंडियन होता. त्यांनी सरदार पृथ्वीसिंह यांना विनंती केली की पूर्वी घडलेल्या सर्व गोष्टी त्यांनी आता विसराव्यात आणि अधिकाऱ्यांना आपला मित्र समजावे; पण सरदारांच्या वागणुकीत काहीच बदल झाला नाही.

फाशी जाणाऱ्या कैद्याला ज्या कोठडीत ठेवीत त्या कोठडीत आझादांना ठेवण्यात आले. तिथे ते परमेश्वराची आराधना करीत; ध्यानधारणेचा अभ्यास करीत. पद्मासन घालून तासन् तास ते ध्यानस्थ बसत. तुरुंगात कोणतेही काम करावयाचे नाही असे त्यांनी ठरवून टाकले होते. अर्थात जेलर हे कसे खपवून घेणार ? एके दिवशी सकाळी बरेचसे वॉर्डर त्यांच्या कोठडीसमोर जमा झाले. जेलर आला आणि त्याने कोठडीचे दार उघडण्यास सांगितले. त्याबरोबर सरदारांनी ओळखले की पूर्वी बाबा भानसिंहावर जो प्रसंग आला होता तसाच आज आपल्यावर येणार असे दिसते. सर्व वॉर्डरांच्या हातात दंडे होते. जेलर दारासमोरच उभा होता. त्यांनी वॉर्डरांना कोठडीत जाण्याचा हुकूम केला, पण ते आत येण्यापूर्वीच सरदारांनी उडी मारून जेलरची मान पकडली. वॉर्डर्स तयारच होते. त्यांनी मग सरदारांना पिटून काढले. दुसरे दिवसापासून त्यांच्या कोठडीवरचा पहारा अधिकच कडक झाला.

इकडे पंजाबात अकाली दलाचे आंदोलन जोरात चालू झाले. पंजाब-मधील सर्व देशभक्त अकाली दलाच्या आन्दोलनात सामील झाले. त्यांनी सरकारकडे अशी मागणी केली की मद्रासच्या जेलमध्ये जेवढे पंजाबी कैदी असतील तेवढे सर्व पंजाबच्या जेलमध्ये ठेवावेत. काही सज्जनांची नावे देऊन त्यांना सरकारने मद्रासला पाठवावे आणि पंजाबी कैद्यांना भेटण्याची परवानगी द्यावी. अशी त्यांनी सरकारला विनंती केली. ही विनंती सरकारने

मान्य केली आणि तीन लोक मद्रासला पाठविले. त्यांतील एक तेजासिंह चुडकाना हे आझादांच्या बरोबर अंदमानला होते. या तिघांबरोबर सर्व क्रान्तिकारकांनी चर्चा केली. त्यात असे ठरले की सर्व कैदी नियमाचे पालन करतील आणि अधिकारी राजकीय कैद्यांना देण्यात येणाऱ्या सर्व सवलती या क्रान्तिकारकांनाही देतील.

"कोणते काम करायला तुम्हाला आवडेल?" असा प्रश्न जेव्हा सरदारांना विचारण्यात आला तेव्हा ते म्हणाले की, "कॉंग्रेसचे जे कोणी कार्यकर्ते या तुरुंगात आजारी असतील त्यांची सेवा करावी; तसेच हिन्दी भाषा शिकू इच्छिणाऱ्या आंध्रवासी लोकांना हिन्दी शिकवावे अशी माझी इच्छा आहे."

सात वर्षे एकांतवासात राहिल्यानंतर आज प्रथमच त्यांना इतर कैद्यांशी बोलण्याची संधी मिळत होती. आपल्या देशवासीयांची सेवा करीत, पुस्तके वाचीत त्यांचे दिवस चांगले चालले होते. एके दिवशी दवाखान्यात टायफाइडचे नऊ रोगी आले. त्यांची शुश्रूषा आझादांनी इतकी मनापासून केली की तेथील युरोपियन मेडिकल ऑफिसरने त्यांच्या सुटकेची शिफारस केली. अर्थात तेवढ्या शिफारशीवर ते सुटणार होते अशातला भाग नाही. जेलच्या सर्व अधिकाऱ्यांबरोबर त्यांचे संबंध मित्रत्वाचे होते.

●

## १६. सुटकेचा दुसरा सफल प्रयत्न

इ. स. १९२२ मधील नोव्हेंबरचा शेवटचा आठवडा. असहयोग आन्दोलन जोरात चालू होते. बातमी अशी आली की सरदार पृथ्वीसिंह आणि त्यांचे साथीदार यांना नागपूरच्या तुरुंगात पाठवणार आहेत. अधिकाऱ्यांनी आझादांना बोलावले आणि म्हणाले, "कैद्यांना बेडचा घालूनच नेण्याचा प्रघात आहे. तुमचे साथीदार तर असे आहेत की त्यांना बरोबर पोलीस न देताही जरी आम्ही पाठविले, आणि नागपूरच्या तुरुंगात जा असे सांगितले तर ते

तिथे निश्चित जातील. त्यांच्याबद्दल आम्हाला काळजी नाही. त्यांना आम्ही बेड्या घालणार नाही. तुमच्या बाबतीत आम्ही काय करावे असे तुमचे मत आहे ? तुम्हाला बेड्या घालू नयेत असे आम्हाला वाटते; पण..."

"भीती वाटते असेच ना ? मला दोन्ही सारखेच आहे; गेले सोळा महिने माझे जीवन तुम्ही पाहिलेच आहे. तुम्हाला जसे योग्य वाटेल तसे करा."

खरी गोष्ट अशी होती की राजकीय कैद्यांना बेड्या घालण्याने वर्तमानपत्रात त्याचा फार गवगवा होत असे. म्हणून बंदोबस्ताकरिता कैद्याबरोबर एक इंग्रज पोलीस इन्स्पेक्टर आणि आठ पोलीस बरोबर दिले. राजमहेंद्री शहरात ही बातमी जाताच शेकडो लोक फलाटावर जमा झाले. एवढी मोठी गर्दी पाहून इन्स्पेक्टरसाहेब घाबरले; पण आझादांनी त्या लोकांच्या वतीने त्यांना आश्वासन दिले की काही गडबड होणार नाही. त्या वेळी खरं म्हणजे आझादांनी जर मनात आणल असत तर निसटून जाणे काही कठीण नव्हते. निरोप द्यायला आलेल्या लोकांजवळ मोटारीही होत्या. काही लोक घोड्यावरूनही आले होते, त्याचाही उपयोग झाला असता. पण आझादांनी तसा काही प्रयत्न केला नाही. गाडी आली आणि सर्वांचा निरोप घेऊन आझादांनी राजमहेंद्री सोडले. सिकन्दराबादला गाडी बदलायची होती. बराच वेळ तिथे थांबायचे होते.

पं. जगतराम आझादांना म्हणाले, "गावात जायचं आहे का ?"

'कशाला ?" "काही खायला घेऊन येऊ."

इंग्रज इन्स्पेक्टरची खात्री होती की हे कैदी काही पळून जाणार नाहीत. त्यामुळे आझादांच्या जाण्यात कोणी आड येणार नव्हते; गावात जाऊन त्यानी काही खाद्यपदार्थ आणले आणि ते जगतरामच्या हातात दिले. जगतराम त्यांच्याकडे आश्चर्याने पाहात राहिले तेव्हा कुठे आझादांच्या डोक्यात प्रकाश पडला. आझादांना संधी देण्यासाठीच जगतरामनी ही युक्त योजली होती.

थोड्या वेळाने नागपूरची गाडी आली आणि सर्व जण त्या गाडीत बसले. आझाद खिडकीजवळ बसले होते. इन्स्पेक्टरची नजर त्यांच्यावर गेली; जगतरामनेही त्यांच्याकडे पाहिले. आणि थट्टेने म्हणाले, "काय, मागच्यासारखी उडी मारण्याची आहे का हिम्मत ?"

या त्यांच्या वाक्याने आझाद जणू काही गाढ झोपेतून जागे झाले आणि

सार्थ नजरेने जगतरामकडे पाहिले. इन्स्पेक्टरलाही काही संशय आला आणि त्याचा हात आपल्या कमरेच्या पिस्तुलाकडे गेला. तो जगतरामजवळ गेला आणि म्हणाला, " त्याला खिडकीतून उठून माझ्याजवळ बसायला सांग. "

जगतरामने तो निरोप आझादांना सांगताच ते त्यांना अपमानास्पद वाटले. आपल्या प्रामाणिकपणाबद्दल याने शंका घ्यावी म्हणजे काय ! ते आपल्या जागचे मुळीच हालले नाहीत. त्यांचे डोळे संतापाने लाल झालेले त्यांनी पाहिले आणि त्या इन्स्पेक्टरने आझादाच्या दोन बाजूंला दोन शिपाई बसविले. थोड्या वेळाने आझादांचे डोके शांत झाले आणि मग ते स्वतःच उठून त्या इन्स्पेक्टरजवळ जाऊन बसले. सूर्यास्त झाला. खिडकीतून बाहेर अंधारच अंधार दिसत होता. आझादांचे डोळे मिटू लागले; पण निसटून जाण्याचा विचार आता जागा झाला होता. काही वेळातच त्या विचाराने त्यांची झोप उडविली. इन्स्पेक्टर आणि चार शिपाई झोपेच्या गुंगीत होते. उरलेले चौघे पत्ते खेळत होते. लघवीला जाण्याचे निमित्त करून ते संडासात गेले. त्यांनी इकडे तिकडे पाहिले. थोडी उंचावर अशी एक खिडाकी होती. तिची काच त्यांनी वर सरकविली. त्यात डोके घालून पाहिले तर ते सहज बाहेर निघाले. त्या वेळी सहज त्यांचा हात डब्याच्या खिडकीच्या हँडलवर पडला. त्याचा आधार घेऊन एका क्षणात त्यांनी आपले शरीर त्या वरच्या खिडकीतून बाहेर काढले. गाडीचा वेग सुमारे ताशी ४० मैल असावा. आता अंधार जाऊन स्वच्छ चांदणे पडले होते. पॅरलल बारवर कोलांटी उडी घ्यावी तशी त्यांनी उडी घेतली. दुसऱ्याच क्षणी त्यांचे पाय अलगद जमिनीला लागले. थोडे खरचटले देखील नाही कुठे इतकी त्यांची उडी व्यवस्थित होती. गाडी आपल्या गतीने निघून गेली. तिच्या उलट दिशेने आझादांची स्वारी तितक्याच वेगाने पळत सुटली.

●

बाल वाङ्मय विभाग
दा. क्र. दिनांक

# १७. धावत्या गाडीतून उडी मारणारा माणूस

दि. २९–११–१९२२ ची ती रात्र होती. स्वच्छ चांदणे पडले होते. तहानेने जीव व्याकूळ झाला होता; पण पाणी कुठेच दिसत नव्हते. बरेच चालून गेल्यावर एक विहीर दिसली, पण पाणी काढणार कसे? इकडे तिकडे पाहिले तर जवळच एक साठलेल्या पाण्याचे डबके दिसले. हात घातला तर सगळा चिखल वर आला. शेवटी थोडा वेळ थांबले आणि हात जमिनीवर टेकून एखाद्या जनावरासारखे पाण्याला तोण्ड लावूनच ते पाणी प्यायले, थोडा वेळ विश्रान्ती घेतली आणि पुढे चालू लागले. एके ठिकाणी त्यांना मैलाचा दगड दिसला. त्यावर लिहिले होते "अमरावती २ मैल" अमरावतीचे नाव वाचताच त्यांना दादासाहेब खापर्ड्यांची आठवण झाली. मनाला आधार मिळाला. त्यांच्या आधाराची चित्रे रंगवीत आझाद अमरावतीला आले. एका दारावर त्यांना 'छात्रावास' अशी पाटी दिसली. एक विद्यार्थी आपल्या खोलीत अभ्यास करीत बसलेला दिसला. पहाटेचे चार वाजले होते. दारावर थाप मारली. ती ऐकून तो बाहेर आला.

"कोण पाहिजे आपल्याला?" त्याने विचारले.

"मला एखाद्या देशभक्ताच्या घरी पोचवता येईल का?"

काहीही न विचारता तो आझादांना घेऊन निघाला. शहरातील अनेक रस्ते ओलांडल्यावर तो एका मोठ्या वाड्यासमोर उभा राहिला आणि त्यानें दार ठोठावले. चौकशी केल्यावर समजले की खापर्डेसाहेब स्टेट कौन्सिलच्या सभेला गेले आहेत. तो मुलगा मग आझादांच्या तोण्डाकडे पाहू लागला.

"शहरात आणखी कोण देशभक्त आहे?" आझादांनी विचारले.

'वीर वामनराव' हे उत्तर ऐकताच त्यांच्या घराकडे मोर्चा वळला. पण कर्मधर्मसंयोग असा की तेही कुठेतरी गेले होते. तिसरे नाव निघाले डॉ. वऱ्हाडपांडे यांचे. ते काँग्रेस कार्यकर्ते होते. ते मात्र घरी भेटले.

"मी ओळखलं नाही आपल्याला." ते म्हणाले, "आपण कोण?"

" आपण खूप वर्षांपूर्वी भेटलो असल्यामुळे आता ओळख पटणे कठीण आहे. "

एवढा संवाद ऐकल्यावर त्या विद्यार्थ्याला वाटले की आपले काम झाले आणि तो निघून गेला. डॉ. वऱ्हाडपांडे यांनी दार बंद करून घेतले. आझादांना खोलीत एके ठिकाणी बसवून हसत हसत विचारले, " हं, आता बोला; कुठं पडली होती आपली गाठ ?"

गंभीरपणे त्यांच्याकडे पाहात आणि त्यांचा अंदाज घेत आझाद म्हणाले, " कुठेच नाही."

" कुठेच नाही ? म्हणजे ?"

" माझी आपली मुळीच ओळख नाही. मी जेलमधून निसटून आलेला एक कैदी आहे." अशी सुरुवात करून त्यांनी आपली सर्व रामकहाणी थोडक्यात सांगितली.

" मग माझ्याकडून आपली काय अपेक्षा आहे ?" डॉक्टरांनी विचारले.

या त्यांच्या प्रश्नाने आझादांना थोडे हायसे वाटले. प्रथम त्यांनी वस्तरा आणि कात्री मागितली. तुरुंगात वाढलेली दाढी आता त्यांच्या उपयोगी पडणार होती. ती काढून टाकली की कोणालाही त्यांना ओळखता आले नसते. नंतर त्यांनी काही कपडे मागितले. खादीचे धोतर, टोपी आणि झब्बा या वेषात त्यांना कोण ओळखणार ? ते आता एक कॉंग्रेस कार्यकर्ते वाटत होते; त्यांना मुंबईला जायचे होते. त्याकरिता त्यांना पंधरा रुपयांची आवश्यकता होती. त्या बिचाऱ्या डॉक्टरांनी देशाकरिता आपला धंदा बंद केला होता. त्यांच्याजवळ कुठले पैसे ! पण ते खरे देशभक्त होते. एका देशभक्ताकरिता, त्याची मुळीच ओळख नसताही, आपल्या मित्रमंडळीकडे पैसे मागण्याकरिता गेले. शिवाजीराव पटवर्धन यांच्या घरी बरीच मंडळी जमली होती. त्यांना डॉक्टरांनी जेव्हा ही हकीकत सांगून पैसे मागितले तेव्हा सर्वांनी त्यांची टर उडविली. " कोणीतरी सी. आय. डी. असेल. तुम्हाला बनविलं त्यानं; दुसरं काय !" असे सर्व म्हणाले. पण शेवटी जेव्हा डॉक्टर म्हणाले की अहो खरंच तो कोणी सी. आय. डी. चा माणूस नाही. तुम्ही-सुद्धा जर त्याला एकदा पाहिले तर तुमची खात्री होईल. तेव्हा मग असे ठरले की डॉक्टरांनी त्याला आपल्याबरोबर फिरावयास म्हणून आणावयाचे

आणि या मंडळींनी त्यांच्याकडे पाहात त्या दोघांच्यासमोरून जायचे. शेवटी या कसोटीला आझाद उतरले आणि डॉक्टरांनी त्यांना पंधरा रुपये आणून दिले. एवढेच नाही तर ते आझादांना पोचविण्यासाठी स्टेशनवरही आले, तिकीट काढून त्यांना मुंबईच्या गाडीत बसविले आणि मगच घरी गेले.

ज्या डब्यातून आझाद प्रवास करीत होते त्याच डब्यात एक पोलीस बसला होता. पुढल्या स्टेशनवर आणखी काही प्रवासी त्या डब्यात चढले. त्यांपैकी एकाने त्या पोलिसाला विचारले, "काय हवालदार, कुठपर्यंत ?"

तो पोलीस म्हणाला, "रात्री तो कैदी पळून ना; त्याचा तपास करायला निघालो."

"कैदी पळाला रात्री आणि आता तपास करताय ?" असे म्हणून सर्व लोक हसले. रात्री सुमारे नऊ वाजता ते मुंबईला पोचले. स्वा. सावरकरांचे बंधू त्या वेळी मुंबईला होते. त्यांच्या घरी आझाद गेले. ते आझादांना चांगले ओळखत होते. आझादांना पाहाताच त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी सर्व हकीकत ऐकून घेतली आणि सर्व काही ठीक होईल असे आश्वासन देऊन ते बाहेर पडले. थोड्याच वेळात त्यांचा कंपौंडर खाण्याच्या काही वस्तू घेऊन आला. बराच वेळ झाला तरी डॉक्टर आले नाहीत. त्यांना येण्यास जसजसा उशीर होऊ लागला तसतशा अनेक शंका आझादांच्या मनात गर्दी करू लागल्या. या गृहस्थांना संशय तर आला नसेल ? माझ्या बोलण्यावर विश्वास बसला नसला तर ? ते आपल्याला पोलिसाच्या हवाली तर नाही करणार ? डॉक्टर परत येईपर्यंत त्यांच्या जिवात जीव नव्हता. डॉक्टर आले आणि आपण काय व्यवस्था केली आहे हे जेव्हा त्यांनी सांगितले तेव्हा आझादांचा जीव भांड्यात पडला. आझादांना राहण्यासाठी डॉक्टरांनी जागासुद्धा अशी निवडली की अगदी कल्पनेच्या पलीकडे. मुंबईचे प्रिन्सेस स्ट्रीटवरील प्रसिद्ध पोलीस ठाणे म्हणजे त्यांना पोलिसांच्या ताब्यात दिले नाही, त्यांच्या डोक्यावर बसविले. पोलीस ज्या मजल्यावर त्याच्या दुसऱ्या मजल्यावर आझादांची खोली. काही दिवसांनी त्यांना पुण्याला काकासाहेब गाडगिळांच्या घरी नेण्यात आले, पण त्यांचे नाव आझादांना त्या वेळी सांगितले गेले नाही.

पुढे १९५६ साली पंजाबचे मुख्य मंत्री प्रतापसिंह कैरॉं होते आणि काकासाहेब राज्यपाल होते. एके दिवशी आझादांचा परिचय करून देण्यासाठी कैरॉं त्यांना काकासाहेबांकडे घेऊन गेले. प्रतापसिंह गाडगीळांना म्हणाले, "आज मी तुम्हाला एका व्यक्तीचा परिचय करून देणार आहे. यांचे नाव सरदार पृथ्वीसिंह; देशभक्त, पंजाबचे जुने क्रांतिकारक."

एवढे ऐकले मात्र; काकासाहेब म्हणाले, "अहो यांना मी चांगला ओळखतो. चाळीस वर्षांपूर्वी धावत्या गाडीतून उडी मारून जेव्हा हे पसार झाले आणि अज्ञातवासात राहिले तेव्हा पुण्याला माझ्याच घरी आले होते." या प्रसंगी म्हणजे चाळीस वर्षांनंतर त्यांना काकासाहेबांचे नाव समजले.

●

# १८. स्वामीरावांचा जन्म

पुण्याहून आझादांना बेळगावला नेण्यात आले, तिथून गोवा, गोव्याहून परत मुंबई; पण कुठेच मन रमेना. एके दिवशी डॉक्टर दुसऱ्याच एका माणसाला आझादांकडे घेऊन आले आणि म्हणाले, "हे तुम्हाला भावनगरला घेऊन जातील." त्यांचे नाव होते गणेश रघुनाथ ऊर्फ तात्यासाहेब वैशंपायन. ते स्वा. सावरकरांचे सहयोगी होते. भावनगरला त्यांना तारमास्तरची नोकरी होती. ते अतिशय बुद्धिमान असे समाजसेवक होते. त्यांना पाहून त्यांच्याविषयी आझादांचे चांगले मत झाले. आपल्यासारखाच हाही एक देशप्रेमाने वेडा झालेला माणूस असला पाहिजे अशी त्यांची खात्री झाली. लहानपणी नाशिक येथील दांडेकरांच्या व्यायामशाळेत त्यांनी तालीम केली होती. ते एक उत्तम पहेलवान आणि पट्टीचे पोहणारे होते. त्यांचे वडीलही एक आदर्श शिक्षक आणि देशभक्त होते. आझादांचा परिचय त्यांना करून देताना डॉक्टर म्हणाले, "हे सरदार पृथ्वीसिंह आझाद. बालब्रह्मचारी आहेत. संसाराचा मोह सोडून घराबाहेर पडले आहेत. कुठेतरी नोकरी-समाजसेवा करून जीवनयापन करण्याची त्यांची इच्छा आहे."

नोकरीचा शोध सुरू झाला. वैशंपायनांच्या मित्रांनी विचारले, " कसली नोकरी करतील ?"

वैशंपायन गमतीने म्हणाले, " कसलीही, चपराशाची मिळाली तरी आणि मंत्र्याची मिळाली तरी दोन्ही त्याना सारख्याच आहेत. "

सर्व लोक आश्चर्य करीत म्हणत, " असा कोण आहे बुवा ! " जे कोणी आझादांना भेटत ते ते त्यांच्या बुद्धिमत्तेने प्रभावित होत. शेवटी एका मोठ्या पार्कमध्ये त्यांना गेटकीपरची नोकरी मिळाली; आझाद तयार झाले; पण वैशंपायनांना ते बरोबर वाटेना. एक क्रान्तिकारी गेटकीपर ! त्यांनी ती नोकरी घेऊ दिली नाही. भावनगरमध्ये थिऑसॉफिकल सोसायटीचे सनातन धर्म हायस्कूल होते. त्या शाळेत व्यायामशिक्षकाची जागा रिकामी होती. गेला महिनाभर चांगले अन्न आणि पूर्ण विश्रांती मिळाल्यामुळे आझादांची प्रकृती उत्तम होती. वैशंपायन म्हणाले, " तुम्हाला हे काम चांगले आहे. शाळेच्या व्यवस्थापकांना भेटा आणि व्यायामशिक्षक व्हा. " त्या वेळी आझादांना पाहून कोणालाही वाटले असते की हा एक उत्तर हिंदुस्थानांतील भैया आहे. ते मुख्याध्यापकांच्या खोलीत गेले आणि त्यांना एक सलाम ठोकला. मुख्याध्यापकांनी नमस्कार घेतला पण बसायला सांगितले नाही. स्काउटमास्तरांना बोलावून त्यांना म्हणाले, " हे आपले व्यायामशिक्षक; काय काम करायच ते त्यांना समजावून द्या. " हे स्काउटमास्तर विज्ञान पण शिकवीत असत. ते आझादांना व्यायामशाळेत घेऊन गेले आणि हिन्दीमध्ये त्याना माहिती देऊ लागले. आझाद मध्येच इंग्रजीत बोलले. एका भैयाच्या तोंडून इतके सफाईदार इंग्रजी ऐकून ते आश्चर्यचकित झाले. त्यांनी हसून आझादांशी हस्तांदोलन केले आणि मग त्या दोघांत पुष्कळ चर्चा झाली. ते आझादांना परत मुख्याध्यापकांच्या खोलीत घेऊन गेले आणि म्हणाले, " हे तर इंग्रजीचे स्नातक दिसतात. सर्व ऐकून घेतल्यावर मुख्याध्यापक उठून उभे राहिले आणि आझादांसाठी खुर्ची पुढे केली. म्हणाले, " माफ करा; आपल्याकडे पाहिले आणि वाटले कोणीतरी पहिलवान असावा. आपण उद्या या; आपण आणखी चर्चा करू. "

दुसरे दिवशी मुख्याध्यापकांनी आझादांना मोठ्या आदराने खुर्ची दिली आणि म्हणाले, " आर्थिक दृष्टचा आमची संस्था गरीब आहे. आपल्याला योग्य

वेतन देणे आम्हाला परवडणार नाही. आपण जर संध्याकाळचे वेळी एक तासभर देऊ शकत असाल तर बरे होईल. संस्था तीस एक रुपयांपर्यंत देऊ शकेल."

अशा तऱ्हेने भावनगरचे जीवन १९२३ पासून सुरू झाले ते १९३० पर्यंत- वैशंपायन एक व्यायामशाळा चालवीत. ते व्यायामशास्त्राचे विशेषज्ञ होते. कुस्ती आणि खेळ यामध्ये ते प्रवीण होते. एके दिवशी आझाद त्यांच्या व्यायामशाळेत जाऊन बसले. बरीच मुले तिथे व्यायाम करीत होती. त्या वेळी त्यांच्या मनात असा एक विचार आला की देशाचा खरा देव म्हणजे ही भावी पिढी. क्रीडांगण आणि पाठशाळा हे यांचे पूजास्थान. आपल्याला आता यांची पूजा करावयाची आहे. त्यांनी मग अनेक व्यायाम-विशारदांना गुरू केले. राजरत्न प्रो. माणिकराव यांचेकडे शिक्षण घेतले. नाशिकचे आदर्श शिक्षक कृष्णाजी बळवंत महाबळ यांचेही मार्गदर्शन मिळविले आणि मग भावनगरमधील तरुणांचे ते स्वतःच आराध्यदैवत झाले. बारा न् बारा चोवीस तास ते मुलांमध्ये रमलेले असत. त्या गुजराथी मुलांच्या सहवासात राहिल्याने त्यांना आता गुजराथी पण चांगले बोलता येऊ लागले.

व्यायामशाळेत मुलांची संख्या वाढू लागली. वैशंपायन यांची बदली झाली आणि व्यायामशाळेसाठी जागेचा प्रश्न पडला. कोण जागा देणार? बराच विचार करून त्यांनी प्रतिज्ञा केली की व्यायामशाळेला जोपर्यंत स्वतःची जागा मिळत नाही तोपर्यंत मी मिष्टान्न सेवन करणार नाही; दूधही पिणार नाही. मुलांच्याकडून ही बातमी सर्व गावभर झाली. पण याकडे कोणीही विशेष लक्ष दिले नाही. त्या वेळी राजकुमार कृष्ण कुमार-सिंह हे अज्ञान होते. राज्याची सर्व सूत्रे प्रभाशंकर पट्टणी यांच्या हातात होती. लवकरच राजकुमारांना राज्याधिकार मिळण्याचा समारंभ होणार होता. राज्यातील ठिकठिकाणचे लोक भावनगरमध्ये जमले होते. "या समारंभात आपणही सामील झालो तर" असा एक विचार त्यांच्या मनात येऊन गेला. व्यायामशाळेत शिकविल्या जाणाऱ्या कसरतीचे प्रात्यक्षिक जर आपण करून दाखविले तर? पण जागा? पोलीस-अधिकाऱ्याला भेटून काही उपयोग झाला नाही. तो म्हणाला, "जागा करून घेऊ शकत असाल

तर प्रात्यक्षिकांना माझी काही हरकत नाही." थोडे डोके लढवून आझादांनी पाहिजे तशी एक जागा विद्यार्थ्यांकडून तयार करून घेतली आणि प्रात्यक्षिके करून दाखविली. प्रभाशंकर पट्टणींना ती फार आवडली. त्यांनी आझादांची सर्व चौकशी त्यांचे सहायक जोरावरसिंह यांच्याजवळ केली. त्यानी सर्व माहिती दिली आणि आझादांनी केलेली प्रतिज्ञा पण सांगितली. ते ऐकताच प्रभाशंकरांनी आझादांची पाठ थोपटली आणि ते जोरावरसिंहाना म्हणाले, "यांना मोटारीत बसवून भावनगरमधील सर्व सरकारी जागा दाखवा. जो जागा त्यांना पसंत पडेल तिच्याकरिता लागणाऱ्या सरकारी हुकमावर माझी सही घ्या. आझादांनी राजमहालातील जागा निवडली. १५० यार्डांचे लांबरुंद असे क्रीडांगण तयार करून मिळाले; हा त्यांचा पहिला विजय. याबरोबरच भावनगरच्या राष्ट्रीय शिक्षणसंस्थेत त्याना आता मानाचे स्थान मिळाले. ते आता व्यायामाबरोबर इतिहास-भूगोलही शिकवू लागले. दक्षिणमूर्ती शिक्षणसंस्थेचे संस्थापक नानाभाई भट्ट, श्री हरिभाई त्रिवेदी, आणि गिजूभाई बधेका ही त्रिमूर्ती होती. या संस्थेला मुंबई प्रांतात मोठे मानाचे स्थान होते. यामुळे पुष्कळशा राष्ट्रीय कार्यकर्त्यांचा आझादांशी संबंध आला, परिचय झाला. काही तरुणांना बरोबर घेऊन त्यांनी गुजराथ आणि सौराष्ट्रभर दौरा केला. व्यायाम प्रचारासाठी भावनगर राज्यातील विद्याधिकारी हे सर्व पाहात होते. त्यांनी मग आझादांना सरकारी नोकरीतच घेतले. भारतीय लोकांची अशी कल्पना आहे की गुजराथी लोक उत्तम व्यापारी आहेत; पण अतिशय दुबळे आणि भित्रे आहेत. हे विधान चुकीचे असल्याचे भावनगरमधील लोकांना त्यांनी कृतीने पटवून दिले. गुजराथी लोक शूरही असल्याची अनेक उदाहरणे भावनगरमध्ये घडू लागली. शहरात कुठेही आग लागली तर पाण्याच्या अभावामुळे आग विझविणे किंवा आटोक्यात आणणे एक कठीण काम होते. आझादांच्या व्यायामशाळेतील जवान असे तयार झाले की गावात कुठेही आग लागली की ते ताबडतोब त्या ठिकाणी जात आणि थोड्याच वेळात ती विझवून टाकीत. फायर ब्रिगेडचे लोकही त्यांची वाखाणणी करू लागले. सौराष्ट्रातील तरुण मुलांमध्ये धैर्य, शौर्य हे गुण कसे वाढीला लागतील यासाठी आझाद आपल्या जिवाचा आटापिटा करीत – लोकही आपली मुले

मोठ्या विश्वासाने त्यांच्या ताब्यात देत; त्यांच्या कार्यात जेवढी मदत करता येईल तेवढी आपणहून करीत.

# १९. मिया – महादेव

असेच एक मुसलमान गृहस्थ – भाउद्दीन उस्मान शेख यांचा सहयोग आझादांना लाभला. हा एक आदर्श कर्मयोगी आणि सदाचारी गृहस्थ होता. धर्माने मुसलमान; कुराणाचे नित्य पठण – पण धर्मांधता नाही. सर्वांशी प्रेमपूर्ण व्यवहार, मग तो कोणत्याही जातीचा असो. त्याचे गुरू प्रो. माणिकराव, एक हिंदू. तरी त्याला ते अत्यंत पूजनीय होते. गेली पंचवीस वर्षे तो भावनगरच्या लोकांची सेवा करत होता. त्याचे वर्णन स्वत: आझादांनी केले आहे ते असे – "जबानपर कडवास नही; माथेपर बल नही; हृदयमें छल-कपट नही; कोई प्रदर्शनीय ढोंग नही; कोई लालसा नही; चेहरेपर उदासता का भाव नही और फल की चाह नही."

एकदा तिथे हिन्दु–मुसलमान दंगा झाला. त्या वेळी दंगा होण्यापूर्वीच आझादांना विचारले, "तुमची एवढी सेना आहे; हा दंगा वाढणार नाही असे नाही का करता येणार?"

त्या वेळी आझादांनी ते आव्हान स्वीकारले. त्यांनी सर्व तरुणांना एकत्र करून त्यांचे दोन गट पाडले. सर्वांना ठाऊक होते की आझाद आणि भाऊद्दीन ही मिया-महादेवाची जोडी आहे. शहरातील सर्व लोकांना कळविण्यात आले की भाऊद्दीन हा मंदिराचे रक्षण करील. आणि आझाद (महादेव) हा मशिदीचे रक्षण करतील. गुंडांनी मशिदीत शिरण्याचा प्रयत्न केला तर त्यांना महादेवाच्या प्रेतावरून जावे लागेल; तसेच मंदिरात घुसणारा मुसलमान भाऊद्दीनचे प्रेत पायाखाली घातल्याखेरीज आत जाऊ शकणार नाही. ही घोषणा जेव्हा दंगा करणाऱ्या लोकांनी ऐकली तेव्हा गुंडांना काही गडबड करण्याचे साहस झाले नाही.

एकदा पं. नेहरू राजकोटला भेट देणार होते. भावनगरमधील बहुतेक सर्व तरुण राजकोटला जाणार होते. आझादांनाही येण्याचा आग्रह झाला; पण स्टेशनवर तर गुप्त पोलिसांची सारखी वर्दळ. त्यांच्या मनात तर जायचे होते. "तुम्ही पुढे व्हा; मी नंतर येतो." असे त्यांनी सर्वांनी सांगितले. आपण सायकलवरून जायचे असे त्यांनी ठरविले. रात्रीच ते निघाले. वीस मैलांवर त्यांचे काही मित्र रहात होते. त्यांच्याकडे जेवण झाले. तेथून राजकोट ८८ मैल होते. अंधारी रात्र; कच्चा रस्ता. खाचखळग्यांतून वाऱ्याला तोंड देत, पडत–झडत ते चालले होते. रात्री सुमारे दहा वाजता एक रानडुक्कर आडवे आले. त्याच्या बरोबर रेसच खेळावी लागली. अशा रीतीने तांबडं फुटण्याच्या आत ते राजकोटला पोचले. सर्वांना आश्चर्य वाटले. तरुणांमध्ये त्यांच्या-बद्दलचा आदर अधिकच वाढला. दोन दिवसांनी परत ते सायकलवरूनच निघाले. संध्याकाळची वेळ होती. तीन मैल जातात न जातात तोच सायकल पंक्चर झाली. जवळच एक पोलीसठाणे होते. भावनगर आणि आसपासच्या प्रदेशात ते 'स्वामीराव' या नावाने ओळखले जात. त्यांना ओळखत नाही असा माणूस सापडणे कठीण इतके ते लोकप्रिय होते; सर्वांना त्यांच्याबद्दल आपुलकीही होती. 'स्वामीराव आले; स्वामीराव' असे म्हणत पोलिसांनी त्यांचे स्वागत केले; त्यांना खाऊ–पिऊ घातले, सायकल दुरुस्त करून दिली. प्रवास सुरू झाला. दहा वाजेपर्यंत त्यांना पुन्हा भूकही लागली आणि थोडा थकवाही आला. म्हणून ते एका हॉटेलमध्ये गेले आणि मालकाला म्हणाले, "भैयाजी, जरा दोन शेर दूध तर गरम करा. आणि हे काय ? पेढेही ताजे दिसताहेत. बरं तर, मग पेढेही द्या दोन शेर." दूध गरम केल्यावर मालकाने दुधाचे चार ग्लास आणि पेढ्याच्या चार थाळ्या आणून ठेवल्या. आझादांना आश्चर्य वाटले. ते म्हणाले, "अरे, हे चार ग्लास आणि चार थाळ्या. ही तयारी कोणासाठी ?"

"का ? आपल्या मित्रमंडळींसाठी."

"छे: छे ! माझे कोणी मित्र येणार नाहीत. कोणी सांगितलं तुम्हाला तसं ?"

आता त्या मालकाची पाळी होती आश्चर्य करण्याची. 'मग काय एवढे दूध आणि इतके पेढे—'

'पहाना आता; मी एकटाच खाणार आणि एकटाच पैसे देणार.'

त्याला जेव्हा समजले की सायकलवरून १०८ मैलांचा प्रवास झाला तेव्हा तो म्हणाला,

'मग हा खुराक काही आपल्याला फार नाही.'

## २०. अल्लारखांचा जन्म

भावनगरमध्ये दिवस आनंदात चालले होते; पण मनाला समाधान नव्हते. पुन्हा भारत सोडण्याचा विचार डोक्यात घोळू लागला. भारताबाहेर जाऊन अर्धवट राहिलेल्या कार्याला पुन्हा हात घालावा असे वाटू लागले. घरच्या लोकांना भेटूनही बरेच दिवस झाले होते. विचार करता करता असे ठरले की ब्रह्मदेशमार्गे बँकॉकला जावे आणि तेथून पुन्हा गदर पार्टीशी संपर्क साधावा. भावनगरमध्ये डॉ. काणे एक विश्वासार्ह व्यक्ती होतो. आझादांच्या दंडावर त्यांचे नाव गोंदलेले होते; ते डॉ. काणे यांनी काढून टाकले ऑपरेशन करून. एवढेच करून ते थांबले नाहीत तर वाटेत उपयोगी पडतील म्हणून दोनशे रुपयेही दिले. आपण कुठे जात आहोत हे त्यांनी कोणालाच सांगितले नव्हते. कलकत्त्याहून चटगाव, चटगावहून जहाजाने रंगून असा प्रवास केल्यावर त्यांनी ब्रह्मी पोशाख केला. ब्रह्मी भाषा त्यांना अवगत होतीच. आता रेल्वेने प्रवास करण्यात त्यांना कसलाही धोका नव्हता. तिसऱ्या दिवशी मोनेवा स्टेशनच्या अलीकडच्या स्टेशनवर ते उतरले. तेथून जंगलच्या रस्त्याने वडिलांच्या घरी गेले. त्यांच्याजवळ जे काही सामान होते ते झाडीत लपवून ठेवले. लोकांना उगीच संशय येऊ नये; कोण आलं, कुठून आलं अशी चौकशी होऊ नये म्हणून. अशी खबरदारी घेणं आवश्यक होतं. त्यांचे वडील घरी नव्हते; धाकटा भाऊ होता. त्याला भेटून आता १४ वर्षे झाली होती. त्याने काही यांना ओळखले नाही. सुसंस्कृत घरात एखाद्या अतिथीचे स्वागत व्हावे तसे त्यांचे त्यांच्याच घरी झाले. कुठले, कोण हे सांगण्याचे

मात्र त्यांनी टाळले. रात्री दहा वाजेपर्यंत कसातरी वेळ काढला. दहा वाजता वडील आले. घरात खाटेवर कोणीतरी बसलेले आहे असे दिसताच त्यांनी आपल्या छोट्या मुलाला विचारले, " बेटा, कोण आहे ? "

' मी काही विचारलं नाही, पण भैयासारखा चेहरा दिसतो आहे. '

वडील धोरणी होते. तिन्हाइत माणूस अनोळखी घरात ऐसपैस निश्चित बसणे शक्यच नव्हते हे त्यांनी ओळखले; पण ते काही बोलले नाहीत. त्यांनी जेंवण केलं आणि विचारलं,

' क्यों भाई, जेवण केलं ?'

खालच्या आवाजातील ' हो 'कार ऐकून त्यांची खात्री झाली आणि ते म्हणाले, ' मग चला आपण थोडे पाय मोकळे करून येऊ. '

थोडे दूर एका झाडाखाली बसून खूप गप्पागोष्टी केल्या. वडिलांचे एकच म्हणणे होते की कुठेतरी सुरक्षित ठिकाणी कामधंदा करावा. त्यांनी खूप पैसा कमावून ठेवला होता. आता त्यांना पैशाची फिकीर करण्याचे कारण नव्हते. पण आझादांनी आपल्या जीवनाचे ध्येय त्यांना समजावून सांगितले तेव्हा ते म्हणाले, ' कुठेही राहा; काहीही कर, सुखी राहा म्हणजे झालं. माझी मदत लागेल तेव्हा मला कळव; ही सर्व संपत्ती आता तुम्हा दोघांचीच आहे. ' शेवटी जेव्हा ते दोघे घरी आले तेव्हा त्यांचा धाकटा भाऊ जागाच होता. पाहुणा कोण हे त्याने केव्हाच ओळखले होते.

रात्री जेव्हा धाकटा भाऊ दूध घेऊन आझादांकडे आला, तेव्हा त्याने त्यांच्याबरोबर जाण्याचा हट्ट धरला. आझादांनी त्याला खूप समजावले. " वडिलांच्या जवळ राहून वृद्धापकाळी त्यांची सेवा करणे हाच तुझा धर्म आहे. वडिलांची सेवा आणि देशाची सेवा दोन्ही सारखेच आहे. परमेश्वराने मला हा मार्ग दाखविला, तू दुसऱ्या मार्गावर आहेस. तेच तुझं कर्तव्य." अशी नानाप्रकारे त्याची समजूत घातली. दुसरे दिवशी दिवस निघण्याच्या आत ते जंगलात गेले. बरोबर खाण्यापिण्याचे सामान होते. दिवसभर तिथेच राहून रात्री सुमारे दहा वाजता ते घरी गेले. पुन्हा पितापुत्रांची दीर्घकाळ चर्चा झाली, पण वडील काही मुलाचे मन वळवू शकले नाहीत. त्यांनी आपल्याबरोबर एक हजार रुपयांची थैली आणली होती. ती आझादांना देऊन ते म्हणाले, " कुठेही जा आणि समाजात आपले स्थान निर्माण कर. "

दुसरे दिवशी पहाटे अंधार असतानाच दोघे भाऊ निघाले. सुमारे दहा मैलांवर एक छोटेसे स्टेशन होते. तिथे जाऊन भाऊ तिकिट घेऊन आला. आझाद जेव्हा गाडीत बसले तेव्हा दोघाही भावांचे हृदय भरून आले. जड अंतःकरणाने धाकटया भावाने निरोप दिला. रंगूनहून सयामला जहाजातून जाण्यासाठी पासपोर्टाची आवश्यकता होती, ते अशक्य होते. त्यांना आता जंगल आणि पहाड याशिवाय दुसरा मार्ग नव्हता. वाटेत दोन नद्याही आडव्या येणार होत्या. त्यानी मग खूप मोठा आवाज करील असे एक नकली पिस्तूल आणि एक गुप्ती खरेदी केली. रंगूनजवळच मौलमीन नावाचे एक शहर आहे. नदीतील छोटया पडावावर बसून ते त्या शहरात गेले. तिथे त्यांनी एका गवळ्याचा वेष केला. आसपासच्या कुठल्या गावात चांगल्या गायी मिळतात आणि त्यांच्या किंमती काय असतात याची त्यांनी चौकशी केली. त्या गावातील प्रसिद्ध व्यक्तींची नावे पण लिहून घेतली. एवढी तयारी झाल्यावर गायींचा व्यापारी म्हणून त्यांनी सयामकडे मोर्चा वळविला. जिथे जिथं गायी दिसतील, तिथं तिथं जावे, गायींची किंमत विचारावी, किंमत करण्यासाठी धार काढून पाहावी, अर्थात त्यात भरपूर दूध मिळायचे. अशा तऱ्हेने एक आठवडा गेला. रात्री ब्रह्मी साधूंच्या झोपडीत झोपायचे आणि दिवस निघाला की पुढे प्रवास सुरू.

एके दिवशी वाटेतच मलेरियाने गाठले. थोडे दूर गेल्यावर लाइनमनची एक झोपडी लागली. ते आत गेले तेव्हा तो जेवत होता. तो हिंदू. यांचा वेष तर एका मुसलमानाचा. अल्लारखाँ नाव. पण तो माणूस अतिशय सज्जन होता. त्याने कसलाही विचार न करता त्यांना आपल्या झोपडीत ठेवून घेतले. तो थोडे फार शिकलेला असावा. त्याचे नाव होते 'अजुध्या.' वाचण्यासाठी त्याच्या झोपडीत काही पुस्तके दिसली. रात्री ताप चढला तेव्हा आझाद त्याला म्हणाले, 'काय होणार आहे, काही सांगता येत नाही. कागद–पेन घेऊन या आणि मी सांगतो ते लिहून घ्या. बहुतेक माझा अन्तकाळ जवळ आलासे वाटते.' मग कितीतरी वेळ बोलतच राहिले. पण मग खूप घाम आला आणि ताप उतरला. दुसरे दिवशी थोडे बरे वाटताच ते जाण्याची तयारी करू लागले. तेव्हा त्या अयोध्याने त्यांना अडविले. तो म्हणाला, 'आता तर मी तुम्हीला मुळीच सोडणार नाही. तुमचे नाव अल्लारखाँ नाही; तुम्ही

गायीचे व्यापारी नाही. मी सरकारचा नोकर असलो तरी तुमच्याबद्दल मला आदर आहे. तुम्ही एक क्रांतिकारी देशभक्त आहात. तुमच्यासाठी मी काय वाटेल ते करीन. या जंगलात मी तुम्हाला मुळीच जाऊ देणार नाही.' शेवटी त्याच्या झोपडीत एक आठवडा राहून त्यांनी मौलमीन शहराची वाट धरली. तिथे एका हॉटेलमध्ये राहून डॉक्टरांकडून इंजेक्शन घेतले. आणि या रस्त्याने जाऊन आपला काही निभाव लागणार नाही, हे ओळखून ते रंगूनला परत फिरले. रंगूनहून सरळ कलकत्त्याला जाण्याचे त्यांनी ठरविले आणि तिकीट घेण्यासाठी ते बंदरावर पोचले. तेवढ्यात एक मद्रासी त्यांच्या मागे मागे असा चालू लागला. तो त्यांना दम देऊन पोलीस ठाण्यावर चलण्यास सांगू लागला. शेवटी म्हणाला, 'पन्नास रुपये काढ तर तुला सोडतो.' आझादांनी घाबरल्याचे सोंग केले. पन्नास रुपये द्यायला कबूल झाले. ते म्हणाले. 'माझ्याजवळ इथे पैसे नाहीत; माझ्या मित्राकडे जाऊ या; तिथं मी तुला पैसे देतो. पोलीस ठाण्यावर नेऊन माझी बेअब्रू करू नकोस.'

तो त्यांच्याबरोबर जायला तयार झाला. जाता जाता असे एक ठिकाण आले की तिथे जवळपास कोणीही नव्हते. इकडे तिकडे पाहून ते एकदम थांबले आणि त्यांनी काठीतून आपली गुप्ती बाहेर काढली. त्याला म्हणाले, 'तोंडातून आवाज निघाला की तू मेलासच असे समज. आणि मी लांब निघून जाईपर्यंत इथेच बसून राहा. उठलास तर बघ. असा दम देऊन ते पळत सुटले आणि पंधरा मिनिटे पळतच राहिले. कर्मधर्मसंयोगाने त्याना एक घोडागाडी मिळाली आणि ते शहराच्या मध्यभागी आले. थोडा आडोसा पाहून त्यानी आपले कपडे बदलले आणि मोनेवाचे तिकीट घेऊन गाडीत बसले. घरी जाऊन वडिलांना सर्व हकीकत सांगितली.जहाजातून कलकत्त्याला जाण्याचा बेत त्यांनी रद्द केला. ब्रह्मदेशच्या उत्तरी भागातून मणिपूर आणि तिथून भारत असा प्रवास नक्की झाला. वडिलांनी पूर्वी देऊ केलेल्या हजार रुपयांतून त्यांनी फक्त दोनशेच घेतले होते. ते खर्च झाले म्हणून पुन्हा फक्त शंभर रुपये घेऊन त्यांनी आपल्या प्रवासाला आरंभ केला. छिंदविन नदीतील एका छोट्या स्टीम बोटीतून ते इच्छित स्थळी पोचले. त्याला चार दिवस लागले. त्या नदीच्या दोन्ही तीरांवर घनदाट जंगल आहे. त्यात सर्व प्रकारचे हिंस्र पशू, हत्ती, जंगली रेडे, वगैरे जनावरे आहेत. निसर्गसौंदर्य

भरपूर आहे, पण वातावरण भयानक आहे. तीरावर छोटी-छोटी गावं आहेत. प्रवाशांना मधून मधून उतरून फिरून येता येते. मणिपूरच्या पुढे वाट जात नाही. मणिपूरच्या सीमेवर उतरून सर्व प्रवासी बौद्ध भिक्षूंच्या धर्मशाळेत मुक्काम करतात. आझादांनी पण तिथेच मुक्काम केला. तिथे बोलता बोलता समजले की मणिपूरला जायचे दोन रस्ते आहेत. एक सरकारी रस्ता आहे. तिकडून जाण्याचे झाल्यास कर भरावा लागतो. नाव, गाव सर्व लिहून द्यावे लागते. दुसरा रस्ता जंगलातून जातो. तिथे नाव वगैरे विचारणारे कोणी नाही, पण जीव घेणारे हिंस्र पशू मात्र पुष्कळ आहेत. असे असले तरी आझादांनी तोच रस्ता पसंत केला. सुदैवाने त्याच रस्त्याने जायला तयार असणारे आणखी चार तरुण त्यांना भेटले. त्यांना रस्ता ठाऊक होता. ते म्हणाले, " सरकारी रस्त्याने पाच दिवसांचा प्रवास आहे, जंगलाच्या रस्त्याने आपण तीन दिवसांत पोहोचू. आझादांनी त्यांच्याबरोबर जाण्याचे ठरविले. आझादांचे सामान त्यांनी उचलावे आणि आझादांनी त्यांच्या जेवण्या-खाण्याचा खर्च आझादांनी करावा असा सौदा झाला. थोडे दूर जातात न जातात तो पाऊस सुरू झाला. आणि वाटेत एक नाला आडवा आला. पाण्याला खूप ओढ होती. नाल्याच्या पलीकडे वस्ती होती. नाला ओलांडण्या-साठी नाल्यात पाऊल टाकणे म्हणजे मृत्यूच्या जबड्यात आपली मान देण्यासारखेच होते; तरी त्यांनी तसेच जाण्याची तयारी केली आणि आता पाण्यात पाऊल टाकणार तेवढ्यात तिथेच जवळपास राहणारे काही लोक बघता बघता पाण्यात वाहून जाताना दिसले. नाल्यातून पलीकडे न जावे तर रात्री हिंस्र श्वापदांच्या तडाख्यात सापडण्याची भीती. नाल्यातून सावध-पणे गेल्यास काही भीती नाही; आम्ही नेहमी जातो असे त्या चौघांनी सांगितले. तशी आझादांना भीती ठाऊकच नव्हती. आपले कपडे काढून त्यांनी त्या लोकांच्या हवाली केले आणि ते पाण्यात शिरले. ते वाहात वाहात एक मैल अंतरावर दुसऱ्या किनाऱ्याला लागले. अशा रीतीने मणिपूरला तर पोचले. आता प्रश्न होता पुढे भारतात कसे जावयाचे : मणिपूरमध्ये एक सर्कस आली होती. त्या सर्कशीतला एक माणूस रजेवर जाणार होता. त्यालाही भारतात जायचे होते. त्याच्या नावाबरोबरच आपले नाव देऊन त्यांनी परवाना मिळविला. अशा रीतीने दोन महिन्यांनी ते भावनगरला परत

आले. भारत सोडताना परवानगी न घेताच ते गेले होते; पण अधिकाऱ्यांचे त्यांच्यावर एवढे प्रेम होते आणि तिथे एवढी मोठी कामगिरी त्यांनी केली होती की विद्याधिकाऱ्यांनी त्यांना एकही प्रश्न न विचारता कामावर घेतले. ते आझादांना म्हणाले, "आम्ही तके तुमच्यावर प्रेम करतो तेवढे जर तुम्ही आमच्यावर केले तर काय बहार होईल! तुम्ही ब्रह्मचारी; तुम्ही कशाला कुणाची पर्वा करणार!"

●

# २१. इन्स्पेक्टरसाहेब, सलाम

हा १९२१ चा काळ होता. सरदार भगतसिंह आणि त्याचे सहकारी पकडले गेले होते. राजगुरूचा मात्र पत्ता नव्हता. कोणातरी मूर्ख पोलिसाला वाटले की हे 'स्वामीराव' म्हणजेच राजगुरू. संध्याकाळच्या वेळी एक माणूस आझादांच्याकडे आला आणि म्हणाला, "गुरुजी, माझ्या मुलाला तुमच्या व्यायमशाळेत घ्या. अतिशय बंड आहे बघा."

"उद्या घेऊन या" असे सांगितले तरी तो आझादांची पाठ सोडीना. त्याने विचारले. "पण गुरुजी, तुमचं खर नाव काय बरं?"

"नावाशी काय करायचं आहे; तुम्ही आपल्या मुलाला पाठवा म्हणजे झालं." असे थोडेसे रागाने बोलताच तो निघून गेला. दुसरे दिवशी तो पुन्हा आला; पण एकटा आला नाही, एक पोलिस इन्स्पेक्टर घेऊन आला. खोलीत येऊन दोघेही खुर्च्यांवर बसले. आझाद खोलीत नव्हते. ते बाहेरून येताच दोघेही उठून उभे राहिले आणि त्यांनी नमस्कार केला. त्याना पाहाताच आझाद पोट धरधरून हसू लागले.

"स्वामीजी; आपण इतके हसता? असं काय झालं?"

"तुमच्या मूर्खपणाला हसतो आहे. अहो, तुम्ही मला राजगुरू समजून पकडण्यासाठी आलात; मग हसू नको तर काय करू?"

"मग तुम्ही खरोखरंच राजगुरू नाही? पण 'स्वामीराव' हे काही

तुमचं नाव नाही. " असे म्हणून त्या इन्स्पेक्टरने एक कागद पुढे केला आणि त्यावर आपले खरे नाव लिहावयास सांगितले. आझादांनी हसत हसत तो कागद घेतला आणि लिहिले, "स्वामीराव दयाराम, गाव कमालपूर, तहशील हमालपूर, जिल्हा नागपूर " मोठ्या उत्सुकतेने जेव्हा त्या इन्स्पेक्टरने ते वाचले तेव्हा त्याला कळले की आपली चांगलीच फसगत झाली आहे. भावनगरमधील वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांना 'स्वामीराव' खरे कोण. आहेत हे ठाऊक होतं आणि ते त्यांना आदराने वागवत. त्यामुळे हे राजगुरू प्रकरण तिथेच दवले.

१९३० ची सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली आणि भावनगरचे सर्व तरुण दक्षिणामूर्ती विद्याभवनातील सर्व कार्यकर्ते, व्यायामशाळेतील सर्व जवान सत्याग्रहात सामील झाले. आझादांच्यापुढे मोठा पेच पडला. सत्याग्रहात भाग घेतला नाही तर सर्व लोक तोंडावर थुंकतील आणि भाग घेतला तर जन्मठेप काही चुकणार नाही. तरुणांच्या मनात देशप्रेम जागृत करणारे स्वामीराव स्वत: मात्र मागे राहातात ही कल्पनाच त्यांना सहन होणे शक्य नव्हते. परिणामाची पर्वा न करता त्यांनी सत्याग्रहात उडी घेण्याचे ठरविले. लोकांच्यासमोर त्यांचे भाषण झाले. हे त्यांचे पहिले राजकीय भाषण. लोकांची कल्पना होती की इतराप्रमाणे स्वामीरावही एक-दोन वर्षे तुरुंगात राहून परत येतील. जिवापलीकडे प्रेम करणाऱ्या या सर्व लोकांना आता आपल्याला कायमचे सोडून जावे लागणार आहे याची जाणीव फक्त त्यांनाच होती आणि त्यामुळे ते अतिशय दु:खी झाले.

सौराष्ट्रातील मोठी छावणी रानपूरला होती. तिकडे सर्व सत्याग्रहींना नेण्यात आले. तिथे अमृतलाल सेठ हे प्रमुख होते. त्यांनी आझादांना प्रतिज्ञापत्रकावर सही करावयास सांगितले. त्या प्रतिज्ञेत एक वाक्य होते, "मन, वचन और कर्म से मैं सत्य और अहिंसा का पालन करूँगा. " आझादांनी त्यावर सही करण्याचे नाकारले. सर्वांना आश्चर्य वाटले. त्यात भर म्हणजे एवढे भाषण करून सत्याग्रहात सामील होण्यासाठी आलेले आझाद म्हणाले, 'मी सत्याग्रह करण्यासाठी आलोच नाही; या माझ्या तरुण मित्रांबरोबर राहायला आलो आहे. अमृतलाल सेठ यांना स्वामीराव यांचा चांगला परिचय असल्यामुळे त्यांनी आग्रह धरला नाही. सरकारच्या गुप्तचर

विभागातील बरेच लोक तिथे वावरत होते. ते स्वामीरावांना ओळखत नव्हते. त्याने पाहिले की सर्व सत्यग्रही ज्या अर्थी या गृहस्थाचा एवढा मान ठेवतात त्याअर्थी हा कोणीतरी क्रांतिकारक असावा. एक दिवस आझाद धन्धुकाला गेले; तिथेही हे पोलीस हजर.

संध्याकाळी चारच्या सुमारास शहाबुद्दीन नावाचा एक पोलीस इन्स्पेक्टर त्यांच्याजवळ आला. तो पंजाबी मुसलमान होता : त्याच्या कमरेला पिस्तूल होते. सत्याग्रहीवर तो अवन्वित अत्याचार करीत असे : तो म्हणाला, "सरकारने तुमच्यावर वॉरंट काढले आहे; तुम्हाला आमच्याबरोबर यावे लागेल."

सत्याग्रही तरुणांना ही बातमी समजताच ढोल वाजू लागला. सर्व सत्याग्रही एके ठिकाणी जमा झाले. तिथे अशी पद्धत होती. असे वाजतगाजत त्या व्यक्तीला जेलच्या दरवाजापर्यंत पोचवीत; पण हे आझादांना पसंत नव्हते. त्यांनी स्पष्ट सांगितले की मी एकटा यांच्याबरोबर जाणार; आमच्या-बरोबर कोणीही येऊ नका. पायांत काही नाही; डोक्यावर काही नाही, अशा अवतारातच ते शहाबुद्दीनला म्हणाले, "चला, मी तयार आहे." ते चालू लागले. आणि त्याचबरोबर त्यांच्या डोक्यात विचारचक्र चालू झाले. याच्या हातून निसटून जाता येईल का? गल्ली–बोळांतून ते चालले होते. पुढे मोठी सडक लागणार होती. त्यांनी लगेच ठरविले की पुढच्या कोपऱ्यावर याला सलाम ठोकायचा. त्यांनी मनातल्या मनात काही हिशोब केला. कमरेचे पिस्तूल काढून गोळी झाडण्यासाठी याला निदान दहा सेकंद तरी लागणारच. तेवढ्या वेळात आपण ५० यार्ड अंतर सहज काटू. त्या अंतरापेक्षा अधिक अंतरावर पिस्तूल सहसा काम देत नाही हें त्यांना ठाऊक होते. मनात पक्का निश्चय केला आणि हसत हसत थट्टेच्या स्वरांत त्या इन्स्पेक्टरला म्हणाले, 'इन्स्पेक्टरसाहेब, सलाम' आणि बदुंकीतून सुटलेल्या गोळीप्रमाणे सुसाट पळत सुटले. त्याने पाठलाग करून गोळी झाडली की नाही ठाऊक नाही, पण गोळीचा आवाज त्यांच्या कानावर आला नाही. एका मिनिटात ते बाजूच्या शेतवाडीत घुसले आणि कुंपणावरून उडी मारून पसार झाले. सुदैवाने पाऊस जोरात पडू लागला आणि सर्व शेते पाण्याने भरून गेली. त्यामुळे त्यांचा पाठलाग करणे अवघड झाले. खूप दूर गेल्यावर एका

ओळखीच्या गावाशेजारी ते लपून बसले आणि अंधार पडल्यानंतर त्यांनी गावात प्रवेश केला. तेवढ्यात 'स्वामीजी आप' असे कोणाचे तरी शब्द कानावर पडले. घोड्यावरून खाली उतरत कोणीतरी विचारले, " इकडे कुठे स्वामीजी ?"

त्या आश्चर्यचकित झालेल्या तरुणाला आझादांनी सर्व हकीकत थोडक्यात आणि खालच्या आवाजात सांगितली. भावनगरच्या रजपूत हॉस्टेलचा तो विद्यार्थी – गुलाबसिंह होता तो. पोलिसांना पत्ता लागू नये म्हणून आझादांना त्याने एका गवताच्या गंजीत लपविले. थोड्या वेळाने तो गरम दूध घेऊन आला. तेव्हा त्यांनी त्याला आपला बेत सांगितला. त्या गावात अगदी जिवाला जीव देतील असे बरेच तरुण आझादांचे विद्यार्थी होते. कमीत कमी वीस तरी खास निघाले असते. त्यांच्यापैकी चौघांजवळ बंदुकाही होत्या. दोन घोडे आणले गेले. एका घोड्यावर स्वतः आझाद आणि दुसऱ्या घोड्यावर कोणीही एक तरुण. दोघांनी भावनगरला जायचे. बाकीच्यांनी पोलिस पाठलाग करीत आलेच तर त्यांना गुंतवून ठेवायचे असा बेत ठरला; अमलातही आला. थोड्याच वेळात ते भावनगरच्या खाडीजवळ आले. जवळच्या गावात घोडे सोडून दिले आणि स्वतः खाडी पोहून पलीकडे गेले. डॉ. पुरुषोत्तम विनायक काणे आणि भाऊद्दीन शेख यांना बातमी देताच ते धावतच आले. रात्रीतल्या रात्रीत आझादांनी मुसलमानाचा वेष घेतला आणि ते रेल्वेने मुंबईला गेले.

## २२. लॅमिंग्टन रोड पोलीस चौकीवर हल्ला

नंतर सात-आठ वर्षे भारतभर भ्रमण चालले होते, पण पोलिसांना काही त्यांचा पत्ता लागला नाही. पोलीस निरनिराळ्या मार्गांनी प्रयत्न करीत होते. इतर क्रांतिकारी लोकांशी गप्पा मारून त्यांच्याकडून काही माहिती मिळते का ते पहात होते. गम्मत अशी की गुप्तचर विभागाचे

पोलीस असा शोध करीत असतानाच आझाद अलाहाबादला गेले. तिथे श्रीराम वाजपेयी यांच्याकडे स्व. धन्वंतरी आणि आझाद यांची भेट झाली. त्यानंतर चंद्रशेखर आझाद यांना भेटून त्यांच्याशी बरीच चर्चा झाली. चर्चेचे सार एवढेच की आता त्यांचा आतंकवादावर पूर्वीसारखा विश्वास राहिला नाही. जुलमी अधिकाऱ्यांची कत्तल केली की आपले काम होईल असे पूर्वी वाटत असे; ती समज चुकीची असल्याचे आता त्यांना अनुभवाने पटले होते. आपले इष्ट साध्य करण्यासाठी बोल्शेविक क्रांतीचा मार्ग स्वीकारला पाहिजे आणि क्रांतिकारकांपैकी कोणीतरी स्वत: रशियाला गेले पाहिजे आणि त्याचा अभ्यास केला पाहिजे असे सर्वानुमते ठरले. त्याप्रमाणे भगतसिंहांनी आझादांची निवड केली. रशियाला कसे जायचे, कोणाशी संपर्क साधायचा हे सर्व काम त्यांच्यावर सोपवावे असा भगतसिंगांचा निरोप होता. "आजपासून आम्ही म्हणजे रिपब्लिकन आर्मीचे लोक तुम्हाला आमचे हत्यारबंद साथी समजतो." असे म्हणून धन्वंतरींनी अकरा गोळ्यांचे एक ऑटोमॅटिक पिस्तूल आणि ५० काडतुसे आझादांना दिली.

यानंतर भगतसिंह पकडले गेले; त्यांना फाशी देण्यात आले. त्यांचे बरेचसे साथीदार पृथ्वीसिंहांना येऊन भेटले आणि सर्वांनी मिळून एक योजना आखली. भगतसिंहांनी असेंब्लीत बॉंब टाकून ज्याप्रमाणे खळबळ माजविली; तसाच प्रकार फक्त दहशत म्हणून करावा. त्यांत कोणाची हत्या करावयाची नाही. यातूनच पुढे लॅमिंग्टन केस निघाली.

त्या काळी लॅमिंग्टन रोड पोलीस स्टेशनवर बहुतेक अँग्लो–इंडियन काम करीत असत. त्या चौकीवर गोळ्यांचा पाऊस पाडण्याचे ठरले. फिरण्यासाठी म्हणून एका मित्राची मोटार मिळविली. चालवायला क्रांतिकारकांपैकीच एक होता जे. बापट. पोलिसांना मोटारीचा पत्ता लागू नये म्हणून तिच्या नंबराची प्लेट बदलण्यास सांगितली. चौघांनी मृत्यूशी खेळ करण्याचे ठरविले.

रात्रीचे अकरा वाजले. लॅमिंग्टन पोलीस चौकी आणि तिच्यापुढील रस्ता दोन्ही ठिकाणी भरपूर प्रकाश होता. चौकीसमोर यांनी गाडी उभी केली. चौकीतल्या पोलिसांना कसे तोंड द्यायचे, त्यांच्या गोळीबाराचा प्रतिकार कसा करायचा, यांपैकी कोणत्याही गोष्टीचा कसलाही विचार करण्यात

आला नव्हता. देशप्रेमाने वेडे झालेले हे चौघे आपली गाडी तिथे उभी करतात न करतात तोच चौकीतून चार सार्जंट बाहेर येताना दिसले. त्याबरोबर पूर्वी ठरल्याप्रमाणे यांनी गोळयांचा अक्षरशः पाऊस पाडला. ते सार्जंट चौघेही जमिनीवर पालथे पडले. तेवढयात तिथे एक मोटार येऊन थांबली. हा गोळयांचा वर्षाव कशासाठी होतो आहे हे त्यांना कसे कळणार ! एक साहेब आणि एक मॅडम त्या मोटारीतून खाली उतरले. ते नेमके गोळयांच्या टप्प्यात. त्या स्त्रीच्या पायाला गोळी लागली त्या साहेबाने तिला उचललेले पाहून यांनी गोळीबार थांबविला; पण समोरच्या मोटारीवर काही गोळया झाडल्या तिला निकामी करण्यासाठी. हे सगळे काही मिनिटांतच घडले. एका स्त्रीला गोळी लागली हे पाहून या लोकांची धुंदी उतरली. कोणाला मारणे तर राहू द्याच, पण जखमी करण्याचा सुद्धा त्यांचा हेतू नव्हता. त्यांनी आपली मोटार ६० मैलांच्या वेगानें सोडली. मोटारीच्या मालकाकडे जाऊन त्याची मोटार त्याच्या हवाली केली. आणि घडलेली सर्व हकीकत त्याला सांगितली.

तिथून पसार झाले तरी पोलिसांच्या तावडीतून सुटणे कठीण होते. आझादांचा आत्मविश्वास दांडगा होता. त्यांनी निश्चय केला की पोलिसांना आपला पत्ता लागला आणि ते पकडू लागले तर आपले जिवंत शरीर त्यांच्या हाती लागू द्यायचे नाही. आपले प्रेत ओळखू यावे म्हणून त्यांनी आपला जबाब लिहून आपल्या खिशात ठेवला. त्याचा मथितार्थ असा. "हिंदुस्थानच्या जनतेवर अत्याचार करणाऱ्या इंग्रजांनो, ऐका ! डोळयांवरची झापड बाजूला सारून पहा, कान उघडे ठेवून ऐका, बुद्धी ठिकाणावर ठेवून विचार करा, वस्तुस्थिती ओळखा आणि माणुसकीच्या मार्गावर चालायला शिका. १९११ मध्ये वीर मदनलाल धिंग्राने पिस्तुलाच्या वळावर तुम्हांला सावध करण्याचा प्रयत्न केला. १९१२ मध्ये देशप्रेमी लोकांनी दिल्ली दरबारच्या वेळी बाँबच्या धडाक्यांनी तुमच्या कानाचे पडदे फाडून क्रांतिप्रिय लोकांचा आवाज तुमच्यापर्यंत पोचविला होता. क्रांतिकारी लोकांना जेव्हा समजले की इंग्रजांच्या डोळयांवर सत्तेचा मद चढला आहे, तेव्हा १९१५ मध्ये तुम्हांला आणि तुमच्या शासनाला नेस्तनाबूद करणे एवढा एकच उपाय आहे अशी त्यांची खात्री झाली. पुन्हा सन १९२९ मध्ये भगतसिंह आणि त्यांचे सहकारी बटुके-

श्वर दत्त यांनी असेंब्लीत बाँब टाकून इंग्रजी शासनाची बुद्धी ठिकाणावर आणण्याचा प्रयत्न केला. भगतसिंह आणि त्यांचे साथीदार फासावर लटकावून तुम्ही भारतातील नवयुवकांना आव्हान दिले आहे. आम्ही ते स्वीकारतो. आज मुंबईच्या लॅमिंग्टन रोडवरील पोलीस चौकीवर गोळीबार करून तुम्हांला असे बजावण्याचा प्रयत्न केला आहे की तुम्ही जर मदांध होऊन असेच जुलूम करीत राहिलात तर आपले मरण तुम्ही स्वतःच ओढवून घेत आहात असे समजा. भारतीय युवक आणि युवती तुमच्याशी रक्तरंजित होळी खेळायला तयार आहेत. याचा हा पुरावाच आहे. आम्ही हत्यारांच्या बळावर अगदी सार्वजनिक ठिकाणी तुमच्या पोलिसाला बेदम चोपले आहे. सरकारच्या विरुद्ध बंड करणाऱ्या लोकांना एके काळी काही भोळे लोक देशद्रोही म्हणत. आज ज्याच्या अंतःकरणात देशप्रेम नाही त्यालाच लोक देशद्रोही म्हणतील.

"मी आपल्या देशासाठी प्राण टाकीत होतो; तर तुमच्या जुलमी सरकारने मला फासावर चढविण्याची तयारी केली. देशातील जनतेने मला मृत्यूच्या जबड्यातून ओढून काढले आणि मी आपल्या स्वतःच्या बळावर सर्व बंधने तोडून टाकून स्वतंत्र झालो. आज यदाकदाचित जर मला पोलिसाशी सामना करावा लागला तर मी निश्चित सांगतो माझे प्रेतच त्यांच्या हाती लागेल.

' जोपर्यंत तुमचे हे सरकार उलथून पडत नाही तोपर्यंत देशातील युवक आणि युवती रस्त्यारस्त्यांतून आणि मैदानामैदानांतून अशीच टक्कर देत राहातील."

या त्यांच्या वक्तव्यात त्या दुखापत झालेल्या स्त्रीची माफी मागितली होती.

मुंबईमध्ये असा प्रकार प्रथमच घडला होता. मोटारीचा नंबर, प्रकार आणि रंगही पोलिसांनी पाहिला होता. मूळचा नंबर बदलण्यास सांगूनही ड्रायव्हर ते विसरला त्यामुळे दिवस निघायच्या आतच ती मोटार पोलिसांनी ताब्यात घेतली. तिच्या मालकाला पकडण्यात आले. गाडी उघडून पाहिली तेव्हा त्यात रिकामी काडतुसे पडलेली सापडली. या लोकांना एवढेही अवधान राहिले नाही. गाडीच्या मालकाने पाहिले की आता यातून सुटणे कठीण आहे आणि त्याने सर्व हकीकत पोलिसांना सांगितली. गणेश रघुनाथ वैशंपायन, ड्रायव्हर बापट, मोघे तारमास्तर, सर्वांची नावे त्याने सांगितली.

या सर्वांना पोलिसांनी पकडल्यानंतर वैशंपायन सोडून बाकीच्यांनी सर्व कबूल केले. वैशंपायन स्वा. सावरकरांचे साथी—जुने—क्रान्तिकारक त्यांना जिवे न मारता जितका छळ करता येईल तेवढा केला गेला; पण त्यांनी तोंडातून एकही शब्द काढला नाही. त्यांचा तिसरा साथीदार होता सुखदेव. आणि चौथा भगतसिंहचे साथीदार भगवतीचरण यांची पत्नी दुर्गादेवी. या दोघां-बद्दल वैशंपायन सोडून कोणालाही माहिती नव्हती. क्रांतिकारकांमध्ये एखादी स्त्री पण असेल अशी कल्पनासुद्धा पोलिसांना नव्हती. लांब केसांचे बरेच तरुण पोलिसांनी पकडले; त्यांना बेदम चोप देण्यात आला आणि काही दिवसांनी सोडून देण्यात आले.

दुर्गादेवी शूर क्रान्तिकारक भगवतीचरण यांची पत्नी या कटात सामील होण्यापूर्वी आपल्या चार वर्षांच्या मुलाला गणेश दामोदर सावरकर यांच्या हवाली करून ती आली होती. सुखदेव आणि दुर्गादेवी मुंबईत गुप्तपणे पसार होण्यात सहज यशस्वी झाले. सरदार पृथ्वीसिंह यांना पकडण्यासाठी बंदर, स्टेशन, एअरपोर्ट सर्व ठिकाणी नाकेबंदी करण्यात आली; पण ज्या वाटेने जाण्याचे त्यांनी ठरविले तो मार्ग—जंगलचा मार्ग—मोकळाच राहिला. ते जंगलातून मुंबईपासून वीस मैल चालत गेले आणि एका स्टेशनवर गाडीत बसले. रात्र झाली. पुढे एका स्टेशनवर पाणी पिण्यासाठी खाली उतरतात तो समोर पोलीस. ते तिघेजण होते. अधिकाऱ्याकडून त्यांना जी माहिती मिळाली होती त्यावरून त्यांनी अंदाज बांधला की याला असे पकडणे सोपे नाही. म्हणून त्यांनी मग एक निराळीच युक्ती योजली; आझाद जेव्हा डब्यात चढले तेव्हा त्यांनी इतर उतारूंना त्या डब्यातून खाली उतरविले. आता ते तीन पोलीस आणि एक पृथ्वीसिंह एवढीच मंडळी डब्यात राहिली; आझादांजवळ पिस्तूल असले पाहिजे याची त्याना कल्पना होती आणि हे पोलीस काही आपल्याला आता सोडणार नाहीत हे आझादांनी ओळखले होते. दोन्ही पक्ष एकमेकांकडे पाहात होते. एक पकडण्यासाठी आणि दुसरा निसटून जाण्यासाठी. गाडी चालू झाली खरी पण पुढचे स्टेशन येण्याच्या अगोदरच गाडी थांबली, जिकडे तिकडे दाट जंगल. आझादांना पाहिजे तशी संधी मिळाली. त्यांनी पिस्तूल बाहेर काढले; पण ते झाडण्याच्या आत त्या तिघाही पोलिसांनी जमिनीवर लोळण घेतले; आझादांची योजना सफल

झाली. गोळी न झाडताच गाडीतून उडी टाकून ते पसार झाले. बाहेर तोंड काढून पाहण्याची सुद्धा पोलिसांची छाती झाली नाही. गाडी पुढच्या स्टेशनपासून सुमारे एक मैल दूर होती; आणि डबा रिकामा त्यामुळे तिथे दुसरे कोणीच नव्हते. जंगलातून बरेच दूर गेल्यानंतर एके ठिकाणी ते झोपून राहिले. सकाळी पाहातात तो नवसारी गाव. गावात जाऊन एखाद्या खेडुताला शोभेल असा पोशाख खरेदी केला. आणि वेश पालटून जवळच्या सुपा नावाच्या गावात गेले. तिथे आर्यसमाजी लोकांचे गुरुकुल होते, तिथे त्यांनी आसरा घेतला. त्यांचा एक जुना मित्र तिथे होता, त्यानेही त्यांना ओळखले नाही. दोन दिवस राहून अंदाज घेण्याचा विचार आहे असे सांगताच त्याला खूप आनंद झाला. शूटिंग केसविषयी सर्व माहिती वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झालीच होती. भावनगरमध्ये ते 'स्वामीराव' म्हणून ओळखले जात असल्यामुळे त्याच नावावर त्यांचा फोटो पण छापून आला होता. त्यांना पकडून देण्यारास फार मोठे इनाम जाहीर झाले होते.

●

# २३. अबूच्या पहाडात

ते तुरुंगातून दोन वेळा निसटून आले होते; आता त्यांना सबंध देशच तुरुंग वाटू लागला. एका बाजूला समुद्र, एका बाजूला हिमालय. भारताच्या बाहेर पडता येईल अशी प्रत्येक वाट पोलिसांनी अडवून ठेवली होती, तरी पण त्यांनी ठरविले की आता भारत सोडायचाच; इथं आता या बंदिवासात राहाणें नको. शेतकऱ्याचा वेष तर होताच. हातात एक काठी घेतली आणि ती टेकत-टेकत चालले. स्टेशनावर जाऊन एके ठिकाणी बसले तेवढ्यात एक तरुण तिकीट घराकडे जाताना दिसला. त्याला हाक मारून केविलवाण्या स्वरात म्हणाले, "बेटा, मला बडोद्याला जायचं आहे. माझे कमरेचे हाड मोडले आहे. माझे एवढं तिकीट काढून आण आणि मला गाडीत बसव." त्या तरुणालाही बडोद्याला जायचं होतं. त्याने नुसते गाडीत बसवून दिले

नाही; तर त्यांच्याकरिता लोकांची विनवणी करून झोपण्यासाठी जागा पण त्यांना मिळवून दिली. आझादांनी आता तोंडावरून पांघरूण घेऊन ताणून दिली. बडोद्यालाही तो त्यांना प्रो. माणिकराव यांच्याकडे घेऊन गेला. प्रो. माणिकराव यांनी मात्र आझादांना पाहिल्याबरोबर ओळखले आणि सर्व स्थिरस्थावर होईपर्यंत इथेच राहा असे सांगितले. कारण पोलिसांचा शोध जारीने चालू होता आणि स्वामीरावांना ओळखणारे अनेक तरुण कामधंद्यानिमित्त भारतभर पसरले असल्यामुळे कोण कसा केव्हा ओळख काढील हे सांगत येत नव्हते.

अशा परिस्थितीत काहीही करून भारताच्या वाहेर जाण्याचे त्यांनी पक्के केले आणि एके दिवशी ते कुठं गुप्त झाले ते कोणालाच कळले नाही; काखेत मृगचर्म, हातात कमंडलू, खांद्यावर एक घोंगडी घेतलेला आणि हातात. काठी असलेला एक संन्यासी मात्र त्या दिवशी भावनगर सोडून गेला. आझादांचे मित्र श्री. नगरदेवळेकर या संन्यासी व्यक्तीला गावच्या सीमेपर्यंत पोचविण्यास गेलेले दिसले. स्वामीजींनी दाढी, मिशा आणि डोक्यावरचे केसही सफाचट केल्यामुळे आणि त्यांच्या भरदार छातीमुळे हा कोणीतरी हिमालय निवासी साधू असावा असेच कोणालाही वाटले असते.

एका गावाहून दुसऱ्या गावाला जाण्यासाठी आझाद—ते स्वामीजी आत्मानंद्र होते. शतवडीचाा रस्ता घेत, वेष इतका बेमालूम आणि वाणी इतकी मधुर की साधुमहात्माही त्यांच्या संगतीत आल्याबरोबर प्रभावित होत. अनेक लोकांशी चर्चा करून, अनेक पंथांची माहिती त्यांनी गोळा केली; त्यामुळे सर्वांबरोबर तितक्याच अधिकारवाणीने बोलू शकत. एके रात्री एका साधुमहाराजांच्या झोपडीतच मुक्काम केला. साधुबाबांनी जेवू घातलं आणि काय असेल ते असो रात्री आझादांना सारखे जुलाब होऊ लागले. मनात साधुबाबाविषयी संशय निर्माण झाला. ते आत झोपले होते. ते खरेच झोपले होते की त्यांनी ढोंग केले होते समजायला मार्ग नव्हता. सावधगिरीचा उपाय म्हणून ते मुकाट्याने तिथून वाहेर पडले आणि दूर निघून गेले. दिवस निघता निघता जुलाब थांबले. गावाबाहेर एक तलाव होता; त्यात स्नान करून जवळच्या देवळात झोपून राहिले. कोणीतरी भक्त येई आणि त्यांच्या पोटापाण्याची सोय करी. असे दिवस चालले होते.

अबूच्या पहाडाजवळ एक देवीचे स्थान आहे. गुजराथेतील खूप लोक तिथे जातात. फारच रमणीय स्थान आहे. आझादांची स्वारीही तिथे गेली. ते तिथल्या महंताला भेटले. महंतांनीही त्यांना तिथे राहायला जागा दिली. दुसरे दिवशी गुजराथेतील एक पोलीस त्या महंताकडे आला आणि त्याने त्यांना जेवणाचे आमंत्रण दिले. महंत म्हणाले, "साधू लोकांना जेवू घालून पुण्य संपादन करावयाचे असेल तर ते पाहा साधुमहाराज बसले आहेत. त्यांच्याकडे जा. त्यांनी जर तुझे आमंत्रण स्वीकारले तर तुमचे मनोरथ पूर्ण होतील. तो पोलीस मग मोठ्या आदरभावनेने आझादांजवळ आला. त्या वेळी ते प्राणायाम करीत होते. तो पोलीस अधिकारी अधिकच प्रभावित झाला. थोड्या दूर अंतरावर अगदी आवाज न करता बसून राहिला. काही वेळाने आझादांनी डोळे उघडले, तेव्हा त्यांना मोठ्या भक्तिभावाने नमस्कार करून म्हणाला, "आपला आशीर्वाद मिळावा म्हणून आलो आहे."

ते हसून म्हणाले, "दिला; जा आता. मी कामात आहे."

"मी तर आपल्याला भोजनाचे आमंत्रण द्यायला आलो आहे. आपण तृप्त झाल्यावर मला आशीर्वाद मिळावा अशी इच्छा आहे. मी पोलीस इन्स्पेक्टर आहे. अंबामातेच्या दर्शनाकरिता सपरिवार आलो आहे."

"काय पाप केले?" आझाद म्हणाले, "भोळ्याभावड्या साधूचे आशीर्वाद घेऊन केल्या पापाचे फळ चुकविण्याचा प्रयत्न दिसतो आहे."

पण तो मुळीच ऐकेना तेव्हा ते कबूल झाले. त्याच्या पत्नीने आग्रह करकरून जेवू घातलं, सव्वा रुपया आणि एक कोरे धोतराचे पान देऊन आशीर्वाद मागितला; तेव्हा ते हसत हसत म्हणाले, "लाच खाऊन आशीर्वाद देणारा हा साधू नाही. मला तुमचे पैसेही नकोत आणि धोतर पण नको. तुमच्यासारखे दानी पावलापावलावर भेटतात. पैशाचं मी काय करू? आवश्यक तेवढे वस्त्र माझ्याजवळ आहे. उगीच संभाळण्याचा त्रास." त्या धोतराला आणि पैशाला स्पर्श करून ते पुढे म्हणाले, "हे पैसे आणि हे धोतर संभाळून ठेवा. कधी काही कमी पडणार नाही; नेहमी सुखी राहाल."

एवढा आशीर्वाद घेऊन तो पोलीस ऑफिसर महन्ताकडे गेला आणि त्याच्यापुढे पंचवीस रुपये ठेवून म्हणाला, "आपली माझ्यावर मोठीच कृपा

झाली. अशा महापुरुषाचे दर्शन घडविलेत. त्यांचा आशीर्वाद मला मिळाला; धन्य झालो."

त्याचे बोलणे ऐकून आणि ते रुपये पाहून महंतही खुष झाले. आझादां-बद्दलचा त्यांच्या मनातील आदर शतगुणित झाला. असे बरेच लोक जेव्हा आशीर्वाद घेण्यासाठी येऊ लागले तेव्हा आझादांना भीती वाटू लागली. एखाद्याने ओळखले तर? म्हणून त्यांनी स्थानांतर केले. त्या मंदिरापासून दूर डोंगरावर एक रमणीय स्थान होते. तिथे एक धबधबा होता. त्याच्या-समोर काही कुडी तयार झाली होती. साधुसन्तांना राहण्यासाठी काही खोल्या पण होत्या. हे स्थान जंगलाच्या अगदी अंतरंगात दाट झाडीत आहे. सूर्यास्तानंतर ते आपल्या जागेवरून उठले आणि महंताजवळ गेले. त्यांच्या-जवळ त्या सुंदर ठिकाणाचे वर्णन केले. त्या महंताला वाटले की हा संन्यासी जर कायमचा इथं राहिला तर श्रीमंत लोकांकडून मिळकतही भरपूर होईल. आणि एखादा शेटजी मंदिरही बांधून देईल. म्हणून तो म्हणाला, "तुमची इच्छा आहे ना तिथं राहायची; मग राहा. जरूर राहा. एखादा नोकर पाहिजे तर मी देतो. दोन्ही वेळचे जेवण मी वर पाठवीत जाईन." तशी व्यवस्था झाली. रात्रीच्या वेळी हिंस्र श्वापदे तिथे पाणी पिण्यासाठी येत. म्हणून भीतीने तिथे दुसरे कोणी राहात नव्हते. आझादांच्याजवळ निर्भय मन, अकरा गोळ्यांचे पिस्तूल आणि खोलीचे दरवाजे भक्कम होते. यामुळे भीतीचे काही कारणच नव्हते. महन्त स्वार्थासाठी त्यांचे माहात्म्य वाढत चाललेले पाहून खुषीत होता, पण त्याबरोबरच ओळखले जाण्याचा धोकाही वाढत होता. पुढे पुढे लोकांचा त्रास कमी व्हावा म्हणून ते त्यांचा अधिकात अधिक वेळ पहाडावरच राहू लागले. त्यामुळे तर त्यांची कीर्ती अधिकच पसरू लागली. मृत्यूला न भिणारा, धनाच्या लोभात न पडणारा आणि जंगली जनावरांशी मैत्री करणारा असा साधू पाहण्यासाठी लोकांची अधिकच गर्दी होऊ लागली. रोज स्वादिष्ट–पौष्टिक भोजन, ५०० दण्डांचा व्यायाम आणि धावत धावत पहाडावर चढणे हे सबंध दिवसाचे काम. शरीरावर तेज चढले नाही तरच नवल. पण ज्या ठिकाणी पूर्ण आराम आहे आणि लोकांमध्ये मान आहे, तिथे साधुसन्तांनी राहू नये हेच खरे. ते स्थान त्यांनी लवकरच सोडले.

आता त्यांनी कराची काँग्रेसला पायी जायचे ठरविले. तीन महिन्यांचा अवधी होता. उदयपूर, चितोड, हळदीघाट ही सर्व स्थाने पाहावीत असे बरेच दिवसांपासून मनात होते. या रस्त्याने साधू–संन्यासी फारच क्वचित जातात. त्यामुळे वाटेत लोकांकडून त्यांचे चांगले स्वागत होई. एके दिवशी कलकत्त्याचा एक कोटचधीश त्यांच्याकडे आला, थोडी चर्चा झाली आणि त्याने १२५ रुपये दान म्हणून दिले. अर्थात आझादांनी काही ते घेतले नाहीत; त्यामुळे त्या भागातही त्यांचे माहात्म्य वाढतच राहिले. प्रवास करीत करीत ते केलवा गावात आले. तिथे एक साधू होता; त्याच्याकडेच यांनी मुक्काम ठोकला. गावचे लोक दर्शनासाठी येऊ लागले. त्या गावात रामसिंह नावाचे एल ठाकुर राहात असत. सुशिक्षित, परदेशात राहून आलेले, शरीराने चांगले धष्ट-पुष्ट, त्यांनी आपल्या घरातील एक खोली आझादांना राहण्यासाठी दिली. आणि जेवणाखाणाची सर्व व्यवस्था केली.

बोलण्याच्या ओघात केव्हातरी लोकांना असे समजले की नवे साधुबाबा शस्त्र चालविण्यातही पारंगत आहेत. मग काय त्यांच्याजवळ शिक्षण घेण्यासाठी अनेक तरुण येऊ लागले. ठाकुर स्वतः देशभक्त होते. ते स्वामींना म्हणाले, ‘महाराज, आता आपण इथेच मुक्काम करा. तुम्हाला इथे अडचण वाटत असेल तर गावापासून दूर तुम्हाला एक झोपडी बांधून देतो; तिथे तुम्ही राहा.’

तिथल्या मुक्कामात त्यांनी एका शिकारीत भाग घेतला. आणखी एकदा मिडल स्कूलसाठी एका इमारतीचे उद्घाटन व्हायचे होते. उदयपूर संस्थानचे मुख्य विद्याधिकारी मेहता मोहनसिंह इमारतीच्या कोनशिला समारंभासाठी येणारे होते. त्या वेळी आझादांनी भाषण केले. त्यात त्यांनी देशातील बालक हेच आपले आराध्य दैवत व्हायला पाहिजे असे सांगितले. या भाषणामुळे त्यांची चांगलीच प्रसिद्धी झाली. आबाल-वृद्ध, स्त्री-पुरुष सर्वांना संन्यासीजी एक आदर्श पुरुष वाटू लागले. आझादांचे मन तिथे रमले; आसक्ती वाढू लागली. हे सर्व पाश हळू हळू तोडू म्हणून तुटणार नाहीत हे ओळखून एके दिवशीं पहाटेच आपले व्याघ्रांबर, दण्ड-कमण्डलू घेऊन ते गावाबाहेर पडले. तेवढ्यात कशी कोणास ठाऊक ही बातमी गावभर पसरली. छात्रालयातील

विद्यार्थी, ठाकुर, राजेसाहेब आणि गावातील प्रतिष्ठित मंडळी यांना समजावता समजावता त्यांना पुरेवाट झाली.

तिथून ते हळदीघाटाकडे चालले. वाटेत वैष्णव तीर्थक्षेत्र नाथद्वारा आहे. इथे एक भव्य मंदिर आहे. साधुसंतांना उतरण्यासाठी एक मोठी इमारत आहे. देवापुढे जे काही ठेवले जाई ते सर्व साधुसन्ताना वाटण्यात येई. तिथल्या महंताने आझादांसाठी एक खोली उघडून दिली. मंदिराचा दरवाजा दुपारभर बंद असे, तो संध्याकाळी उघडला जाई. दर्शनासाठी भक्तांची रीघ लागे. असे म्हणतात की या गर्दीला आवरण्यासाठी छडीच काय पण क्वचितप्रसंगी चाबकाचाही उपयोग केला जातो. आझाद दर्शनासाठी गेले तेव्हा संन्यासी म्हणून लोक त्यांना वाट करून देऊ लागले; पण त्यांनी लांबूनच दर्शन घेतल्याचे सांगितले. एक-दोन दिवसांनी कशी कुणास ठाऊक पण लोकांत वार्ता पसरली की एक सिद्ध पुरुष देवळात आला आहे. दर्शनासाठी लोकांची गर्दी होऊ लागली. संध्याकाळच्या वेळी एक साध्वी आली. तिने शुभ्र वस्त्र परिधान केले होते. तिच्याबरोबर आणखी चार-पाच तरुण स्त्रिया पण होत्या. एक वकीलही होते. त्यांच्या बरोबर ते हात जोडून म्हणाले, 'माता भूरीबाई आपल्याला आपल्या आश्रमात घेऊन जायला आल्या आहेत.' एवढे आगत्याचे बोलावणे, नकार देणे बरोबर वाटले नाही. एका मोहातून सुटून दुसऱ्या मोहात पडणारसे दिसू लागले.

नाथद्वारा येथे भूरीबाईला मोठे मानाचे स्थान होते. त्यांच्या आश्रमात पंधरा दिवस आश्रमीय लोकांनी त्यांची अतिशय भक्तिभावाने सेवा केली. भूरीबाईने त्यांना चांगलेच प्रभावित केले; पण तो मोह आवरून ते लवकरच ते स्थान सोडून पुढे निघाले. दुसऱ्या दिवशी हळदीघाट, नंतर उदयपूर आणि तिथून पुढे कराची.

# २४. कराची कॉंग्रेस

कराचीच्या कॉंग्रेसनगरमध्ये अनेक तंबू होते. गुप्त पोलिसांचे जाळे तिथे पसरलेले असणारच याची त्याना कल्पना होती. आत जाऊन बाहेर येणे सोपे नाही हे आझादांनी गृहीतच धरले होते. आझादांना आपले सहकारी आणि इतर क्रांतिकारक याना भेटायचे होते. त्यांच्याशी विचारविनिमय करायचा होता. कॉंग्रेसच्या या अधिवेशनाला काही आगळेच महत्त्व होते. सरदार भगतसिह, राजगुरू आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा झाली होती. भारतातील अनेक देशप्रेमी तरुण, जुने क्रान्तिकारक सगळे त्या ठिकाणी येणार हे निश्चित. श्री. बुलसू सांबमूर्ती, लाला दुनीचंद अंबालवी, यांच्या मदतीने सर्वांशी संपर्क साधता आला. कॉंग्रेसनगरच्या एका तंबूत सर्व क्रान्तिकारक जमले. आझादांचे जुने साथीदार बाबा सोहनसिंह भकना, बाबा प्यारासिंह, बाबा गुरुमुखसिंह, सर्व आले होते. चर्चा जोरात चालू होती. एवढ्यात एक परिचित जुने साथी ए. कामेश्वरराव तंबूत आले. त्यांनी एकदा चौफेर नजर टाकली, चटकन आझादांच्या जवळ आले आणि त्यांच्या कानात काहीतरी कुजबुजले. ते ऐकताच आझादांच्या चेहऱ्याचा रंग बदलला. त्यांनी सहज वर पाहिले तर ज्याच्याविषयी त्यांना सावध करण्यात आले होते तो त्यांच्याकडेच पाहात होता. आझादांची नजर आपल्यावर आहे हे समजताच तो झपाट्याने तंबूच्या बाहेर निघून गेला. आता चर्चा चालू राहणे शक्य नव्हते. सर्वांना पसार होण्याचा इशारा मिळाला. आझाद आणि त्यांचे दोन साथीदार तेवढे तंबूत राहिले. त्यांच्याबरोबर आंध्र प्रदेशचे नेता बुलसू सांबमूर्तीही तिथेच बसून राहिले. वकिली सोडून कॉंग्रेसमध्ये सामील झाल्यापासून ते लुंगी नेसत आणि डोक्यावर चादरीसारखे एक फडके घेत. त्यांच्याबरोबर काही चर्चा करायची होती. पोलिसांची टांगती तलवार डोक्यावर होती तरी त्यांनी आपले बोलणे थांबविले नाही. तेवढ्यात आणखी तीन पोलीस साध्या वेषात आले. त्यांना आझादांनी ओळखले. त्या तिघांनी या तिघांकडे पाहिले आणि हा मवाल्यासारखा वेश असलेला माणूसच हवा

असलेला क्रान्तिकारक आहे असे समजून ते सांबमूर्तींच्या भोवती उभे राहून त्यांना दम देऊ लागले. कोण? कोठून आला? काय काम आहे? अशी प्रश्नांची सरबत्ती झाली. पण काँग्रेस वर्किंग कमिटीचा एक सभासद, त्यात आणखी वकील, तो काय त्यांना दाद देणार? त्यांनी उलट तेच प्रश्न त्या तिघांना विचारले. हे द्वंद्व युद्ध होईपर्यंत आझाद आणि त्यांचा मित्र दोघे तिथं कशाला थांबतात! ते निघून गेले. सांबमूर्ती पण बाहेर आले. ते पोलिसही त्यांच्या मागोमाग बाहेर आले. असे कितीतरी साध्या वेषातील पोलीस तिथे वावरत असले पाहिजेत. अशा परिस्थितीत आपण इथून कसे निसटून जायचे असा विचार करीत असतानाच त्यांना सरहद्द गांधी अबदुल गफरखाँची आठवण झाली आणि त्यांच्याकडे गेले. आपल्याला काबूलवरून रशियाला जायचे आहे; तेव्हा काबूलपर्यंत पोचविण्यास आपल्याला मदत मिळाली अशी त्यांनी गफारखान यांना विनंती केली. क्रान्तिकारक काही सत्य अहिंसेचे पुजारी नव्हते; पण खरे देशभक्त असल्याने सर्व महान नेते त्यांच्यावर जिवापाड प्रेम करीत. म्हणून गफारखान यांनीही आझादांची विनंती चटदिशी मान्य केली. भारतातील उच्च दर्जाचे सर्व गुप्त पोलीस कराचीत घिरटचा घालत होते. अशा परिस्थितीत कराचीतून बाहेर पडणे काही सोपी गोष्ट नव्हती.

देशाकरिता जीव टाकणारा तरुण पाहून गफारखाँनी त्यांना काबूलला पोचविण्याचे काम अंगावर घेतले. खानसाहेबांच्या लाल डगलेवाल्या पठाणांत त्यांनी आझादांना सामावून घेतले. चंद्रशेखर आझादांनी दिलेले पिस्तूल त्यांनी कामेश्वरराव यांना दिले आणि व्याघ्रांवर सांबमूर्तींना देऊन टाकले.

गफारखान यांनी आझादांना डॉ. खानसाहेबांच्या मुलाची गाठ घालून दिली. तो कॉलेजमध्ये शिकत होता. त्याने मोठ्या शिताफीने आझादांना गुप्त पोलिसांच्या जाळ्यातून बाहेर काढले आणि मग ते पेशावरला गेले. आझादांना एका घोडागाडीत बसवून त्याने आपल्या घरी पोचविले.

डॉ. खानसाहेब यांच्या घरी पाहुण्यांची गर्दी होती. त्या सर्वांची भाषा पुश्तू. ती ऐकून ऐकून आझादांनी त्या भाषेतील व्यवहाराला आवश्यक असे काही शब्द शिकून घेतले. नेहमीचे बोलणे समजेल इतपत तयारी झाली. कोणी जर अधिक घसट वाढवू लागला तर ते बहिरेपणाचे ढोंग करीत;

आणि काही झाले की उगीचच हसत. त्यामुळे लोकांना वाटे की हा बहिरा आहे.

सीमा प्रांतातही इंग्रजांचे गुप्त पोलीस मोठ्या प्रमाणावर होते; पण क्रांतिकारकाविषयीची त्यांची कल्पना आझादांना मुळीच लागू पडत नव्हती. क्रांतिकारी म्हणजे तापट, बडबड्या, शौकीन असा माणूस ही त्यांची कल्पना असल्यामुळे आझादांचा त्यांना संशय आला नाही. पाच दिवस ते लाल डगलेवाल्यांच्या छावणीत राहिले. त्यांच्याबरोबर रेल्वेने लाहोरवरून पुढे गेले. दहा दिवस ते पेशावरला राहिले; पण कोणीही असे विचारले नाही की तू कोण आहेस. त्यांचे बोलणे–चालणे असे होते की त्या लोकांमध्ये ते सहज मिसळून गेले. अधिवेशन संपल्यानंतर खानसाहेब आले. आझादांना उतमंजई गावाकडे पाठविण्यात आले. सीमाप्रांतातील खेडेगावात राहण्याचा त्यांच्यावर यापूर्वी कधी प्रसंग आला नव्हता. सुमारे एक महिना सतत पठाण लोकांत राहिल्यामुळे तेही आता एक पठाणच झाले होते.

## २५. काबूलच्या वाटेवर

याकिस्तानचा प्रदेश आणि तेथील लोकांची माहिती असलेला एक मुल्ला खानसाहेब घेऊन आले. याकिस्तानातील हाजी तुरंगजई आणि त्याची मुले सर्व इंग्रजांविरुद्ध बंड करणारे बंडखोर समजले जात. त्यांच्या घरी आझादांना पोचविण्याचे ठरले. पुढे काबूलला सोबत करण्याचे कामही त्याच्यावरच सोपविण्यात आले. तसं पाहिलं तर खान अब्दुल गफ्फारखाँ सत्य, अहिंसेचे पुजारी; पण त्यांनीच हिंसेचा आधार घेणाऱ्या या क्रांतिकारकाला अनमोल मदत केली. माणुसकी म्हणजे काय, त्या मार्गाने जायचे म्हणजे काय करायचे, मानव समाजाचे अंतिम हित कशात आहे, या सर्व प्रश्नांची उत्तरे आझादांना सरहद्द गांधींच्या वागणुकीतून मिळाली. त्यांची मदत मिळाली नसती तर

भारताच्या बाहेर त्यांना जाता आले असते की नाही शंकाच आहे. खानसाहेबांनी दिलेल्या मुल्लाबरोबर आझादांचा प्रवास सुरू झाला.

पाकिस्तानला जाणारे लोक जिथे एकत्र झाले होते तिथे आझादांची स्वारी येऊन पोचली. सर्वांच्याबरोबर ते तिथे राहिले; पण त्यांनी कोणालाही आपल्याशी घसट वाढवू दिली नाही. कोणी काही विचारले तरी सहसा ते उत्तर देत नसत. सगळेच अनिश्चित. दुसरे दिवशी आपण स्वतंत्र भूमीवर पाय ठेवतो की पाकिस्तानी लोकांच्या गोळ्यांना बळी पडतो, काहीच निश्चित नव्हते. थोड्या वेळाने पाऊस सुरू झाला म्हणून सर्वांबरोबर ते एका मशिदीत गेले. ज्याला जिथे जागा मिळाली तिथे तो झोपला. आझादही झोपले. तेवढ्यात एका सहप्रवाशाने लाथेने ढोसळले. म्हणाला, "समजत नाही का ? मक्केकडे पाय करून झोपतोस ?" 'तोबा, तोबा,' म्हणत ते उठले आणि दिशा बदलून पुन्हा झोपले. नमाजाची वेळ झाली. तेव्हा सर्वांबरोबर त्यांनीही गुडघे टेकले. खायला काही नव्हतेच. पाणी पिऊन पुढचा प्रवास सुरू झाला. रस्त्यावर गोटे असल्यामुळे बूट घालून चालणे जड जाऊ लागले. शेवटी त्यांनी ते पायांतून काढून हातात घेतले. वाटेत लुटारू लोकांचे हल्लेही होत. केव्हा एखादी गोळी येऊन छातीत घुसेल याचा काही नेम नव्हता. पण आता एवढी खात्री वाटू लागली की अन्नपाण्याच्या अभावी किंवा गोळी लागून मृत्यू येईल, पण हातकड्या आणि बेड्या यांनी जखडलेल्या अवस्थेत तुरुंगात जावे लागणार नाही.

सकाळ झाली. प्रवास चालू होता. पहाडाच्या शिखरावरून खाली उतरत असताना एक सरकारी नोकर आला. तो हिंदी पठाण होता. आझादांविषयी त्याला शंका आली आणि त्याने लागलीच चौकशी सुरू केली. कोणत्याही प्रश्नाचे उत्तर त्याला मिळाले नाही हा भाग वेगळा. प्रथम हिंदुस्थानी भाषेत; नंतर पुश्तो आणि तरीही जेव्हा आझाद काही बोलेनात तेव्हा चिडून तो शिव्या देऊ लागला; पकडून नेईन म्हणून धमकी देऊ लागला. आणि शेवटी त्यांना धरण्यासाठी जेव्हा त्याने हात पुढे केला तेव्हा मात्र आझादांचा चेहरा बदलला. तो बदल त्याला इतका जाणवला की त्याने तिथून पळच काढला. कैदी पळायच्या ऐवजी शिपाईच पळून गेला. सकाळी पाच वाजता निघालेले हे प्रवासी रात्री नऊ वाजता हाजी दुरंगजई इथे पोचले. मध्ये

फक्त अर्ध्या तासाची त्यांनी विश्रांती घेतली. ४०–४५ मैलांचे अंतर त्यांनी कापले होते. त्या ठिकाणी मात्र त्यांना सर्व प्रकारच्या सुखसोयी मिळाल्या. मुल्लासाहेबांनी आझादांना हाजीसाहेबांच्या हवाली करून निरोप घेतला. हाजी तुरंगजईपासून काबूलपर्यंत रस्तासुद्धा पूर्वीसारखाच होता; पण आता मिळालेले सर्व सहप्रवासी माहीतगार असल्यामुळे शेवटी लॉरीच्या अड्ड्यावर पोचले; पण तिथे दुसरेच एक संकट आ वासून उभे राहिले. एका पोलिसाची नजर त्यांच्यावर गेली आणि त्याने प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. आझादांनी पूर्वीप्रमाणेच एकाही प्रश्नाचे उत्तर दिले नाही. ते म्हणाले, "मला गव्हर्नरकडे घेऊन चला; तिथे मी बोलेन."

गव्हर्नर नुकताच बॅरिस्टरीची परीक्षा देऊन आला होता. त्याला आपली सर्व हकीकत सांगून आझाद म्हणाले, "अफगाणिस्तानात येण्याचा माझा हेतूच मुळी असा होता की ही स्वतंत्र भूमी आहे; एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून मला इथे राहाता येईल." त्याने सर्व ऐकून घेतले आणि तो एवढेच म्हणाला, "मग तुझं म्हणणं काय आहे ?"

"काबूलला जाण्याची परवानगी मिळावी."

एवढे उत्तर ऐकताच त्याने पोलीस ऑफिसरला बोलाविले आणि तशी आज्ञा दिली. आता काबूलला जायचे म्हणजे लॉरीतून जावे लागणार. त्याला पैसे द्यावे लागणार. त्यांच्याजवळ पैसे होते, पण ते बुटाच्या तळात आणि कपड्यात शिवून लपविले होते. ते सर्वांसमोर कसे काढणार ? शेवटी न कमावलेली कातडी घेऊन जाणारा एक लॉरीवाला कबूल झाला. पण त्या कातड्याजवळ बसणे म्हणजे नरकात बसण्यासारखे होते. तरी पण मुक्कामाला पोचल्यावर पैसे घेण्याचे त्याने कबूल केल्यामुळे ती दुर्गंधी सहन करण्याचे आझादांनी ठरविले. वाटेत जिथे जिथे मुक्काम पडला तिथे तिथे त्या लॉरी-वाल्याशी गप्पा मारून त्याचे मन जाणून घेतले. देशभक्तांवर त्याचे प्रेम दिसले. आझादांनी त्याला विश्वासात घेतले. दुसऱ्या दिवशी ते काबूलच्या सीमेवर पोचले; पण आत कसे जाणार ? जवळ कागदपत्र काही नाही. त्या लॉरीवाल्याने तो प्रश्न सोडविला. "हा आपला भाऊ आहे; काबूल पाहायला आला आहे." असे सांगून त्याने आत प्रवेश मिळवून दिला. एवढेच नव्हे तर आझादांच्या साथीदारांचा जो अड्डा होता तिथे त्यांना नेऊन सोडले.

गदरपार्टीच्या त्या अड्डयावर भाई रतनसिह उपस्थित होते. त्यांना सर्व हकीकत सांगताच आझादांची तिथे उतरण्याची सोय झाली.

सन १९२२ पासून बरेचसे क्रांतिकारक काबूलमध्ये राहून क्रांतीचे कार्य करीत होते. ते निरनिराळे व्यवसाय करीत होते. त्यांच्या गाठी-भेटी घेऊन बरीच चर्चा झाली. हा एक देशप्रेमाने वेडा झालेला क्रांतिकारी तरुण क्रांति-कारक असून राजकारणविषयक ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी मॉस्कोला जाऊ पाहातो आहे असे त्यांना समजले तेव्हा ते मोठ्या काळजीत पडले. अफगाणिस्तानच्या भूमीवर काबूलमध्ये लपून राहाणे कठीण आहे असे त्यांचे मत होते. त्यांच्याकरिता सुरक्षित ठिकाण म्हणजे कोणातरी मुसलमानाचे घर, अशा एका मुसलमानाच्या घरी आझादांची राहण्याची व्यवस्था करण्यात आली. त्या घरी राहाणे म्हणजे एक दिव्यच होते. भयंकर गलिच्छपणा. तरी पण त्या घरमालकाला आझादांनी विश्वासात घेतले आणि आपली सर्व हकीकत सांगितली. तेव्हा दोघांनी मिळून असा बेत केला की गझनी–कंदाहार मार्गे हेरातपर्यंत जायचे. तिथे गेल्यानंतर रशियात कसा प्रवेश मिळवायचा ते पाहावे.

●

## २६. दरवेशांच्या वस्तीत

ठरल्याप्रमाणे प्रवास सुरू झाला. कंदाहारला आठ दिवस मुक्काम करावा लागला. पुढे जाण्यासाठी लॉरी मिळाली. तेव्हा प्रवास पुन्हा सुरू झाला. लॉरीत बहुतेक सर्व 'हज' यात्रेचे उतारू होते. वाटेत काही विशेष संकट न येता ते हेरातला पोचले. दोन दिवसांच्या प्रवासाला सात दिवस लागले. कारण रात्रीचा प्रवास धोक्याचा होता. लुटारूंची भीती होती. तिथे बंदुका सर्वांजवळ असत. आपण जसा लाठी-काठीचा उपयोग करतो तसा ते बंदुकांचा करीत. हेरातला महंमदअल्लीचा–आझादांचा साथीदार–एक जुना मित्र होता. त्याच्या घरी मुक्काम ठोकला. हेरातचा गव्हर्नर नादिरशहाचा विश्वासपात्र

होता. भारतीय लोकाविषयी त्याचे मत चांगले नव्हते कारण भूतपूर्व बादशाहा अमानुल्लाची त्यांच्यावर कृपादृष्टी होती. रशियात प्रवेश मिळवून देण्यात मदत मिळावी म्हणून महंमदअल्ली पुष्कळ लोकाना भेटला. त्याचा परिणाम असा झाला की ही बातमी सी. आय. डी. पर्यंत गेली. त्यांनी दोघांना पकडून पोलीस चौकीत ठेवले. महंमदअल्लीचे वडील अफगाण सैन्यात मोठ्या हुद्द्यावर होते. त्याच्या मित्राना जेव्हा ही बातमी लागली तेव्हा ते कोतवा-लाला भेटले; जामीन दिला आणि सुटकेचा हुकूम घेऊन आले. कोतवालीत ज्याला वाचता येईल असा कोणीच नव्हता. सुटकेचा हुकूम आहे एवढेच ते म्हणाले. आझादांनी त्या संधीचा फायदा घेतला. झटदिशी तो कागद घेऊन वाचून दाखविला. दोन्ही कैद्यांना सोडून द्यावे असे त्यात लिहिले असल्याचे सांगितले. हुकूम आणणारा फौजी ऑफीसर असल्यामुळे हुकूम ताबडतोब अमलात आला आणि सरदार आझादांची सुटका झाली. खरं म्हणजे त्यात महंमदअल्लीला सोडावे एवढेच लिहिले होते.

आझादांनी थोडी गम्मत करायचे ठरविले. त्यांनी महंमदअल्लीला शंभर रुपये दिले आणि सांगितले. 'बाजारात जाऊन चांगली मिठाई घेऊन या. राहण्यासाठी एखादे घरही पाहून या.' असे सांगून तो हुकूम आणणारा सैनिक आणि महंमदअल्ली या दोघांनाही त्यांनी दूर पाठवून दिले. त्यांची खात्री होती की ते दोघे आता निश्चित मनाने कुठे तरी जाऊन मजा करणार. त्यांची पाठ वळताच आझाद बाजारात गेले. काही वस्तू पाहण्याचे ढोंग केले आणि दोन तंदूर बांधून घेतले आणि झटदिशी बाजार पार करून जंगलात शिरले. तीन तासांची मुदत होती. त्यांची खात्री होती, कमीत कमी तीन तास तरी हा महंमदअल्ली आता परत येणार नाही. धावत-पळत ते हेरातजवळच्या पर्वतीय भागात शिरले. रात्रभर ते चालतच राहिले. दुपारी बारा वाजता त्यांना एक दरवेशी भेटला. त्याच्या झोळीत काही ना काही खाद्यपदार्थ असणार असा अंदाज करून ते त्याला म्हणाले, "दरवेशीबाबा, मी एक प्रवासी आहे. फार भूक लागली आहे. काही खायला मिळेल का?"

त्या दरवेशाने हसत हसत आपली झोळीच पुढे केली. त्यात रोटीचे तुकडे होते. त्यांतील ओंजळभर तुकडे आझादांनी घेतले आणि आपल्या चादरीत

बांधले. जाता जाता वाटेत एक झरा लागला. तिथे बसून ते तुकडे खाण्याचा प्रयत्न करू लागले; पण ते अगदी कडकडीत झाले होते; खाता येईनात. म्हणून त्यांनी मग ते एका फडक्यात बांधले आणि पुरचुंडी पाण्यात सोडून ठेवली. थोडी झोप काढल्यावर त्यांनी पाहिले तर त्या तुकड्यांचा भुगा होऊन चांगला लगदा तयार झाला होता; तो खाऊन प्रवास पुढे चालू झाला. दुसऱ्या एका टेकडीच्या पायथ्याशी काही दरवेशी राहात असलेले दिसले. आझादांना पाहून त्यांची मुलं पैसे मागू लागली. तेव्हा त्यांनी त्या मुलांना थोडे थोडे पैसे दिले. तेवढ्यात स्त्रिया पण आपल्या राहुट्यांतून बाहेर आल्या. त्यांनी हसतमुखाने आझादांचे स्वागत केले. लागलीच रोट्या आणि लस्सीचे भांडे त्यांच्यापुढे ठेवण्यात आले. यथेच्छ खाणेपिणे झाल्यावर एका राहुटीत त्यांना झोपण्यास जागा मिळाली. संध्याकाळ झाली आणि नवेच एक संकट समोर उभे ठाकले. एक घोडेस्वार तिथे येऊन टपकला. आल्याबरोबर तो आझादांची चौकशी करू लागला पण सर्व स्त्रियांनी त्याला शांत केला. तेव्हा तो आझादांना म्हणाला, "चल, माझ्या राहुटीत झोपा. थोडी विश्रांती घेऊन नंतर तुझ्या मुक्कामावर मी तुला आपल्या घोड्यावरून पोचवीन." आणि मग त्यांची घोडदौड सुरू झाली. दोन तासात त्यांनी १५ मैलांचे अंतर तोडले. जवळच छोटीशी वाडी होती. एका इमारतीकडे बोट दाखवून तो घोडेस्वार म्हणाला, "ती बघ, ती मशीद आहे. रात्रभर तिथे झोप. सकाळ झाली की चालू लाग. दुसऱ्या दिवशी संध्याकाळपर्यंत तू आपल्या इच्छित स्थळी पोचशील." आझादांनी त्याला धन्यवाद दिले आणि रात्री दहा वाजता पुन्हा प्रवास चालू केला. सुमारे दोन वाजता दरवेशांच्या कुत्र्यांनी त्यांना घेरले. आझादांनी आपल्याजवळचे भाकरीचे तुकडे त्यांच्यापुढे टाकले; पण थोड्याच वेळात ते सर्व खाऊन पुन्हा ती कुत्री त्यांना आडवी आली. मग आझादांनी आपली झोळीच त्यांच्या पुढे ठेवली आणि दोन्ही हात पसरले, तेव्हा त्यांना समजले की यांच्याजवळ आता काही नाही. आणि ती मग निघून गेली. पुढे सुमारे चार वाजता समोरून एक उंट येताना त्यांना दिसला; त्याच्या पाठीवर माल होता; पण माणूस नव्हता. त्याचा मालक त्याच्या मागून धावत येत होता; ता उंट दोरी तोडून आला होता. आझादांनी पुढे होऊन झटदिशी त्याची दोरी टपकडली आणि तो उं

त्याच्या मालकाच्या हवाली केला. त्याच्याशी बोलता बोलता आझादांनी त्याला सांगितले की आपल्याला 'मर्ब-कुश्क' इथे जायचे आहे. आणि आपण आता कुठे आहोत असे विचारले. रशियाची सरहद्द किती दूर आहे ? असाही प्रश्न केला. तेव्हा सविस्तर माहिती देऊन तो इसम म्हणाला, "आपण आत्ता उभे आहोत हा रशिया आणि अफगाणिस्तान यांच्या सरहद्दीवरील स्मगलर्सचा एक मोठा अड्डा आहे. जवळच उजव्या बाजूला एक नदी आहे. ती या दोन्ही देशांच्या सरहद्दीवरच आहे. इथे रशियन आणि अफगाण पोलीस डोळ्यांत तेल घालून पहारा करीत असतात. विनापरवाना कोणी फिरताना दिसले की मागेपुढे न पाहाता गोळी घालतात. सूर्योदयाची वेळ झाली. आझादांना वाटले की आता या उंटवाल्यापासून दूर झाले पाहिजे. ते म्हणाले, "बाबा, उंटाला आता खाली बसव. माझी आता नमाजाची वेळ झाली आहे. मी आता नदीकडे जातो." तो उंटवाला म्हणाला, "कृपा करून तेवढे करू नका; नाहीतर विनाकारण मराल." पण आझादांनी त्याला असे भासविले की मरण आले तरी हरकत नाही पण आपली नमाजाची वेळ आपण चुकवीत नाही. भोळा बिचारा उंटवाला ! त्याला ते खरेच वाटले. उंटाला त्याने खाली बसविले. आझाद उतरले आणि त्यांनी नदीची वाट धरली. त्यांची पायपीट सुरू होऊन २४ तास झाले होते. शेवटी ते नदीतीरावर आले आणि पोहून त्यांनी ती नदी पार केली.

सूर्योदय झाला आणि आजूबाजूला वस्ती असल्याचे त्यांना दिसले. मोठ्या कष्टाने चालत ते कस्टम हौसमध्ये पोचले. तिथून ते वरिष्ठ अधिकाऱ्याच्या घरी गेले. तिथे त्यांचे चांगले स्वागत झाले. नंतर आझादांनी आपले त्यांच्याकडे येण्याचे कारण सांगितले "मी एक हिंदी क्रांतिकारक आहे; इंग्रजांचा दुष्मन. जेलमधून पळून आलेला एक कैदी तुमच्यासारख्या सज्जन माणसाची मदत मिळेल म्हणून तुमच्याकडे आलो आहे." हे ऐकल्याबरोबर त्यांना बसायला खुर्ची देण्यात आली; काही खायला देण्यात आले. खाता खाता आझाद म्हणाले, "या खुर्चीवरून उठण्याचीही शक्ती आता माझ्यात राहिली नाही. पायाचे तळवे सोलून निघाले आहेत. एक बादलीभर गरम पाणी मिळाले तर काही वेळ माझे पाय त्या पाण्यात ठेवीन म्हणजे बूट काढता येतील." पाणी आले. दोन तास पाय बुटासकट त्यात ठेवले. नंतर

जेव्हा बूट काढण्यात आले तेव्हा त्या बुटाबरोबर तळव्याचा काही भागही सोलून निघाला. त्या अधिकाऱ्याला खात्री पटली. त्याने डॉक्टरला बोलावले; पायाला पट्टी बांधण्यात आली आणि कॅन्व्हसचा बूट पायांत घालण्यास मिळाला. आराम करायला एक खोली पण मिळाली; पडल्याबरोबर झोप लागली. रात्री बाराचा सुमार आसावा. एका पोलिस अधिकाऱ्याने त्यांना उठवले. उठून पाहातात तो दोन्ही बाजूंला दोन पिस्तुलधारी पोलीस. आझादांना उठवत नव्हते तरी त्यांच्या काखेत हात घालून जबरदस्तीने फरफटत नेण्यात आले एका खोलीसमोर. पहारेकऱ्याने त्या खोलीचा दरवाजा उघडला. तेव्हा आत उभे राहायलासुद्धा जागा नव्हती. त्याच गर्दीत त्यांना लोटून दरवाजा बंद करून घेण्यात आला. आत आणखी कितीतरी कैदी दाटीवाटीने बसले होते.

सकाळी सर्वांना खोलीबाहेर काढण्यात आले. दरवाजासमोर एक खुर्ची ठेवून आझादांना त्या खुर्चीवर बसण्यास सांगितले गेले. बाकीच्या कैद्यांना दुसऱ्या कुठल्यातरी खोलीत कोंबण्यात आले. दोन शिपायांनी पाणी आणले, खोलीतील फरशी घासून-पुसून स्वच्छ करण्यात आली आणि फिनाइल छिडकण्यात आले. भिंती साफ करून घेण्यात आल्या. आत एक कॉट आणि एक टेबल ठेण्यात आले. सैनिकी कँटीनमधून गरम गरम न्याहारी आणून आझादांच्या पुढे ठेवण्यात आली. खोलीचे दार उघडेच ठेवण्यात आले. आजूबाजूला सैनिकांची गर्दी होती. पळून जाण्यासारखी काही या कैद्याची परिस्थिती नाही हे त्यांना समजून चुकले होते. असे दोन दिवस गेल्यानंतर ताशकंदहून काही वरिष्ठ पोलीस अधिकारी विमानाने तिथे आले. सर्वच्या सर्व त्या खोलीसमोर येऊन उभ राहिले. त्यांपैकी दोघांना इंग्रजी येत होते. त्यानी प्रश्न विचारायला सुरुवात करताच आझादांनी उलट विचारले, "मला प्रश्न विचारणारे कोण आहेत मला समजेल काय ?"

एक पोलीस अधिकारी दुसऱ्याकडे बोट दाखवून म्हणाला, "या प्रदेशातील गुप्तचर विभागाचे हे प्रमुख आहेत. तुमची सर्व माहिती कळल्यानंतर तुम्हाला जिवंत ठेवायचे की नाही हे तेच ठरवणार." त्यांनी मग आझादांना आपली सर्व हकीकत लिहून द्यायला सांगितले; पण त्याबरोबरच हेही सांगितले की खोटेनाटे लिहिलेत तर गोळी घालण्यात येईल."

थोडी माहिती लिहून झाली; त्या अधिकाऱ्याने ती वाचून पाहिली आणि म्हणाला, " माणूस मोठा भयंकर दिसतो आहे ! याला इथं ठेवून उपयोगी नाही. ताशकन्दलाच पाठविले पाहिजे."

दुसरे दिवशी तीन पोलीस बरोबर देऊन एका छकड्यात बसविले. अधिकारी आझादांना म्हणाला, " रशियात कोणाही कैद्याला मग तो कितीही भयंकर असो बेड्या घालीत नाहीत. तुलाही आम्ही तसेच पाठवीत आहो; पण याद राख, पळून जाण्याचा प्रयत्न केलास तर या लोकांच्या गोळ्यांनी तुझ्या शरीराची चाळण झालीच म्हणून समज. तिथून ताशकन्दला पोचायला दोन दिवसांपेक्षा अधिक काळ लागला असावा. तिथे राजकीय कैदी ज्या तुरुंगात ठेवले होते त्याच तुरुंगात आझादांना पण ठेवण्यात आले. त्या खोलीतही सुमारे पंचवीस कैदी होते; सर्व सुशिक्षित दिसले. काही इंग्रजी जाणणारेही होते. चार दिवसांनंतर त्यांना सांगण्यात आले की त्यांनी आपली सर्व हकीत लिहून काढावी.

खोलीतील बंदीजनांना सर्व प्रकारच्या सोयी होत्या. त्यांचे नातेवाईक त्यांना येऊन भेटत, खाण्यापिण्याच्या वस्तू आणून देत. भेटीगाठीच्या वेळी आणि खाण्या-पिण्याच्या डब्यांतून काही निरोप येत; परत दिले जात. बातम्या दिल्या जात; आणि मिळतही. काही दिवसांनंतर सरदारांना खोलीबाहेर फिरण्याची परवानगी मिळाली. अशा तऱ्हेने एक महिना आरामात गेला आणि एक दिवस दारात एक मोटार येऊन उभी राहिली. त्यातून एक पुरुष आणि एक स्त्री खाली उतरले. ती स्त्री म्हणाली, " की तुम्ही एक प्रतिष्ठित क्रांतिकारी आहात आणि तुम्ही जे लिहून दिले आहे ते सर्व खरे आहे अशी सरकारची खात्री झाली आहे. आजपासून रशियन सरकारचे तुम्ही पाहुणे आहात. आता तुम्हाला कसलीही भीती बाळगण्याचे कारण नाही."

नंतर त्या मोटारीतून त्याना एका अलीशान हॉटेलमध्ये नेण्यात आले. जी खोली त्यांना देण्यात आली होती ती चागली सर्व सोयींनी युक्त आणि सुशोभित अशी होती. संध्याकाळी मोटारीतून त्यांना ताशकन्द शहर दाखविण्यात आले. नाच पाहण्यासाठी नाच–घरात जाताना आझादांचे लक्ष आपल्या कपड्याकडे गेले. बुटामध्ये लपविलेले अमेरिकन डॉलर्स काढून ते त्या अधिकाऱ्यांना म्हणाले, " मला योग्य असे कपडे शिवून मिळाले तर बरे

होईल." पण तयार कपडे मिळत नव्हते आणि शिवून घ्यायलाही फार दिवस लागतील. असे सांगण्यात आले.

●

## २७. रशियास प्रयाण

दुसऱ्या दिवशी मॉस्कोला जाण्यासाठी ते निघाले. डबा कसला तो; एक सलूनच होते. गाडीला गती विशेष नव्हती. मॉस्कोला जायला चार दिवस लागले. बंदिवासात असताना रशियन भाषेचे कामापुरते ज्ञान करून घेतले होते. एक हिन्दी क्रान्तिकारक म्हणून त्यांची ओळख करून देण्यात आल्यामुळे आणि क्रांतीचे शिक्षण घेण्याचा त्यांचा हेतू आहे एवढे समजल्यामुळे स्त्री पुरुष, लहानथोर सर्वच त्यांच्या भोवती गोळा होऊ लागले. गुलामगिरीत असलेल्या सर्व लोकांकडे सहानुभूतीने पाहिले पाहिजे हा विचार रशियन नेत्यांनी नव्या पिढीवर चांगलाच बिंबविला असल्यामुळे त्यांच्या भोवती जमलेले सर्व लोक त्यांच्याशी आपलेपणाने वागत होते. हे पाहून रशियाविषयी आझादांच्या मनात जो तिरस्कार भरलेला होता तो पार कुठल्या कुठे नाहीसा झाला.

मॉस्को स्टेशनवर कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या दोन अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांच्या कचेरीत नेले. आझादांच्याविषयी त्यांना सर्व माहिती मिळालेलीच होती. तिथून ते ईस्टर्न यूनिव्हर्सिटीच्या इमारतीत गेले. तिथे त्यांना एक खोली देण्यात आली. या ठिकाणी जगातील निरनिराळ्या देशांतील क्रान्तिकारक राजकारणविषयक शिक्षण घेत असतात. बाकी सर्व सामान त्यांना मिळाले; पण शर्ट–लेहंगा ? त्याच खोलीत इंडोचायनाचा एक तरुण राहात होता. त्याने आपल्याजवळचे कपडे आझादांना आपण-हून दिले.

राजकारणविषयक ज्ञान आवश्यक तेवढे आपल्याला आहे असे त्यांना वाटत होते; इथला अभ्यासक्रम पाहिल्यावर त्यांचा भ्रमनिरास झाला;

सर्व गोष्टींकडे पाहण्याची त्यांची दृष्टीच बदलली. कम्युनिस्ट इंटर-नॅशनलच्या अधिकाऱ्यांचा त्यांच्यावर चांगलाच प्रभाव पडला. एका बाबतीत मात्र त्यांचे विचार कायम राहिले. भारतात जाऊन आपल्या मायभूमीला स्वतंत्र करणे आपले कर्तव्य आहे हा विचार मात्र सुटला नाही. ज्या क्रान्तिकारकांमध्ये ते राहात त्या सर्वांनी स्वतःला एक एक टोपण नाव घेतले होते. आझाद "पॉल रिचर्ड मार्को" बनले होते. ते अनुशासनप्रिय होते. साम्यवादी विचारप्रणालीत अनुशासनाला फार महत्त्व आहे. म्हणून रशियन साम्यवादी नेता त्यांच्यावर फार खुष होता. त्यांनी पाहिले की इतर विद्यार्थ्यांपेक्षा हा विद्यार्थी अनुभवाने शहाणा झालेला आणि अधिक परिपक्वबुद्धीचा आहे. म्हणून त्यांना ईस्टर्न युनिव्हर्सिटीतून काढून साम्यवादी पक्षाचा सभासद बनविले आणि ज्यांनी वर्षानुवर्षे पक्षाचे काम प्रामाणिकपणाने केले होते अशा क्रान्तिकारकांमध्ये ठेवले. त्यांच्यामध्ये राहिल्यानंतर आझादांना समजले की त्या सर्व तरुणांना मजूरवर्गामध्ये काम करण्याचा चांगलाच अनूभव आहे. तिथे जर्मनी, स्पेन, इण्डोचायना, चीन अशा बऱ्याच देशांतील लोक एकत्र आले होते. त्या सर्वांमध्ये कार्यक्षमता, देशप्रेम आणि आपल्या देशबांधवांना गुलामगिरीतून मुक्त करण्याची अदम्य इच्छा होती. आपल्या देशावर प्रेम करायचे म्हणजे काय ते त्यांना रशियन लोकांपासून शिकायला मिळाले. सन १९३१ ते १९३४ ही तीन वर्षे त्यांनी रशियन लोकांचे जीवन बारकाईने पाहिले. तेव्हा भारतात नवी समाजरचना आणावयाची असल्यास आपल्याला काय केले पाहिजे याची त्यांना कल्पना आली. देशातील सामान्य लोक आणि अधिकारीही कशा तऱ्हेने कष्टाचे जीवन जगत होते ते पाहिल्यावर रशियातील प्रत्येक जण या जीवन-संग्रामातील आपला वाटा किती तत्परतेने उचलतो आहे याची त्यांना जाणीव झाली.

रशियन लोकांना मृत्यूनंतरचा स्वर्ग नको होता; आपल्या देशालाच ते स्वर्ग बनवू इच्छित होते आणि ती इच्छा पूर्ण करून घेण्यासाठी ते जिवावर उदार झाले होते. मोठ्यातला मोठा अधिकारी असो की नेता असो—सर्वजण काळे मिचकुट पाव गरम पाण्यात भिजवून खाताना दिसत होते. त्यात थोडी गोडी यावी म्हणून शेवटी जिभेवर थोडी साखर ठेवीत. कारखान्यातून सोळा सोळा तास काम केल्यानंतर मजूर दोन छटाक पीठ, सहा छटाक पेंड आणि

चिमूटभर मीठ असला आहार घेत. हे पाहून त्यांच्या मनात विचार येत, भारतात क्रान्ती झाल्यानंतर आपल्यालाही असेच जीवन कंठता येईल काय? भारतीय माणूस ही तपश्चर्या करायला तयार होईल काय ?

## २८. भारतात येण्याचे विचार

आता रशिया सोडून भारतात येण्याचे विचार त्यांच्या डोक्यात घोळू लागले. अंदमानमधील त्यांचे साथी बाबा गुरुमुखसिह नेमके याच वेळी त्यांना भेटले. भारतीय क्रान्तिकारकांना अफगाणिस्तान मार्गे परदेशात कसे पाठवायचे आणि त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर परत भारतात प्रवेश कसा मिळवून द्यायचा या खटपटीत ते होते. ते स्वत: अफगाणिस्तानातच राहाणारे होते आणि म्हणून हमरस्त्याने जाऊ-येऊ शकत; पण इतरांसाठी जंगलचा रस्ताच अधिक सुरक्षित होता. तेव्हा आझादांनी रशियाच्या सीमेवरच राहाणारा एक हिंदू गाठला; त्याला जंगलातील आणि पहाडातील सर्व रस्ते ठाऊक होते. आणखी दोन रशियन क्रान्तिकारक घेऊन ते आमुदारिया या नदीतीरावर येऊन पोचले. जून महिन्यातील दिवस होते. पाण्याचा वेग ताशी १५ ते २० मैल होता. पाण्यात पडले तर आपण पैलतीराला किती अंतरावर लागू याचा त्यांनी अंदाज बांधला. पात्राची रुंदी ४०० यार्ड होती. त्यांच्याबरोबर अफगाणिस्तानातील एक पट्टीचा पोहणारा पण होता. त्याच्याजवळ पखाल होती. ती पखाल घेऊन नदी ओलांडण्याचा त्याला चांगला सराव होता; पण इतर लोकांना ते एक प्राणसंकटच होते. त्याने आपली पखाल आपल्या घोड्याच्या शेपटीला बांधली आणि आझादांना त्या पखालीवर पालथे झोपविले; घोड्याच्या पाठीवर हात ठेवून तो पुढे आणि आझादांची पखाल मागे अशी त्यांची वरात निघाली. दोन तीन वेळा पखालीवरून घसरून पडण्याची पाळी आली होती; पण थोडक्यात निभावले. आणि शेवटी ते एकदाचे पलीकडे पोचले. बर्फाचीच नदी ती. त्या पाण्याच्या स्पर्शाने त्यांच्या

शरीराचे काय झाले असेल याची कल्पनाच केलेली बरी. हे काम पंधरा मिनिटात झाले; पण पंधरा तास झाल्यासारखे वाटले. तो माणूस बाबा गुरुमुखसिंहला आणण्यासाठी म्हणून परत गेला तो एक तास झाला तरी आला नाही. अंधार पडू लागला. आसपास कोणीही माणूस नाही. दोन तासांच्या प्रतीक्षेनंतर तो माणूस येत असलेला दिसला. ऐन मध्यावरच त्या पखालीची दोरी तुटली तेव्हा घोड्याला सोडून तो माणूस तसाच एकट्याच्या हिंमतीवर गुरुमुखसिंहांना घेऊन आला. थोड्या वेळाने घोडाही आला. कपडे पिळून टाकल्याबरोबर उष्ण वाऱ्यामुळे तेव्हाच सुकले आणि त्यांचा प्रवास पुन्हा सुरू झाला. थोड्या वेळाने दिवस निघाला. आपण कुठे चाललो आहो हे त्यांनाच समजत नव्हते. इतक्यात समोरून एक पोलीसपार्टी आली. त्यांनी ताबडतोब ओळखले की हे लोक पळून चालले आहेत. त्या पोलिसांनी या लोकांना पकडून तिथून पंधरा मैल दूर असलेल्या फैजाबादला नेले. तेथील अधिकाऱ्यांनी यांची जबानी घेतली. "आम्ही हिंदी व्यापारी आहोत; व्यापार करण्यासाठी रशियात गेलो; पण तिथल्या सरकारचा जुलूम आम्हाला सहन होईना म्हणून आम्ही अफगाण सरकारच्या आश्रयाला आलो आहोत. अफगाणिस्तानचे उदार सरकार आम्हांला इथे व्यापार करायची परवानगी देईल या आशेवरच आम्ही या भूमीवर पाय ठेवला आहे." हे निवेदन ऐकून त्या अधिकाऱ्याने तिथे राहून व्यापार करण्याची परवानगी दिली. सुमारे एक आठवडा ते तेथे राहिले; त्या प्रदेशातील मोठ्यात मोठे शहर खानाबाद. बरोबर तीन शिपाई देऊन त्यांना खानाबादला पाठविण्यात आले. प्रसंग असा विचित्र होता की आम्ही कैदी घोड्यावर आणि पोलीस पैदल. पोलिसांनी त्याना घोड्यावरून उतरायला लावले तेव्हा ते गावाबाहेर तीन मैल आले होते. आझादांना हे सहन झाले नाही. त्यांनी त्या पोलिसांना असा दम भरला की ते घाबरूनच गेले. मग पुन्हा आझाद आणि त्यांचे साथीदार घोड्यावर बसले आणि प्रवास सुरू झाला. पुढे मात्र या लोकांनी त्या पोलिसांना खाऊ-पिऊ घातल्याने ते त्यांचे दोस्त बनले; एका विश्वासपात्र शीख तरुणाला बाबा गुरुमुखसिंहांनी बरोबर घेतले आणि ते सर्व खानाबादच्या पोलीस चौकीवर आले. त्या तरुणांचा जामीन घेऊन त्यांना एक आठवड्यासाठी बाहेर सोडण्यात आले. पण पुन्हा पकडून त्यांना जलालबादला पोचविण्यात आले. तिथे जवळच

एक किल्ला होता. त्या किल्ल्यात यांना ठेवण्यात आले. बाबा गुरुमुखसिहांनी पैसे देऊन निसटून जाण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी पैसे घेतले; पण मुक्तता केली नाही. आता त्यांच्याजवळ एक पैही शिल्लक नव्हती. अफगाण सरकारचा कायदा मोठा मजेशीर होता. आपल्या जेवणाखाणाचा खर्च कैद्याने स्वतःचा करायचा. कैद्याला जिवंत ठेवणे हे काही सरकारचे काम नाही. कैद्यांनी पाहिजे तर भीक मागावी आणि आपले पोट भरावे, बाबा गुरुमुखसिहांना ओळखणारे तिथे बरेच लोक होते; म्हणून त्यांना न पाठविता आझाद स्वतःच बाहेर गेले, एका हिंदू गृहस्थाला सर्व हकीकत सांगितली तेव्हा त्याने त्यांना खाऊ-पिऊ घातले; आणि इतरांकरिता थोडे बांधूनही दिले. पण असे किती दिवस चालणार ? शेवटी त्या अधिकाऱ्याला त्यांनी खरीखरी हकीकत सांगितली तेव्हा त्यांना त्या तुरुंगातून काढून एका चांगल्या खोलीत ठेवण्यात आले व व्यवस्थित जेवण मिळू लागले. त्या अधिकाऱ्याने त्यांची सर्व हकीकत नादिरशहापर्यंत पोचविली.

## २९. ताशकंद प्रयाण

रात्रीचे दोन वाजले असतील. थोडा थोडा पाऊस पडत होता. एवढ्यात चार बंदूकधारींनी येऊन त्यांना घेरले. यांना वाटले आता आपली शंभर वर्षे भरली.

" उठा; बाहेर चला." हुकूम झाला.

कुठे, कशाला काही सांगण्यात आले नाही. थोडे दूर, पोलीस लाइनजवळ एक मोटार उभी होती. त्या मोटारीत घालून त्यांना काबूलच्या सेंट्रल जेलमध्ये आणून सोडण्यात आले. नादिरशहा इंग्रजांचा मित्र, त्यामुळे यांना कडेकोट बंदोबस्तात ठेवण्यात आले. त्यांना ज्या खोलीत ठेवण्यात आले होते त्या खोलीकडे जाण्याचा एकमेव मार्ग होता आणि तो होता जेलरच्या खोलीतून. बाहेरून अन्न मागविणे शक्य नव्हते; कारण खिसे रिकामे होते.

विदेशी कैद्यांना त्या बाबतीत एक सवलत म्हणजे प्रत्येकी एक पोळी जेलमधून मिळत असे. अर्थात त्याबरोबर भाजीच काय पण मीठसुद्धा देत नसत. अफगाणिस्तानात वाहाते पाणी पवित्र मानले जाई; मग ते गटारातील घाण पाणी का असेना. गावातील सगळी घाण वाहून नेणारा एक नाला जेलजवळून जात होता; त्यातील पवित्र (!) पाणी पिण्यासाठी देत.

एके दिवशी जेलर आजारी पडला. त्याची कंबर दुखत होती. आझादांनी मालिश करून त्याच्या वेदना कमी केल्या. तेव्हापासून तो त्यांच्याशी सरळ वागू लागला. एके दिवशी त्याने अशी सूचना दिली, "कोणाच्या हातचे खाऊ नका; कोणावरही विश्वास ठेवू नका." त्याला अशी बातमी लागली होती की वरिष्ठ अधिकारी काही तरी कट शिजवीत आहेत. त्याने या कैद्यांचा वस्तऱ्याने गळा कापावा असे त्याला सांगण्यात आले होते. कैद्यांच्या दोन्ही बाजूला दोन वस्तरे ठेवण्यात येणार होते. कैद्यांनी आत्महत्या केली असे बाहेर पसरविण्याची व्यवस्था केली होती.

कडाक्याच्या थंडीमुळे रोज दोनचार कैदी थंडीने काकडून मरत आणि प्रत्येक वेळी अशी बातमी पसरविली जाई की हिंदू कैदी मेले; पण दुसरे दिवशी पाहावे तर हे दोन्ही कैदी अगदी मजेत असलेले दिसत. याचा परिणाम असा झाला की या दोघांत काहीतरी दैवी गुण आहे असे इतर कैद्यांना वाटू लागले. जेलरचा एक मेहुणा अफगाण तरुण होता. तो दिवसेंदिवस खंगत चालला होता. कारण मोठे चमत्कारिक होते. जेलरने आपल्याला काहीतरी जादूटोणा केला आहे अशी त्याची समजूत झाली होती. आणि त्यामुळे त्याचा अशक्तपणा वाढतच चालला होता. तो या दोघांकडे आला आणि आपल्याकरिता त्यांनी काहीतरी करावे अशी त्याने आझादांना विनंती केली.

मोठ्या गंभीरपणे आझादांनी उपाय सांगितला. "एक स्वच्छ पांढरा कागद घे. त्यात हिरव्यागार दुर्वा गुंडाळ आणि माझ्याकडे घेऊन ये. त्यावर मी एक मंत्र लिहून देईन. तो एका ताईतात घालून आपल्या दंडावर बांध. काय बिशाद आहे कोणी तुझ्यावर जादूटोणा करील."

त्याला हे सर्व खरेच वाटले. त्या दिवसापासून त्याच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. आणि या दोघांकडे तो अतिशय पूज्य बुद्धीने पाहू लागला.

याच्या मार्फत बाबा गुरुमुखसिहांनी संपूर्ण हकीकतीचे एक पत्र रशियन सफारतखान्यात पाठविले. दुसरे की तिसरेच दिवशी जगातील सर्व वर्तमानपत्रांत बातमी छापून आली की भारतातील दोन प्रसिद्ध क्रान्तिकारक अफगाणिस्तानच्या तुरुंगात खितपत पडले आहेत. आणि हिंदुस्थान सरकारच्या सूचनेवरून त्यांना फाशीची शिक्षा देण्यात येणार आहे. चौथ्या दिवशी शहरचा कोतवाल हंटर घेऊनच आला. सर्व कैद्यांना समोर बोलावून त्याने दरडावून विचारले, "ही बातमी बाहेर कोणी पसरविली?" कोणीच उत्तर देईना, तेव्हा एक जण म्हणाला, "हे दोघे मोठे जादूगार आहेत. माणसाला माशीसुद्धा करतील." एवढे ऐकल्यावर कोतवालसाहेब घाबरले. आणि मुकाट्याने निघून गेले.

दुसऱ्या दिवशी त्यांच्या पायांतील बेड्या काढण्यात आल्या; कपडे बदलले, जेवण तयार करण्यासाठी एक स्वयंपाकी देण्यात आला. त्यांच्या सुटकेसाठी बाबा ज्वालासिंह यांनी हिंदुस्थानात मोठी चळवळ केली. अमेरिकेत राहाणाऱ्या गदरपार्टीच्या सभासदांनी पण अफगाणिस्तानावर दबाव आणण्याचा प्रयत्न केला; "दोघांवर खटला भरा; नाहीतर सोडून द्या." अशी मागणी केली. अशीही बातमी पसरविण्यात आली की खटला चालविण्यासाठी अमेरिकेहून एक बॅरिस्टर येणार आहे.

आणि शेवटी हे दोघे जिथून निघाले तिथेच म्हणजे रशियात आले. अफगाणिस्तानानेच तिकडे पोचविण्याची व्यवस्था केली. रशियातील एक क्रान्तिकारक गुरुमुखसिहांच्या कानात म्हणाला, "तुमची सुटका करण्याची व्यवस्था अगोदरच झाली होती. त्या दिवशी खाना प्रान्ताच्या गव्हर्नरबरोबर होणार असल्याचे कळले. यांना वाटले आता आपल्याला चांगल्यात चांगले अन्न खायला मिळेल. पण पाहातात तो काय, बश्यांमधून काळ्या पावाचे तुकडे, पेल्यामधून चहाचे पाणी आणि बशीमध्ये साखरेचे खडे. मोठ्या दुःखाने गव्हर्नरसाहेब म्हणाले, "काय करणार, उत्तमात उत्तम वस्तू आम्ही तयार करतो; पण त्या सर्व आम्हांला आमच्या काही उपयोगात आणता येत नाहीत; दुसऱ्या लोकांना विकाव्या लागतात. कारखान्याकरिता यंत्रे पाहिजेत; देशाला सुरक्षित ठेवण्यासाठी शस्त्रे पाहिजेत. देशातील प्रत्येक कामगार सोळा सोळा तास काम करीत आहे; जे काही मिळेल त्यावर

जगतो आहे." ते पुढे म्हणाले, "तुम्ही आमचे पाहुणे, जुने क्रान्तिकारक; तुम्हाला हे सर्व ठाऊकच आहे. आपल्याबरोबर तुम्हाला जेवायला बोलावून क्रान्तिकारकाबद्दल आमच्या मनात किती आदर आहे. हे मला सुचवावयाचे होते."

तिथून ताशकंद आणि पुढे मॉस्कोला पोचविण्यात आले. तिथे कम्यूनिस्ट इंटरनॅशनलचे दोन अधिकारी आले. त्यांनी यांना एका मोठ्या हॉटेलमध्ये नेले. डॉक्टरी तपासणी झाली ; योग्य तो आहार सुरू झाला आणि सुमारे तीन महिन्यांत दोघेही जण अगदी ठणठणीत बरे झाले. मग त्या अधिकाऱ्यांनी पुढच्या बेताबद्दल विचारले. रशियात राहणार असाल तर राहू शकता. कोणत्याही देशातील क्रांतिकारकाला इथे नागरिक म्हणून राहण्याचा पूर्ण अधिकार आहे, तरीपण आझादांनी भारतात जाणेच पसंत केले.

भारतात परत येण्यासाठी त्यांनी जलमार्ग पसंत केला. बनावट पासपोर्ट तयार झाला; पण त्यात एक चूक राहून गेली. ते १९३४ साल होते; त्या वेळी त्यांचे वय ४२ होते आणि पासपोर्टात ते २७ लिहिले होते. रशियातील 'ओडिसा' बंदरापासून त्यांचा प्रवास सुरू झाला. ते इटालियन जहाज होते. त्या जहाजाच्या कप्तानाने पासपोर्टवर स्पष्ट अक्षरात लिहिले की या प्रवाशाचा प्रवास रशियातील बंदर 'ओडिसा' इथून सुरू झाला आहे. या पासपोर्टवर भारतातील कोणत्याही बंदरावर जर ते उतरले तर भारतीय पोलीस त्यांना तुरुंगाची हवा खायला लावणार हे निश्चित. शेवटी बराच विचार करून त्यांनी एका फ्रेंच जहाजातून पुढचा प्रवास करण्याचे ठरविले. ते जहाज तिथून शांघायकडे जाणार होते. पाँडिचरी इथे ते पंधरा दिवस थांबणार होते. प्रवास सुरू झाला. वाटेत कुठल्याही बंदरावर न उतरण्याचे त्यांनी ठरविले. जहाजावर बसल्या बसल्या त्या कप्तानाने लिहिलेला मजकूर थोडा पुसट केला आणि त्यावर शाईचा डाग पाडून ठेवला. स्वतःचे केस कापून घेतले. नेकटाय बांधून चेहरा शक्य तितका तरुण दिसेल असे केले. शेवटी एकदाचे पाँडिचरी आले. रविवारचा दिवस होता. प्रवासी जहाजातून उतरले. आझादही आपले सामान घेऊन उतरू लागले. बंदरातील अधिकाऱ्यांनी तो काळा डाग पाहिला. "हा शाईचा डाग कसा पडला ? त्यांनी विचारले.

तेव्हा हसत आझाद म्हणाले, "ऑफिसमधील कुठल्यातरी कारकुनाची तरतूद–" गोष्ट हसण्यावारी नेण्यात आली आणि त्यांचे काम झाले. पाँडिचरीत ते एका भव्य हॉटेलमध्ये उतरले. खोलीत सामान ठेवून बाहेर पडतात न पडतात तोच आपल्यामागे दोन गुप्त पोलीस येत असल्याचा त्यांना संशय आला. मुद्दामच यांनी आपली चाल मंद केली. ते दोघेही यांच्याबरोबर चालू लागले.

"कुठे चालला आहात आपण?" प्रश्न.

"माझ्याजवळ अमेरिकन डॉलर्स आहेत; दुसरा पैसा नाही. मला पैसे हवे आहेत खर्चाला. आज रविवार आहे. बँक बंद आहे. नाही तर मी डॉलर तोडून आणले असते. भूक लागली आहे. चहा-नाश्ता यासाठीही पैसे नाहीत."

हे त्यांचे उत्तर ऐकून ते दोघे आझादांना घेऊन एका हॉटेलात गेले; पोटभर खाऊ घालून म्हणाले, "संकोच करण्याचे कारण नाही; उद्या येताना आम्ही पैसे घेऊन जाऊ."

आणि मग ते दोघे आझादांच्या बरोबर फिरतच राहिले. शेवटी फिरून फिरून जेव्हा ते अगदी थकून गेले तेव्हाच त्यांनी आझादांना सोडले. परत येऊन त्यानी कपडे बदलले आणि काही कपडे कागदात गुंडाळून बरोबर घेतले आणि बाहेर पडले. सूर्यास्तानंतर गल्लीबोळातून जाता जाता शेतवडीत आले. कोणी पाठलाग करीत नाही ना हे पाहात पाहातच ते चालले होते. पुष्कळ दूर गेल्यावर त्यांनी आपले कपडे बदलले. कोट–पँट काढून त्याऐवजी लुंगी नेसून जाण्याचे त्यांनी ठरविले. सकाळ होता होता ते रेल्वे लाइनवर पोचले. पाय खूप थकले होते. थोडी विश्रांती घ्यावी म्हणून टेकले तर चांगली झोपच लागली, ती उन्हाचे चटके बसू लागले तेव्हाच उघडली. रेल्वे लाइनच्या बाजूने चालले असता समोरून एक बाई डोक्यावर पाटी घेऊन येताना दिसली. जवळ येताच टोपलीत काय असावे ते वासावरून त्यांनी ओळखले. तिला थोडे पैसे देऊन तिच्याजवळची भजी त्यांनी घेतली आणि आपली भूक भागविली. शेजारीच पाण्याचे एक डबके होते. त्यातील पाणी ओंजळीने प्यायले आणि पुढे चालू लागले. तेवढ्यात पुन्हा समोरून एक माणूस आला. तुम्ही कुठून आलात आणि कुठे चालला आहात ? असे खुणा करून त्याने विचारले. 'मी एक प्रवासी आहे; जवळच्या स्टेशनावर

चालली आहे ' असे म्हणून ते पुढे चालू लागले. हा माणूसही त्यांच्याबरोबर चालू लागला. हा आपल्याबरोबर का येतो आहे हे काही त्यांना समजेना. ते शेतवडीत शिरले तसा हाही तिकडेच निघाला. परत येऊन ते रेल्वे लाइनच्या बाजूला पडून राहिले; हाही त्यांच्या शेजारी बसून राहिला. तेव्हा त्यांना समजले की हा गुप्त पोलीस आहे. दुसऱ्या कोणाची मदत आली की मग याला पकडावे असा त्याचा बेत असावा. मग त्यांनी आपल्या मनात काही बेत पक्का केला आणि ते घाईघाईने स्टेशनकडे चालले. तोही त्यांच्याबरोबर निघाला. थोडे दूर गेल्यावर आझादांनी आपल्या काखेतील कपडयाचे बंडल तिथेच ठेवले आणि ते बाजूच्या झाडीत गेले. तो तिथेच बसला. शौचाला गेलो होतो असे दाखविण्यासाठी आझाद थोडा वेळ झाडीतच बसून राहिले. परत येऊन गाठोडे उचलण्यापूर्वी खिशात हात घालून तो मोकळाच बाहेर काढला; म्हणजे आपले पैशाचे पाकीट झाडीतच पडले असे दर्शविले. ते शोधण्यासाठी म्हणून आझाद झाडीकडे निघाले, हाही निघाला. झाडी दाट होती. आसपास कोणी माणूस नाही असे पाहून त्यांनी त्या गुप्त पोलिसाच्या पेकाटात एक लाथ घातली, त्याला खाली पाडले आणि बदडू लागले. त्याची लुंगी सुटलेली पाहून त्यांना एक कल्पना सुचली. याच्या तोंडात ही लुंगी कोंबली तर–विचार लगेच कृतीत उतरला. पण लुंगी त्याच्या तोंडात कोंबत असताना त्यांच्या हाताची करंगळी त्याच्या दाताखाली आली, मग काय तो सोडतो आझादांना वाटले आपली करंगळी त्याच्या तोंडातच राहिली. आझादांनी त्याला सोडताच तो धूम पळत सुटला. त्याच्याकडे लक्ष न देता आझाद डोंगरावरील जंगलात संध्याकाळपर्यंत लपून बसले आणि अंधार पडता पडता गावात आले. एका दुकानातून काही थोडे खायला घेतले आणि जवळच्या बागेत जाऊन बसले. खाऊनपिऊन आता विश्रांती घेणार एवढ्यात दुसरा एक माणूस त्यांच्याकडे आला. तो एक भारतीय मुसलमान होता. त्याला यांनी आपण एक आध्यात्मिक फकीर आहो असे सांगताच तो यांच्याशी अध्यात्मावर चर्चा करू लागला. यांच्या बोलण्याचा त्याच्यावर एवढा प्रभाव पडला की त्याने यांचे पाय धरले. आणि म्हणाला, " मुझे आज्ञा दो; मैं खानेके लिए कुछ लाऊँ." पण आझादांना ते आवडले नाही. ते म्हणाले, " मी तुला परमेश्वरप्राप्तीचो वाट दाखविली; त्याचा मोबदला

मी घेऊ शकत नाही. तू एक पवित्र माणूस दिसतोस. आपले मन साफ करून डोळे मीट आणि एक तासभर त्या पलीकडच्या बाजूला अल्लाची याद करीत बैस." आश्चर्याची गोष्ट म्हणजे तसा तो बसलाही. आझाद तिथून उठले आणि सरळ रस्ता सोडून शेतवडीत शिरले. असे करीत करीत आझाद मद्रासला पोचले. मद्रासमध्ये त्यांच्या तालमीत तयार झालेले अनेक तरुण आता स्थाइक झाले होते. त्यांच्यापैकी जीवनलाल आणि कम्पनीचे मॅनेजर श्री. हेमचंद शहा हे एक होते. आझादांनी आपल्या रिक्षेवाल्याला त्यांचाच पत्ता दिला. तिथे त्यांची सर्व सोय झाली. तिथून त्यांना आंध्रकेसरी टी. प्रकाशम् यांच्या घरी नेण्यात आले. दुसरे दिवशी संध्याकाळी वुलसू सांबमूर्ती हेही आले. काही वेळानंतर आंध्रमधील प्रख्यात कार्यकर्ता डॉ. सुब्रह्मण्यम् आले. करंगळीला मलमपट्टी करण्यात आली. चौदा दिवस विश्रांती घेतल्या-नंतर त्यांना बरे वाटू लागले. तिथून ते भावनगरला गेले.

## ३०. भावनगर ते मुंबई

भावनगरला काही दिवस राहून ते मुंबईला आले. मुंबईत साम्यवादी पक्षाचे लोक भूमिगत राहून कार्य करीत होते. श्री. पी. सी. जोशी हे त्या वेळी त्यांचे पुढारी होते. त्यांना भेटण्याचे ठरले. श्री. जोशी यांच्याकडून निरोप आला की तुम्ही सांगाल त्या ठिकाणी येऊन मी भेटेन. आझादांनी उलट निरोप पाठविला की त्यांनी समर्थ व्यायाम मंदिरातील काळे गुरुजीं-कडे यावे. पुन्हा निरोप आला की ते स्वत: येणार नाहीत. त्यांच्यातर्फे एक माणूस येऊन तुम्हाला घेऊन जाईल. जेव्हा तो माणूस आला तेव्हा आझाद त्याला म्हणाले, "मला माझ्या मित्राकडे घेऊन चल." पण तो माणूस म्हणाला, "ज्याला तुम्ही भेटू इच्छिता तो मीच आहे." हे ऐकल्याबरोबर त्यांना शंका आली आणि वाटले की आता आपण जाळ्यात अडकलो. ते त्याला म्हणाले, "आपण थोडा वेळ इथे बसा; मी आलोच." आणि आत

जाऊन ते काळ्यांना म्हणाले, " बातमी बाहेर फुटलेली दिसते; असं करा त्या माणसाला कसंही करून एक तासभर तिथून हालू देऊ नका." एवढे सांगून आझाद निघून गेले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे काळ्यांनी त्या व्यक्तीला काहीतरी सबब सांगून एक तासभर तिथे अडकवून ठेवले आणि गमतीची गोष्ट म्हणजे ते पी. सी. जोशीच होते.

तिथून ते कलकत्त्याला आले आणि साम्यवादी दलात काम करू लागले. सुमारे दोन वर्षांचा काळ लोटला असेल, एके दिवशी एका गुप्तचराला त्यांचा संशय आला. तो त्यांची पाठ सोडीना. आझादांच्या हातात दंडा होता. त्यामुळे जवळ येण्याची छाती त्याला होत नव्हती. कोणी तरी आपल्या मदतीला येईल आणि मग आपण याला पकडू अशा विचारांनी तो पाठलाग करीत होता आणि ही ब्याद कशी टाळावी या विचारात आझाद होते. गल्लीबोळातून जाता जाता त्यांना एक दवाखाना दिसला आणि ते लंगडत चालू लागले. पाय फारच दुखतो आहे असे त्यांनी नाटक केले डॉक्टराजवळ गेल्याबरोबर डॉक्टरांनी त्यांना टेबलावर झोपविले. ' कुठं दुखतंय ' असे म्हणत डॉक्टरांनी हात लावताच आझाद किंचाळलेच; म्हणाले, " बहुत दर्द हो रहा है " इंजेक्शन देऊन घट्ट पट्टी बांधा आणि मला माझ्या घरी पोचवा. " आणि असे म्हणत त्यांनी दहा रुपयांची एक नोट त्यांच्या हातात दिली. त्या रुपयांनी काम केले. एक व्हीलचेअर आली. थोड्याच वेळात दारात एक टॅक्सीही आली आणि त्या टॅक्सीतून त्यांना घरी पोचविण्यात आले. मग मात्र त्यांनी ठरविले की आता इथं राहण्यात धोका आहे.

तिथून ते परत मुंबईला आले आणि भूमिगत राहून काम करू लागले; पण लवकरच त्यांना त्या बंदिस्त जीवनाचा कंटाळा आला. उघडपणे काम करावे तर पकडले जाण्याचा धोका. शेवटी ते ' जन्मभूमी ' चे संपादक श्री. अमृतलाल शेठ यांना जाऊन भेटले. स्वामीरावांना ते चांगलेच ओळखत होते. स्वामीरावांनी त्यांना एकदा जिवावरच्या संकटांतून वाचविले होते. शेटजींनी एक युक्ती काढली. ' जन्मभूमीच्या दरवाजावर तुम्ही चौकीदाराचे काम करा. ' असे त्यांनी सांगताच आझादांनी ते चटदिशी कबूल केले. अर्थात यातही धोका होताच. फाटकातून आत, येताना किंवा बाहेर जाताना सहसा



बाल वाङ्मय विभाग.

कोणी दरवाजाकडे पाहात नाही असे जरी असले तरी कधीच कोणी पाहाणार नाही असे थोडेच आहे. आझादांना आपल्यापेक्षा आपल्याला आसरा देणाऱ्या शेटजींचीच काळजी अधिक वाटत होती. त्यांनी आणखी काही मित्रांबरोबर चर्चा केली. त्यात असे ठरले की एखाद्या कारखान्यात दरवानाची जर नोकरी मिळाली तर त्यासाठी खटपट करावी. सुदैवाने बबलचंद मोदींनी ते काम केले. त्यांच्याबरोबर आझाद इंग्रजीत बोलले तेव्हा त्यांनी आझादांना आपल्या ऑफिसमध्येच काम दिले. हे काम करीत असतानाच श्री. मोदी यांचे धाकटे बंधू कांतिलाल विलायतेहून परत आले. ते एक भावनाप्रधान तरुण होते; त्यामुळे त्यांच्यावर आझादांचा चांगलाच प्रभाव पडला. काही दिवसांतच त्याना कारखान्याचे फिरते एजंट म्हणून भारतात निरनिराळ्या ठिकाणी पाठविण्यात आले. पुढे तर त्यांनी १९३८ पर्यंत व्यवस्थापकाचे काम केले. तिथूनच पुढे ते म. गांधींच्या आश्रमात गेले. याला कारणे अनेक होती. एक म्हणजे देशातील राजकीय वातावरण आता बरेचसे बदलले होते. भारतातील बऱ्याच प्रांतांमधून काँग्रेसची सरकारे होती. तुरुंगात डांबून टाकलेले काँग्रेसचे कार्यकर्ते धडाधड सोडून देण्यात येत होते. लोकांच्या मनातील देशभक्तांबद्दलचा आदरभाव सारखा वाढत होता. जिकडे तिकडे लोकांकडून त्यांचे स्वागत होत होते. दुसरे कारण म्हणजे स्वामीरावच्या हाताखाली तयार झालेले हजारो तरुण उद्योगधंद्याच्या निमित्ताने भारतभर पसरले होते. कोण, केव्हा ओळख काढील आणि त्याचा फायदा पोलीस कसा घेतील याचा नेम नव्हता. असे प्रसंग वरचेवर येऊ लागले.

एके दिवशी कारखान्यातील दोन माणसांबरोवर ते कापडाच्या दुकानात गेले होते. विक्रेता समोर उभा होता. त्याला आझादांनी कापड दाखविण्यास सांगितले तर तो नुसता हसतच राहिला. या मंडळींना त्याचा राग आला. मालकही रागावला. तेव्हा तो विक्रेता म्हणाला, "मला स्वामीरावांची आठवण झाली. अगदी असेच होते. ते माझे गुरू. पण पुढचे बोलणे ऐकायला आझाद तिथे थांबलेच नाहीत. घाईघाईने समोर दिसले ते कापड घेतले आणि दुकानातून बाहेर पडले. दुसरा प्रसंग मुंबईचा आहे. असेच काही खरेदी करून ते परत चालले होते, एवढ्यात रस्त्यातच एकाने त्यांचे पाय धरले आणि म्हणाला, "आता आपण आमच्या घरी आले पाहिजे; वडील

बंधू सारखी तुमची आठवण काढीत असतात. " मोठ्या भावाचे नाव ऐकताच आझादांनी लागलीच ओळखले; पण बरोबरीच्या मंडळींना आपले खरे स्वरूप कळू नये म्हणून त्यानी आपल्या पायाने त्या तरुणाचा पाय दाबला. त्यालाही ती भाषा समजली आणि ' भाऊना सांग, मी उद्या येईन. ' एवढे बोलून त्यांनी लागलीच त्याला निरोप दिला.

या दोन कारणांशिवाय तिसरे एक कारण होते. देशसेवा करण्यासाठी आता भूमिगत राहण्याची काही आवश्यकता नव्हती. या सर्व गोष्टी विचारात घेऊन त्यांनी असे ठरविले की आता आपण स्वतःला महात्माजींच्या स्वाधीन करावे. स्व. डॉ. पट्टाभि सीतारामय्या आणि स्व. श्री. नानाभाई भट्ट यांच्या मदतीने ते महात्माजींपर्यंत गेले. रात्रीचे दहा वाजले असतील; कार्यकारिणीच्या बैठकीनंतर ते महात्माजीकडे गेले. महात्माजी त्यांना स्वामीराव या नावाने ओळखीत होतेच. स्वामीराव यांचं खरं नाव काय, ते कोण आहेत, ते कशा प्रकारचे जीवन जगतात हे जेव्हा त्यांना सांगण्यात आले तेव्हा ते म्हणाले, " हा तुमचा अद्भुत जीवनवृत्तांत थोडा सविस्तर लिहून आणता आला तर पाहा. उद्या घेऊन या. "

●

# ३१. महात्माजींची भेट

आझादांना वाटले होते, आपण महात्माजींकडे जेव्हा जाऊ तेव्हा ते पोलीसला बोलावतील आणि आपल्याला त्यांच्या हवाली करतील. मग काय व्हायचे ते सावकाश होत राहील. गांधीजींचे म्हणणे ऐकून आझाद थोडे निराश झाले. रात्रीच्या वेळी बाहेर जाणे आणि पुन्हा दुसरे दिवशी परत येणे यात धोका होता. पण गांधीजींच्या सांगण्याप्रमाणे करण्यावाचून गत्यंतर नव्हते. एखाद्या गोष्टीचे आपल्याला भय वाटते असे कबूल करायचे म्हणजे नामुष्कीची गोष्ट आहे असे त्यांना वाटत होते. दुसरे दिवशी बापूंच्या म्हणण्या-प्रमाणे एक सविस्तर लेखी निवेदन त्यांच्या हातात दिले. बापूजींनी काळजी-

पूर्वक ते वाचले आणि ते गंभीरपणे म्हणाले, "इंग्रज सरकारच्या दृष्टीने तुम्ही एक महाभयंकर प्राणी आहात, म्हणून ते तुम्हाला मोकळे ठेवतील असे वाटत नाही; पण त्याहिपेक्षा ते तुम्हाला जिवंत तरी ठेवतील की नाही याचीही शंकाच आहे. तेव्हा आपला आत्मसमर्पणाचा हा विचार सोडून द्या. आणि ही सोळा वर्षे जशी अज्ञातवासात काढलीत तसेच आणखी काही दिवस तुम्ही अज्ञातवासातच राहावे असे मला वाटते. देश स्वतंत्र झाला की आपोआपच तुमचा हा अज्ञातवास संपेल, पण आझादांना ते पटले नाही. ते म्हणाले, "माझा जीव वाचावा आणि मी मुक्त व्हावे हा माझा उद्देश नाही. आता भूमिगत राहून कार्य करण्याची आवश्यकता नाही हे मी आमच्या तरुणांना पटवून देऊ इच्छितो. बापूजींनी त्यांना आणखी थोडा विचार करावयास सांगितले.

त्या वेळी बापू जुहूला होते. वर्ध्याला परत गेल्यावर आझादांचे आत्मसमर्पण आणि त्यांची मुक्तता याविषयी व्हाइसरॉयबरोवर पत्रव्यवहार असा त्यांचा इरादा होता. दुसरे दिवशी आझादांचे जुने मित्र भाउद्दीन उस्मान शेख याना समजले की आझाद आत्मसमर्पण करीत आहेत. ते स्वतः येऊन महादेव भाईंना भेटले. आझाद तिथे आल्याची बातमी सगळीकडे पसरली. तेव्हा बापूजींनी आपला विचार बदलला. मुंबईच्या कमिशनरला त्यानी एक पत्र लिहिले. ते पत्र घेऊन महादेवभाईंना व्हाइसरॉयकडे पाठविले. त्याबरोबरच तोंडी निरोप पाठविला की "इंग्रज सरकारचा बंडखोर आणि फरारी झालेला कैदी पृथ्वीसिंह" माझ्याकडे आला आहे. त्याच्या मुक्ततेची मी खटपट करणार आहे. त्याला माझ्या जवळ राहू देत असाल तर राहू दे; तसे शक्य नसेल तर त्याला तुमच्या ताब्यात घ्या." त्या वेळचा मुंबईचा कमिशनर खेळाडू वृत्तीचा होता. त्याला असे वाटले की ज्याला इंग्रज सरकार सोळा वर्षे पकडू शकले नाही तो कैदी आज आपणहून स्वाधीन होतो आहे. कोणत्या अपराधासाठी त्याला पकडायचे ? कमिशनरने उत्तर पाठविले, " त्याला पकडण्यासाठी मी येत नाही; सरकारला कळवीत आहे. जसा हुकूम येईल तसे करीन " काही तासांच्या अवधीतच व्हाइसरॉयकडून हुकूम आला, " पृथ्वीसिंह फार भयंकर माणूस आहे; त्याला कैद करण्यात दिरंगाई करू नये; आणि त्याला पकडणे सोपे नाही हे विसरू नका " त्याप्रमाणे दुसरे दिवशी दोन वाजता कमिशनर

येणार आणि आपण पकडले जाणार हे आझादांना समजले. तरीही नेहमी-प्रमाणे जेवण करून ते आपल्या खोलीत जाऊन झोपले.

थोड्याच वेळात दोन ट्रक भरून पोलीस आले आणि त्यांनीं महात्माजींच्या निवासस्थानाला घेरले; पण कमिशनर आल्यावरोबर त्याने सर्व पोलीस परत पाठविले. एका गुप्तचर विभागातील पोलीस अधिकाऱ्याला बरोबर घेऊन कमिशनरसाहेब बापूजींच्याकडे गेले. स्व. महादेवभाई देसाई यानी आझादांच्या खोलीचा दरवजा खटखटावला. आझाद पार झोपेत असलेले पाहून त्यांना आश्चर्य वाटले. बापूजींच्या जवळ सर्व लोक जमा झाले आणि भजन म्हणून आझादांना निरोप देण्यात आला. ही घटना १९ मे १९३८ ची आहे.

दुसरे दिवशी कैद्याच्या माहितीचे कार्ड मिळीले. त्यात सुटकेचे वर्ष १९६६ लिहिले होते. तिथेच सरदार पृथ्वीसिंह आझाद यानी आपला जीवन वृत्तांत लिहिला.

त्या वेळी सिकंदर हयातखाँ पंजाबचे मुख्य मंत्री होते. त्यांनी व्हाइसरॉयच्च्या मार्फत मुंबई सरकारला विनंती केली की पृथ्वीसिंह आमचा कैदी आहे. तेव्हा त्याला आमच्या स्वाधीन करावे. पंजाबमधील जेलमध्ये आणण्यासाठी त्यांनी एक तरुण शीख पोलीस इन्स्पेक्टर पाठविला. ही कामगिरी एकट्याने पार पाडण्याची त्याला हिंमत झाली नाही. त्याने पोलिसांचे एक सबंध पथकच आपल्या मदतीसाठी मागितले. हे सर्व लोक ठाण्याहून कल्याणला आले. तेथील प्रथम श्रेणीच्या प्रतीक्षालयात तो इन्स्पेक्टर'आझादांच्या जवळ येऊन बसला. त्याने आझादांना अनेक प्रश्न विचारून ओळख करून घेतली. आझादांनी मोकळेपणाने उत्तरे दिली. दोन तासांनंतर त्यांना एका इंटर क्लासच्या डब्यात बसविण्यात आले. वरच्या बर्थवर आझाद आपले अंथरूण पसरू लागले तेव्हा तो म्हणाला, "तुम्हाला वरचा बर्थ गैरसोयीचा आहे; खालच्या बर्थवर झोपता का?" त्याचा आग्रह पाहून ते खालच्या बर्थवर झोपले. त्याचे भरलेले पिस्तूल सरदारांच्या बिछान्याजवळच लटकत होते. थोड्याच वेळात तो इन्स्पेक्टर गाढ झोपी गेला. बेड्यांनी जखडलेला असता-नाही धावत्या गाडीतून दोन वेळा उडी घेणारा कैदी संभाळण्याची जबाब-दारी असतानाही तो स्वस्थ झोपू शकला याची दोन कारणे आहेत. पहिले कारण

असे की तो इन्स्पेक्टर पंजाब युनिव्हर्सिटीचा स्नातक होता. दोन तासांच्या चर्चेनंतर त्याची खात्री झाली असली पाहिजे की सोळा वर्षे सतत प्रयत्न करूनही पोलीस ज्याला पकडू शकले नाहीत असा कैदी आपणहून सरकारच्या स्वाधीन होतो म्हणजे त्यात त्याचा तसाच काही उद्देश असला पाहिजे. दुसरे म्हणजे अशा अवस्थेत आत्मसमर्पण करणाऱ्याच्या बाबतीत पळून जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

रावळपिंडी येथील जेल सुपरिंटेंडेण्ट एक इंग्रज होता. कॅप्टन होल्डर आणि डेप्युटी एक मुसलमान होता – चौधरी मुरीद अहमद. इमानदारी, स्वामिनिष्ठा आणि कडी शिस्त हे त्याचे वाखाणण्यासारखे गुण होते. तुरुंगात प्रवेश करून चौधरी मुरीद अहमदच्या ऑफिसमध्ये त्यांनी पाऊल टाकताच उभे राहून त्याने आझादांचे स्वागत केले आणि मिठी मारली. हे पाहून आपली एका सैतानाशी गाठ आहे की साधूशी हेच आझादांना समजेना. तुरुंगाधिकारी म्हणून ज्याने इतकी वर्षे काम केले त्याच्याकडून अशी चांगली वागणूक अनपेक्षित होती. आझादांनी त्याच्या दृष्टीला दृष्टी भिडविताच तो म्हणाला, "मला आपला भाऊ समजा. जोपर्यंत इथे राहाल तोपर्यंत तुम्हाला मी स्वतःच्या भावासारखेच वागवीन." शांतचित्ताने तो खुर्चीवर बसला आणि आझादांना त्याने दुसरी खुर्ची दिली. तो म्हणाला, "तुमचा जेल-वृत्तांत वाचून वाटले होते की कसल्या भयंकर कैद्याशी गाठ पडते आहे कुणास ठाऊक! त्याच्या बंदोबस्तासाठी काय काय करावे याचा नुसता विचारच नाही तर त्याप्रमाणे व्यवस्थाही करण्यात आली आहे. तुम्हाला कैदेत ठेवण्यासाठी असे ठिकाण निवडण्यात आले आहे की त्या बाजूला कोणीही फिरकणार देखील नाही; पण आज माझ्यासमोर जी व्यक्ती उभी आहे ती ऐकीव वर्णनापेक्षा अगदीच वेगळी आहे." मग त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना बोलावून त्यांना सूचना दिली की आझादांना युरोपियन वॉर्डमध्ये ठेवण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करावी.

युरोपियन वॉर्डमध्ये तीन खोल्या होत्या. एक लेखन–वाचनासाठी, दुसरी झोपण्यासाठी आणि तिसरी सामान ठेवण्यासाठी. दिमतीला तीन कैदी देण्यात आले होते. एक पहारा करण्यासाठी, दुसरा सफाईसाठी आणि तिसरा स्वयंपाक करण्यासाठी. आझादांना रावळपिंडीच्या तुरुंगात आणल्याची बातमी सगळ्या

वर्तमानपत्रांनी दिली. अनेक काँग्रेसचे कार्यकर्ते, तसेच अनेक युरोपियन अधिकारीही त्यांना भेटण्यास आणि पाहण्यास येऊ लागले. रावळपिंडी विभागाचा इंग्रज कमिशनरही एक दिवस येऊन गेला. तो आझादांना म्हणाला, "तीन तीन खोल्या; तीन तीन नोकर, भोवती बाग-बगीचा; आता तरी इंग्रजांचा द्वेष करणं सोडणार का?"

आझाद हसत हसत म्हणाले, "माझ्या सर्व देशबांधवांना जेव्हा इंग्रज सरकार अशा सुखसोयी पुरवील तेव्हा मी मित्रत्वाच्या नात्याने त्यांच्याशी हस्तांदोलन करायला तयार होईन."

त्यांच्या खोलीसमोर त्यांचे कैदी-कार्ड टांगले होते. काळे पाणी आणि रावळपिंडी यात फारच मोठे अंतर होते. अंदमानमध्ये लाकडाच्या पाटीवर कैद्याचे कार्ड लिहिलेले असे; आणि ते एका तारेत अडकवून कैद्याच्या गळयात बांधले जाई; तर इथे दरवाजावर कार्डबोर्डच्या तुकडयावर ते चिकटविलेले असे. त्यांच्या मुक्ततेचे वर्ष होते १९६६. ते वर्ष पाहून कमिशनरने विचारले, "सन १९६६ पर्यंत जिवंत राहाणार का?"

उत्तर मिळाले, "इतकी वर्षे जिवंत राहण्याची जबाबदारी मी घेऊ शकतो; पण आपले सरकार १९६६ साल पाहील याची खात्री तुम्ही देऊ शकता काय?"

हे उत्तर ऐकून त्याची खात्री झाली की हा काही सामान्य चोर-भामटा नाही; एक क्रान्तिकारक आहे.

पंजाबमध्ये १९३८ साली शेतकऱ्यांच्या संघटनेने एक मोठा सत्याग्रह केला. जवळ जवळ ४०० सत्याग्रही रावळपिंडीच्या तुरुंगात डांबले गेले. हे सर्व तरुण रक्ताचे होते. साम्यवादी नेत्यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी सत्याग्रह केला होता. जेलअधिकाऱ्याची धावपळ पाहून आझादांनी चौधरी मुरीद अहमद यांच्याशी चर्चा केली आणि सांगितले की, तुम्ही जर मला परवानगी दिलीत तर मी या सर्वांना सहज काबूत ठेवू शकेन. परवानगी मिळाली शेतकऱ्यांचे बहुतेक सर्व साम्यवादी नेते आझादांच्या परिचयाचे होते. प्रमुख नेता बाबा सोहनसिंह भकना तर त्यांचेही नेता होते. सकाळ-संध्याकाळ परेड आणि खेळ सुरू झाले आणि दुपारी साम्यवादावर चर्चा, असा दिनक्रम होता.

सरदारांना काम मिळाले, शेतकऱ्यांना ज्ञान मिळाले आणि तुरुंगाधिकाऱ्यांची कटकट मिटली.

तुरुंगात कैद्यांना पत्रे आली तर त्यात काही विशेष नाही; पण आझादांना गांधीजींकडूनही पत्रे येत आणि तीमुद्धा त्यांनी स्वतःच्या हातांनी लिहिलेली. पाकिटावरचा पत्ताही त्यांनीच लिहिलेला असायचा. त्या पत्रांची रिकामी पाकिटे मिळविण्यासाठी तुरुंगाधिकारी धडपडत आणि आपआपसात ती वाटून घेत.

●

## ३२. कैदियों में एक बंदी

आझादांच्या मुक्ततेसाठी गांधीजींनी व्हाइसरॉयबरोबर पुष्कळ पत्रव्यवहार केला. पण त्याचा काहीही उपयोग झाला नाही. आझादांनी आत्मसमर्पण केले त्याच वेळी गांधीजी म्हणाले होते की, तुम्हाला सरकार मुक्त करील असे काही मला वाटत नाही. आणि म्हणूनच आता व्हाइसरॉयनी जो नकार दिला त्याचा आझादांच्यावर काही विशेष परिणाम झाला नाही. ही बातमी देण्यासाठी स्वतः महादेवभाई आले होते. त्यांच्याबरोबर खूप चर्चा झाली; नंतर सप्टेंबर १९३६ च्या ‘हरिजन’ मध्ये पुढील लेख आला. शीर्षक होते, “कैदियों में एक कैदी”

“सरदार पृथ्वीसिह यांना मी रावळपिंडीच्या तुरुंगात पाहिले. त्यांनी स्वेच्छेने आत्मसमर्पण केले आणि ते पोलिसांच्या स्वाधीन झाले; म्हणून त्यांची मुक्तता करणे आपले कर्तव्य आहे असे गांधीजींना वाटले. मी पृथ्वीसिह यांच्याकडे शांत राहण्याचा संदेश घेऊन गेलो. त्यानंतर लागलीच बंगालच्या अन्नसत्याग्रह करणाऱ्या कैद्यांकडे तोच संदेश घेऊन जाण्याचा प्रसंग आला. या अनशन करणाऱ्या कैद्यांविषयी माझ्या मनात जे विचार होते त्याहून वेगळे विचार पृथ्वीसिह यांच्या मनात होते. माझ्याही मनात भय होते, शंका होत्या. पण मी याविषयी त्यांच्याबरोबर जेव्हा चर्चा सुरू केली

तेव्हा मला दिसून आले की माझी भीती त्यांना आवडली नाही. आत्मसमर्पण केल्यामुळे त्यांचे मन इतके प्रसन्न झाले होते की मुक्ततेचा विचारही त्यांच्या मनात येत नव्हता. यापूर्वीच त्यांनी ८० पौण्ड लोकर कातली होती; आता ते सूत काढू लागले होते. शिवाय ते सतरंजीही विणत. ते इतर कैद्यांना व्यायाम शिकवीत आणि उरलेला वेळ लिहिण्या-वाचण्यात घालवीत. आमच्या मुलाखतीच्या वेळी उपस्थित असलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना मी म्हणालो, "पृथ्वीसिंह काही त्रासदायक कैदी असतील असं वाटत नाही." तेव्हा त्यांच्यापैकी एक जण म्हणाला, "आपल्या तीस वर्षांच्या नोकरीत अनेक साधारण आणि असाधारण कैद्यांशी माझा संबंध आला; पण यांच्यासारखा एकही कैदी माझ्या पाहण्यात नाही."

आझाद दिवसभर काही ना काही उद्योग करीत. निवार तयार करणे, खुर्च्या विणणे, वगैरे कामे त्यांनी शिकून घेतली. जेल सुपरिंटेंडेण्ट कॅ. होल्डर यांनी त्यांना एक पाय चरखा आणून दिला. त्यावर ते लोकर कातू लागले. त्यांची अट एवढीच होती की ते सर्व सूत स्वतः विकत घेऊन बापूंना भेट करता यावे. आठ महिन्यांत त्यांनी सुमारे ४० पौण्ड लोकर कातली. प्यारेलालजी जेव्हा त्यांना भेटायला आले तेव्हा त्यांनी ते सर्व सूत बापूंना देण्यासाठी त्यांच्या हातावर ठेवले. या कामात ते इतके तल्लीन होत की त्या वेळी त्यांच्या पुढून कोणी आले गेले तरी त्यांना त्याचा पत्ता लागत नसे. त्या वेळी इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स मेजर बार्कर होते. ते अंदमानला जेल सुपरिंटेंडेण्ट आणि मेडिकल ऑफिसर होते. ते एकदा युरोपियन वॉर्डमध्ये आले. त्या वेळी पृथ्वीसिंह लोकर कातण्यात दंग होते. त्यांना मुळीच कळले नाही. बार्करसाहेब थोडे पुढे जाऊन परत आले आणि आझादांना म्हणाले, "पृथ्वीसिंह, तुमची इथली व्यवस्था ठीक आहेना? काही असुविधा नाही ना?" संभाषण इंग्रजीत झाले. पृथ्वीसिंह म्हणाले, "मी स्वच्छेने आत्मसमर्पण केले आहे. बापूजींच्या आज्ञेला अनुसरूनच मी एक कैद्याचे जीवन व्यतीत करीत आहे. मला जे मिळते आहे आणि माझ्याशी ज्या तऱ्हेचा व्यवहार केला जात आहे, त्यांत मी संतुष्ट आहे. आस्थापूर्वक केलेल्या विचारणेबद्दल धन्यवाद." साहेबानी आणखी विचारपूस केली. जेलच्या अधिकाऱ्यांना काही सूचना दिल्या. आझादांच्या बरोबर कोणीतरी फिरावयास जावे तसेच

बैठे खेळ खेळण्याचीही व्यवस्था करावी, एवढे सांगून ते थांबले नाहीत; लाहोरला परत गेल्यावर काही पुस्तके, बॅडमिंटन आणि बुद्धिबळ खेळण्याचे साहित्य, चेस्ट एक्स्पँडर व डंबेल्स एवढे सगळे त्यांनी ताबडतोब पाठवून दिले. त्या दिवसापासून तो युरोपियन वॉर्ड म्हणजे जेल–अधिकाऱ्यांचा एक क्लबच झाला. कॅप्टन होल्डरने त्यांना बॅडमिंटन खेळावयास शिकविले. रोज एक तास ते त्यांच्याबरोबर खेळत. चौधरी मुरीद अहमद सकाळी त्यांना फिरावयास घेऊन जात.

सप्टेंबर १९३९ च्या दुसऱ्या आठवड्यात दुसरे महायुद्ध सुरू झाले. म. गांधी आणि इंग्रज सरकार यांच्यामध्ये समेट होण्याची चिन्हे दिसू लागली. महात्माजींना दिल्लीला बोलाविण्यात आले. ज्या व्हाइसरॉयने, पृथ्वीसिंह एक भयंकर कैदी आहे; त्याच्यावर सरकार विश्वास ठेवू शकत नाही असे पूर्वी कळविले होते, त्यानेच गांधीजी भेटताच त्यांची इच्छा म्हणून सरदार पृथ्वीसिंह यांना काही अटीवर मुक्त केले. या अटी सरदार पृथ्वीसिंह यांनी मान्य कराव्यात असे महात्माजींनी त्यांना कळविले. अटी दोनच होत्या. एक म. गांधींच्या आश्रमात राहावे लागेल आणि पंजाबात जाता येणार नाही. दि. २३–१–३९ या दिवशी तुरुंगातील सर्व अधिकारी त्यांच्या खोली-जवळ उपस्थित होते. सर्वांनाच आनंद झाला होता. या मुक्ततेसाठी सर्वांनीच प्रयत्न केले होते.

रावळपिंडीच्या तुरुंगात असताना एका इंग्रज कमिशनरने आझादांना विचारले होते, " तुमच्या मुक्ततेचे वर्ष आहे १९६६. तोपर्यंत तुम्ही जिवंत राहाणार का ?"

तेव्हा सरदार पृथ्वीसिंह आझाद यांचे उत्तर होते, " इतकी वर्षे जिवंत राहण्याची जबाबदारी मी घेतो; पण तुमचे सरकार तोपर्यंत जिवंत ठेवण्याची जबाबदारी तुम्ही घेता का ? आणि मग ते खरोखरच १९६६ च काय त्यानंतरही पुष्कळ वर्षे जिवंत राहिले; इंग्रजांचे राज्य मात्र केव्हाच बुडाले.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय
वा. क्र. ७५८५ दिनांक ३।५।७५
विषय

BVBK-0401797